




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २४ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# लोकपाल सदस्यांना 70 लाखांची BMW

**■ 'स्वदेशी'चे काय झाले?**
**■ राजकारण तापले !**



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतात भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी लोकपाल सदस्यांची नेमणूक केलेली आहे. या लोकपाल सदस्यांना आता आलिशान आणि महागड्या एग्ज़ कार्स मिळणार असल्याची माहिती उघड झाली आहे. लोकपाल अध्यक्ष आणि सदस्य अशा एकूण सात आलिशान BMW 3 Series 330Li माडेलच्या कार घेतल्या जाणार असून, त्यासाठी निविदाही जारी करण्यात आल्या आहेत. या निविदांमुळे राजकारण चांगलंच तापले आहे. काँग्रेसने या मुद्द्यावरून सरकारवर निशाणा साधला आहे. तर निवृत्त IPS अधिकारी किरण बेदी यांनीही 'स्वदेशी' वरून सरकारला प्रश्न विचारले आहेत.

लोकपाल अध्यक्ष आणि सहा सदस्यांसाठी ज्या निविदा काढण्यात आल्या आहेत, त्यातील प्रत्येक कारची किंमत सुमारे ७० लाख रुपये आहे. अशा एकूण सात कार्ससाठी निविदा काढण्यात आली आहे. त्यामुळे याचा एकूण खर्च सुमारे ५ कोटींपेक्षाही जास्त असणार आहे. माजी आयपीएस अधिकारी आणि जनलोकपाल चळवळीच्या प्रमुख समर्थक किरण बेदी यांनी या निर्णयावर जोरदार टीका केली आहे. लोकपालची निर्मिती वायफळ खर्चासाठी करण्यात आलेली नाही, त्यामुळे असले निर्णय टाळायला हवेत. न्यूजएटीनशी बोलताना बेदी म्हणाल्या की, पंतप्रधान स्वदेशीवर भर देत असताना, लोकपाल परदेशी गाड्या का खरेदी करत आहे? आपल्याकडे चांगल्या भारतीय गाड्या नाहीत का? हा निर्णय पंतप्रधान मोदींच्या स्वदेशी मिशनच्या विरोधात आहे.'

***सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशही सिडॅन कार वापरतात...***

या मुद्द्यावर काँग्रेसचे राज्यसभा खासदार पी चिदंबरम यांनी लोकपालच्या या कारखरेदीवरून जोरदार टीका केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना साधी सिडॅन कार दिली जाते. मग लोकपाल आयुक्त आणि सहा सदस्यांना आलिशान एग्ज़ कारची गरज काय? असा सवाल त्यांनी एक्सवर उपस्थित केला. त्यांनी पुढे लिहिले की, या कार्स विकत घेण्यासाठी लोकांच्या करातून मिळालेला पैसा का खर्च केला जात आहे? माझी अशी अपेक्षा आहे की, कमीत कमी एक-दोन लोकपाल सदस्यांनी तरी या कार विकत घेण्याचा विरोध केला असेल किंवा करतील.

**लोकपालकडे ८ हजार अर्ज, फक्त २४ प्रकरणांची चौकशी-** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक सिंघवी यांनी इंस्टाग्रामवर लिहिले की, भ्रष्टाचारविरोधी संस्था आता आपल्या सदस्यांना बीएमडब्ल्यू कार देत आहे. भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठीचे रक्षक आता गरजेपेक्षा आलिशान कार्सच्या मागे पळू लागलेत हे दुःखद आहे. त्यांना याकडेही लक्ष वेधले की, २०१९ मध्ये लोकपाल स्थापन झाल्यापासून त्यांच्याकडे एकूण ८,७०३ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. पण त्यापैकी केवळ २४ प्रकरणांची चौकशी करण्यात आली आणि केवळ ६ खटले दाखल करण्यात आले आहे.

***वाद कसा सुरू झाला?***

१६ ऑक्टोबरला एक अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यामध्ये, लोकपालने सात बीएमडब्ल्यू ३ सिरीज ली कारच्या पुरवठ्यासाठी खुली निविदा मागवली होती. वृत्तानुसार, बीएमडब्ल्यूला लोकपाल चालक आणि कर्मचा-यांना सात दिवसांचे प्रशिक्षण देण्यास सांगितले जाईल. लोकपालचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती ए.एम. खानविलकर यांच्याकडे आहे. सदस्यांमध्ये निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती एल. नारायण स्वामी, न्यायमूर्ती संजय यादव आणि न्यायमूर्ती रितू रत्न अवस्थी, माजी मुख्य निवडणूक आयुक्तसुशील चंद्रा आणि निवृत्त जज ब्यूरोक्रेट्स पंकज कुमार आणि अजय तिर्की यांचा समावेश आहे.

## शेतक-यांसाठी मनोज जरांगेंचा एल्गार

# राज्यभरात आंदोलन पेटणार, भाऊबीजेला केली मोठी घोषणा




**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांनी रान पेटवले. मराठा-कुणबी आंदोलनाबाबत हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट लागू करण्याचा निर्णय झाला आहे. आता जरांगे पाटील हे शेतक-यांसाठी मैदानात उतरले आहेत. राज्यातील २९ जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपले आहे. अतिवृष्टीने शेतक-यांचं मोठं नुकसान झालं. शेताना तळ्याचं स्वरूप आलं. नदी-ओढ्याकाठच्या जमिनी वाहून गेल्या. शेतक-यांचं आतोनात नुकसान झालं. पण मदतीचा मोठा हात अद्यापही शेतक-यांपर्यंत पोहचला नाही. ३ हजारांहून अधिक कोटींच्या पॅकेजची घोषणा झाली. पण दिवाळी संपूनही शेतक-यांच्या हाती काहीच लागले नाही. त्याविरोधात जरांगे पाटील यांनी भाउबीजेलाच आंदोलनाचा नांगर टाकला आहे.

आज भाउबीजेच्या दिवशी आम्ही यादी तयार करतोय. लवकरच बैठक घेउन शेतक-यांचे मोठे आंदोलन उभारणार आहे. अनेक ठिकाणी सरकार पेक्षा अधिकारी मोठे झाले आहेत. जे अधिकारी काम करत नाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. दिलेली मदत ही मदत म्हणता येणार नाही. तो तात्पुरता आनंद आहे. जसं की फडणवीस हे प्रत्येकाला तात्पुरता आनंद देतात. धनगर समाजाला देखील तात्पुरता आनंद दिला. शेतक-याचे काम करणारे अभ्यासक, तज्ञ, नेते एकत्र बसू. सगळ्यांना फोन करून बोलावणार आहे असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले.

**लाडकी बहीण आणि दाजीसाठी मैदानात-** आमच्याकडे एकच इमानदारीने लढण्याची आणि ती जिंकण्याची गोष्ट आहे. सर्व संघटनेचे, पक्षाचे शेतकरी नेते आम्ही अंतरवालीत बोलावणार. पहिला टप्पा एकत्र बसून चर्चा करु. नंतर सर्वांची बैठक आणि त्यानंतर आंदोलनाची दिशा ठरवणार. आमदारांकडे हजारो कोटींच्या प्रोपर्ट्या आहेत. तरी त्यांना पाच कोटी देण्यात येत आहेत. भाउबीज(पान २ वर)

# अण्णा हजारे यांची नाराजी

**मुंबई :** भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी भारतात लोकपाल व्यवस्था लागू करण्यात आली. लोकपाल अध्यक्ष आणि ७ सदस्यांसाठी प्रत्येकी ७० लाख रुपयांची आलिशान बीएमडब्लू गाड्या खरेदी करण्याचा निर्णय १६ ऑक्टोबर रोजी जारी केला. माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. लोकपालची निर्मिती वायफळ खर्चासाठी करण्यात आलेली नाही, त्यामुळे असले निर्णय टाळायला हवेत, असे त्या म्हणाल्या. त्यानंतर आता लोकपालसाठी चळवळ उभी करणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीदेखील या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणाले की, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आम्ही लोकपाल चळवळ उभारली, त्यासाठी आम्ही संघर्ष केला. त्यातूनच ही लोकपाल संस्था अस्तित्वात आली. लोकपालची स्थापना ही भ्रष्टाचार थांबवण्यासाठी झाली. पण आता जर लोकपालच भ्रष्टाचार होण्यासाठी कारणीभूत ठरणा-या निर्णयांमध्ये सहभागी होत असेल. तर ती अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. असे म्हणत त्यांनी या मागणीवर नाराजी व्यक्त केली. तसेच, माजी आयपीएस अधिकारी आणि जनलोकपाल चळवळीच्या प्रमुख समर्थक किरण बेदी म्हणाल्या की, पंतप्रधान स्वदेशीवर भर देत असताना, (पान २ वर)



# ठाकरे परिवार भाऊबीजेसाठी एकत्र;

## थोरल्या आणि धाकट्या पिढीने आनंदात साजरा केला सण

*ठाकरे परिवाराने भाउबीजाचा आनंद एकत्र साजरा केला. थोरल्या पिढीतील जयजयवंती ठाकरे-देशपांडे यांनी उद्धव आणि राज ठाकरेंना प्रेमाने ओवाळलं, तर धाकट्या पिढीतील उर्वशी ठाकरेंनी आदित्य, तेजस, अमित आणि यश देशपांडेंना हसतमुखाने भरभरून प्रेम दाखवलं. ठाकरे कुटुंबाच्या या आनंदाच्या दिवशी एकत्रिततेचा उत्साह आणि नात्यांची उब स्पष्ट जाणवली.*



## भारताच्या महिलांचा दिवाळी धमाका

# न्यूझीलंडवर करो या मरो सामन्यात दणदणीत विजय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या महिला संघाने अखेर जोरदार दिवाळी धमाका करत आपल्या चाहत्यांना आनंदाची भेट दिली. भारतीय महिला संघासाठी वर्ल्ड कपमधील हा करो या मरो असाच सामना होता. या सामन्यात भारताच्या संघाने दणदणीत विजय साकारला आणि त्यांनी सेमी फायनलच्या दिशेने कूच केली आहे. स्मृती मानधना आणि प्रातिका रावल यांच्या दमदार शतकाच्या जोरावर भारताने ३४० धावांचा डोंगर उभारला होता. पण पावसामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार न्यूझीलंडपुढे विजयासाठी ४४ षटकांत ३२५ धावांचे आव्हान देण्यात आले होते. भारताच्या गोलंदाजांनी यावेळी दमदार गोलंदाजी केली आणि न्यूझीलंडला विजयापासून वंचित केले. भारताने यावेळी न्यूझीलंडवर ५३ धावांनी डकवर्थ लुईस नियमांनुसार विजय साकारला. स्मृती मानधनाने भारताला यावेळी भन्नाट सुरुवात करून दिली. स्मृतीने धडाकेबाज फटकेबाजी करत न्यूझीलंडला आपल्यापुढे लोटांगण करण्यास भाग पाडले. स्मृतीला यावेळी प्रतिका रावलची चांगली साथ मिळाली. या दोघांनी भारताला तब्बल २१२ धावांची अफलातून सलामी करून दिली. त्यामुळे भारत यावेळी मोठी धावसंख्या उभारणार, हे स्पष्ट झाले होते. स्मृतीने यावेळी आपले वनडे क्रिकेटमधील १४ वे शतक साजरे केले. गेल्या दोन सामन्यांच स्मृतीला शतकाने हुलकावणी दिली होती. पण या सामन्यात स्मृतीने ९५ चेंडूंत १० चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर १०९ धावांची दिमाखदार खेळी साकारली. प्रतिका रावलनेही यावेळी १३ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर १२२ धावा केल्या. स्मृती आणि प्रतिका बाद झाल्यावर जेमिमा राड्रीगेझने यावेळी फक्त ५५ चेंडूंत ११ चौकारांच्या जोरावर नाबाद ७६ धावांची वादळी खेळी साकारली. त्यामुळेच भारताला यावेळी ३४० धावांपर्यंतची मजल मारता आली. भारताने यावेळी सुरुवातील अप्रतिम गोलंदाजी केली आणि अनुभवी सुझी बेट्सला(पान २ वर)

# बायकोची हत्या करून मृतदेह घरात पुरला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशच्या बाहरीच भागात एक धक्कादायक घटना उघड झाली आहे. एका ४८ वर्षीय व्यक्तीने आपल्या पत्नीची हत्या करून घरातच आपल्या गादीखाली जमिनीत मृतदेह पुरून ठेवला. तब्बल १२ दिवस कुणालाही कानोकान खबर न लागता पती रोज पलंगावर झोपत राहिला. पण अखेर हा सगळा प्रकार उघड झाला. अटक होण्याच्या भीतीनं पतीनं पोबारा केला खरा, पण पोलिसांनी आरोपीचा ठावठिकाणा शोधून काढत त्याला शेवटी अटक केली. या प्रकारामुळे बाहरीच परिसरात तणावपूर्ण शांतता पाहायला मिळत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाहरीच भागात आरोपी हरीकिशन ४५ वर्षीय पत्नी फूलादेवी यांच्यासह वास्तव्य करत होता. हरीकिशन हा रोजंदारीवर काम करणारा कामगार आहे. १० ऑक्टोबरपासून फूलादेवी बेपत्ता झाल्या होत्या. आसपास राहणा-या लोकांनी चौकशी केली असता हरीकिशननं फूलादेवी त्याला न सांगता कुठेतरी निघून गेल्याचं सांगितलं. पण फूलादेवी यांच्या भावाला या सगळ्या प्रकरणात संशय आला. आपल्या शंकेची खात्री करण्यासाठी फूलादेवी यांचे भाउ रामधीरज व इतर नातेवाईक हरीकिशनच्या घरी पोहोचले. घरी पोहोचल्यावर हरीकिशननं त्यांनादेखील तीच कहाणी सांगितली. फूलादेवी कुणालाही न सांगता अशाप्रकारे गायब झाल्याच्या कथनावर त्यांच्या भावाचा मुळीच विश्वास बसला नाही. त्यांनी संशयातून घरात इतरत्र पाहणी केली असता गादीच्या खाली त्यांना काही दिवसांपूर्वीच सारवलेला एक मोठा भाग दिसला. त्या भागाला काही तडेदेखील गेले होते. यातून त्यांचा संशय बळावला. त्यांनी तातडीने पोलिसांना पाचारण केलं. पोलिसांनी तपास केला आणि धक्कादायक वास्तव समोर आलं!

दरम्यान, पोलिसांनी हरीकिशनच्या घरी दाखल होत गादीखालच्या संबंधित भागाची पाहणी केली आणि तिथे खोदण्याचा निर्णय घेतला. खोदायला सुरुवात केल्यानंतर आधी पोलिसांना तिथे फुटलेल्या बांगड्या सापडल्या. मग पायातलं चांदीचं पैंजण सापडलं. आणखी खणल्यावर काही फाटलेले कपडेदेखील आढळले. काही फूट खणल्यानंतर शेवटी पोलिसांना फूलादेवी यांचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडला. त्यांच्या मृतदेहावर अनेक ठिकाणी गंभीर जखमा(पान २ वर)

# तेजस्वी यादव महाआघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा

**नवी दिल्ली/पाटणा**-बिहार निवडणुकीसाठी महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा राजद प्रमुख तेजस्वी यादव असतील. काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी महाआघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की जर सरकार स्थापन झाले तर मुकेश साहनी उपमुख्यमंत्री असतील. इतर उपमुख्यमंत्री देखील मागासवर्गीय समाजातील असतील.गेहलोत म्हणाले की तेजस्वी यादव आमचे नेते आहेत. एनडीएने त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल हे जाहीर करावे. आम्ही नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवू असे म्हणणे पुरेसे नाही. या घोषणेनंतर तेजस्वी यादव म्हणाले, 'तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवला आहे. मी सर्वांचे मनापासून आभार मानतो. मी सर्वांना सांगू इच्छितो की त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे मी पालन करेन. मी २० वर्षांचे अकार्यक्षम सरकार उलथवून टाकेन.'महाआघाडीची संयुक्त पत्रकार परिषद ५० मिनिटे चालली. राजद, काँग्रेस आणि व्हीआयपीसह सात पक्षांचे १४ नेते उपस्थित होते. सर्व पक्षांच्या नेत्यांना बोलण्याची संधी देण्यात आली. सर्व महाआघाडीतील एकतेबद्दल बोलले. महाआघाडी २८ ऑक्टोबर रोजी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करणार आहे. त्यानंतर, राहुल गांधी आणि तेजस्वी यादव बिहारमध्ये संयुक्त रॅली काढणार आहेत. महाआघाडीची संयुक्त पत्रकार परिषद ५० मिनिटे चालली. राजद, काँग्रेस आणि व्हीआयपीसह ७ पक्षांचे चौदा नेते सहभागी झाले. तेजस्वी यादव, अब्दुल बारी सिद्दीकी, मनोज झा आणि संजय यादव यांनी आरजेडीचे प्रतिनिधित्व केले.

# सरन्यायाधीश गवई यांच्यानंतर न्या.सूर्यकांत देशाचे पुढील सरन्यायाधीश?




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :-** भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यानंतर पुढील सरन्यायाधीश कोण होणार यासाठी केंद्र सरकारने प्रक्रिया सुरू केली आहे. सीजीआय गवई येत्या २३ नोव्हेंबरला निवृत्त होत आहेत. त्याआधी पुढच्या सरन्यायाधीशांचे नाव निश्चित होईल. सरन्यायाधीशांच्या नावांमध्ये न्या. सूर्यकांत यांचे नाव आघाडीवर आहे. न्या. सूर्यकांत पुढचे सरन्यायाधीश होतील असं बोलले जाते. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेशी निगडीत लोकांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, न्यायमूर्ती गवई आज रात्री किंवा शुक्रवारी त्यांच्या उत्तराधिकारीचे नाव देणारे पत्र देतील. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्ती, बदली आणि पदोन्नतीचे मार्गदर्शन करणा?्या कागदपत्रांच्या संचातील मेमोरँडम ऑफ प्रोसिजरनुसार, भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वात वरिष्ठ न्यायाधीशाची असावी, जे या पदासाठी योग्य मानले जाते. केंद्रीय कायदा मंत्री योग्य वेळी सरन्यायाधीशांकडून त्यांच्या उत्तराधिकारीच्या नियुक्तीसाठी शिफारस घेतील. सामान्यतः हे पत्र विद्यमान सरन्यायाधीश वयाच्या ६५ व्या वर्षी निवृत्त होण्याच्या एक महिना आधी पाठवले जाते. न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीश गवई यांच्यानंतरचे सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश आहेत आणि पुढील सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्तीची शक्यता अधिक आहे. एकदा नियुक्ती झाल्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी पुढील सरन्यायाधीश होतील आणि ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत सुमारे १५ महिने ते या पदावर राहतील.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणातील हिसार येथे झाला. त्यांनी १९८१ मध्ये हिसार येथील सरकारी पदव्युत्तर महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली आणि १९८४ मध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून एलएलबी पदवी प्राप्त केली. शिवाय त्यांनी २०११ मध्ये कुरुक्षेत्र विद्यापीठातून प्रथम श्रेणी प्रथम क्रमांकासह एमएलएल (मास्टर ऑफ लॉ) पदवी पूर्ण केली, ज्यामुळे सतत शिक्षणाची त्यांची आवड दिसून आली. १९८४ मध्ये हिसार जिल्हा न्यायालयात त्यांनी वकिली सुरू केली आणि लगेचच १९८५ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात(पान २ वर)







# हिट अँड रनमधील तरुणी गंभीर पाच ते सहा ठिकाणी फॅक्चर

## आरोपी चालक अद्याप फरार,

**अमरावती :** दिवाळीच्या रात्री कंवरनगर रोडवर झालेला भयानक हिट अँड रन अपघात शहरवासियांना हादरवून सोडले आहे. दस्तूरनगर येथील दोन तरुणी — पायल बुंदेले (२२) आणि वैष्णवी थोरात (२२) मंदिर दर्शनासाठी निघाल्या होत्या, आणि काही क्षणांतच वेगाने धावणाऱ्या बोलेरोने त्यांच्या ॲक्टिव्हाला जोरदार धडक दिली. घटना इतकी गंभीर होती की, वैष्णवी वाहनाच्या खाली सापडली, पण चालक थांबला नाही; उलट तिला पाठीवरूनच गाडीने ओढत घटनास्थळावरून फरार झाला.

प्रात्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, बोलेरोतील युवक मद्यधुंद व जोरजोरात संगीत लावत होते. अपघातानंतर नागरिकांनी दोघींना तातडीने रुग्णालयात दाखल केले, जिथे वैष्णवीची प्रकृती गंभीर आहे.

**पोलीस तपास सुरू, आरोपी अद्याप फरार-**

राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे, पण बोलेरोचा क्रमांक अद्याप समोर आलेला नाही. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे; तरीही आतापर्यंत कोणताही ठोस पुरावा मिळालेला नाही.

दिवाळीच्या रात्री घडलेला हा भीषण अपघात असूनही आरोपी चालक अद्याप फरार आहे. नागरिकांचे संताप वाढत आहेत आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे वैयक्तिक हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. 'सरकारने वैष्णवीच्या उपचाराचा संपूर्ण खर्च उचलावा आणि आरोपी चालकावर कठोर कारवाई व्हावी,' अशी मागणी विजय थोरात, नीलेश कंचनपुरे आणि स्थानिक नागरिकांनी केली आहे. पोलिस निरीक्षक पुनित कुलट यांनी सांगितले की, आरोपीचा शोध सुरू आहे आणि लवकरच आरोपीपर्यंत पोहोचण्यात येईल. तपास सकारात्मक दिशेने आहे.



### वैष्णवीची प्रकृती गंभीर – मदतीची आवश्यकता

वैष्णवीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, हात, पाय, खांदा आणि मनगटावर फ्रॅक्चर आहेत. डॉक्टरांनी तिला प्लास्टिक सर्जरी आणि हाडांच्या शस्त्रक्रियेची गरज असल्याचे सांगितले आहे. वैष्णवी गरीब कुटुंबातील असून, बी.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. या घटनेने संपूर्ण कुटुंब धक्क्याचा अनुभव घेतला आहे, तरी वैष्णवी धैर्याने उपचारांना प्रतिसाद देत आहे. तिच्या भाऊ राहुल थोरात यांनी नागरिकांना मानवतेच्या नात्याने मदतीसाठी आवाहन केले आहे.

# मोर्शीतील सालबर्डीत देवदर्शनासाठी आलेल्या तरुणाचा माडु नदीत बुडून मृत्यू

**मोर्शी/ प्रतिनिधीः-**

श्रीक्षेत्र सालबर्डी येथे देवदर्शनासाठी आलेल्या अभिजीत गोवर्धन चौधरी (वय २३, रा. कुरणखेड, तालुका चांदूरबाजार) या तरुणाचा माडु नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाला. ही घटना २३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडे सहा वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार, चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव बंड येथील दोन, कुरणखेड येथील एक, चांदूरबाजार येथील एक, आखतवाडा येथील एक आणि खरवाडी येथील एक अशी सहा तरुणे (वय २० ते २५) तीन मोटर सायकलवर श्रीक्षेत्र सालबर्डी येथे लहान महादेवाचे दर्शनासाठी आले होते. तरुणांनी दुपारी साडे दोन वाजताच्या सुमारास महादेवाचे दर्शन घेतले आणि परत येत असताना माडु नदीच्या पात्रात उतरले. अभिजीत पोहण्यासाठी नदीत गेला; त्याला सोबतचा मित्र वाचविण्याचा प्रयत्न करत असताना तो सुद्धा पाण्यात डुबत होता, परंतु तो स्वतः नदीपात्रातून बाहेर पडला. मात्र, अभिजीत नदीत बुडला.




इतर मित्रांनी आरडा-ओरडा केला,


त्यानंतर सालबर्डी येथे मासेमारी करीत असलेल्या युवकांनी त्याचा मृतदेह बाहेर काढला. घटनेची माहिती त्वरित मोर्शी पोलिसांना देण्यात आली. पोलीस ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे आणला. पुढील तपास मोर्शी पोलीस करत आहेत.

# पंचवटीत वाहनाला लागली आग

## अग्निशमन दलाचा तत्पर हस्तक्षेप



**आर्वी जनमाध्यम :** पंचवटी परिसरातील प्रवीण दुपारे यांच्या घरासमोरील वाहनाला आज गुरुवारी सायंकाळी अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने अग्निशमन दलाच्या तात्काळ प्रतिसादामुळे मोठ्या अनर्थाचा संभव टाळला गेला.गांधी विद्यालयाजवळील फटाका दुकाने परिसरात ड्युटीवर असलेल्या आर्वी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला ही घटना सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता दूरध्वनीद्वारे कळताच, जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आग लागलेल्या वाहनावर सलग पाण्याचा मारा करून दलाने आग पूर्णपणे आटोक्यात आणली.या मोहिमेत वाहन चालक कम ऑपरेटर नरेश आखरे, तसेच बबन बावनकर, शिवाजी चिमोटे, महेंद्र गोयर, अरुण पंड्या, करण चावरे, रणजीत गोयर आदी कर्मचारी सहभागी झाले होते. दलाच्या तत्परतेमुळे परिसरातील लोकांनी सुटकेचा निश्वास सोडला.



# मोर्शी येथील दौलतराम ट्रेडर्सला भीषण आग

## लाखोंचे नुकसान

मोर्शी/प्रतिनिधीः-

स्थानिक प्रभात चौक परिसरातील दौलतराम ट्रेडर्स नामक प्रतिष्ठानच्या वरच्या मजल्यावर बुधवारच्या रात्री आग लागल्याने किराणा साहित्य जळून लाखोंचे नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. माहिती नुसार प्रभात चौक येथे नरेश अंगवाणी यांचे दौलतराम ट्रेडर्स होलसेल किराणा दुकान आहे. बुधवारच्या रात्री नरेश अंगणानी दुकान बंद करून घरी गेले होते. रात्री त्यांच्या दुकानाच्या वरच्या मजल्यावरून धूर आणि आगीच्या लपटा निघताना दिसल्या. याची माहिती नागरिकांनी त्यांना मोबाईलवर दिली. माहिती मिळताच ते तिथे पोहोचले. त्यांनी अग्निशमन दलाला याची माहिती दिली. तोपर्यंत वरच्या मजल्यावर ठेवलेले टूथपेस्ट, साबण, शाम्पू सहित अन्य साहित्य जळून खाक झाले होते. अग्निशमन दलाने अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणली.

# अवैध दारूची विक्री करणारा ताब्यात



**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या आरोपीला चांदुर रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. पळसखेड परिसरात ही कार्यवाही करण्यात आली. प्रकाश रामदास गेडाम (वय ५१) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार प्रकाश गेडाम त्याच्या घरातून अवैधरिते दारूची विक्री करत होता. याबद्दल पोलिसांना माहिती मिळताच चांदुर रेल्वे पोलिसांनी प्रकाशच्या घरी धाड मारली. त्याच्या स्वयंपाक खोलीतून ९१ देशी दारूच्या प्लास्टिकच्या पावट्या प्रत्येकी ९० एमएल किंमत ४,५५० रुपये जप्त करण्यात आली. आरोपी गेडाम विरुद्ध कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार आखरे यांच्या मार्गदर्शनात अमंलदार शिवाजी घुगे ,गजानन वाघमारे, संदीप वासनिक ,ऋषिकेश जगदाळे, मनीष गुल्हाने, सीमा साखरवाडे यांनी कारवाई केली.

# अमरावतीत जुगार अड्डयावर छापा!

## १५ जण कारवाईत, लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती :** अमरावतीत प्रशांत नगर परिसरात जुगाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गुन्हे शाखेच्या माहितीवरून आज (दि. २३ ऑक्टोबर) पंचा समक्ष छापा मारल्यावर रमेशचंद्र मारोतराव गारुडे (७८, रा. प्रशांत नगर, हनुमान मंदिराजवळ) आणि अरविंद हिरामण मनवर (४७, रा. भीम टेकडी-बेनोडा) यासह एकूण १५ जण एका 'बादशाह' नावाच्या जुगार खेळत आढळले. सदर छाप्यातून ५९,००० रुपये रोख रक्कम आणि इतर जुगार साहित्य जप्त करण्यात आले. एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे १,४२,००० रुपये इतकी आहे.

माहितीनुसार, जुगार 'कारगिल क्रीडा व मनोरंजन मंडळ, प्रशांत नगर' या नावाखाली परवाना घेऊन चालवला जात होता, परंतु वास्तविकता काही वेगळी होती. सदर प्रकरणावर पोस्टे फ्रेजरपुरा येथे कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

### राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व

विषयावर कार्यशाळा होणार असून २९ ऑक्टोबरच्या सायंकाळी चार ते सात वाजेपर्यंत संकल्प सखी समूह द्वारा विशेष फॅशन शो घेण्यात येणार आहे. आई आणि मुलांसाठी रॅम्प वॉक राहणार आहे. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ ते बारा वाजेपर्यंत जिल्हा सामान्य रुग्णालयाचे सहकार्याने रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी घेतली जाणार आहे. सकाळी ११ ते २:०० वाजेपर्यंत नागपूरचे प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर अमोल उरकुडे व वैभव शेंडे यांचा सिनेमेटोग्राफी वर्कशॉप होणार आहे. दोन समूहामध्ये स्पर्धा घेतली जाणार आहे. प्रत्येक गटात प्रथम पुरस्कार ५ हजार,द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार व प्रोत्साहन पुरस्कार १ हजार रुपये असे एकूण २० पुरस्कार दिले जाणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अर्णव इंजिनियर नागपूर, गोमटनाथ प्रिंटिंग वर्क ,मानेकर ज्वेलर्स, गव्हाणे ज्वेलर्स, कृष्णा डिजिटल फोटो लॅब, जय फोटो स्टुडिओ, अमर सन्स, एसबीआय लाइफ, प्रा.सारंग नागठाणे, कविता गुढे, सुनिता कोठाळे, ज्ञानेश्वर हिवसे, विशाल तराळ, गजेंद्र शहा, सदानंद आप्पा आदिंचे योगदान आहे. कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. पत्रकार परिषदमध्ये उदय चाकोते, माजी महापौर विलास इंगोले, सुरेश रतावा, संजय शिरभाते आदि उपस्थित होते.

### मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्त

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०८.२५ वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावल, मलकापुर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा येथे थांबा राहील. २० तृतीय वातानुकूलित आणि दोन जनरेटर व्हॅन अशी गाडीची संरचना राहील, असे मध्य रेल्वेने स्पष्ट केले.

### इर्विन चौकात कोल्हा दिसल्याने

गावंडे व अलका जोशी पण तिथे आले. त्यांनी पण कोल्हा पाहिला आणि आपल्या मोबाईल मध्ये त्याचे फोटो घेतले. यामुळे आता शहरात दहशत निर्माण झालेली आहे.निवासी क्षेत्रामध्ये वन्य प्राण्याचे येण्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

### वेगवेगळया रस्ता अपघातात

दबून त्याचा मृत्यू झाला. मृतक चे वडील आरिफ शहा हबीब शहा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तसेच शिरजगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीत कारंजा बहिरम सायखेड मार्गावर शेख जाकीर शेख आमिर आपल्या मित्र अब्दुल रज्जाक अब्दुल रफिक (वय ६३,गणेश नगर परतवाडा) व गणेश उर्फ पप्पू बिहारी सिंग कोगे (कांडली) यांच्या मोटरसायकल एमएच २७ एबी ०६७१ वाहनावरून घाट लाडकी ते कारंजा बहिरम मार्गावर जात होते. त्या वेळी त्यांच्या वाहना समोर जंगली डुक्कर आल्याने मोटरसायकल अनियंत्रित झाली. यामुळे तिघे खाली पडले. शेख जाकीर शेख अमीर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले जेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. शिरजगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तसेच वरुड पोलिस स्टेशन हद्दीत सावंगी मध्ये हितेद अजबराव जिचकार (वय ३५) हे मोटरसायकल एमएच २७ सीएच ५८२२ ने आपल्या शेतात जात होते. त्यावेळी भागवतराव रामदेव यांच्या गोठ्याजवळ त्यांची दुचाकी भिडली. यामुळे हितेद गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### दर्यापूरच्या तरुणाची अकोला येथील

नसल्याने नर्सच्या लक्षात आले. त्यानंतर रुग्णाचे नातेवाईक आणि हॉस्पिटल कर्मचारी यांनी दरवाजा तोडून उघडला असता अमोल कावनपुरे दुपट्ट्याच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला. मृतदेह अकोला येथील शासकीय रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### चाकू मारून तरुणाला लुटले

बसची वाट पाहत होता. त्यावेळी आरोपी श्याम नागरे त्याच्या जवळ आला. आरोपी त्याच्या ओळखीचा होता. आरोपीने त्याला दारू पिण्यासाठी उधार पैसे मागितले. वेदांत जवळ चार हजार रुपये होते. त्याने फक्त दहा रुपये देऊ शकतो असे त्याला म्हटले. यानंतर आरोपी त्याला त्याच्या स्प्लेंडर गाडीवर बसून सूचगिरणी गोपाल नगर परिसरात घेऊन गेला. तेथे पैसे न दिल्याने आरोपीने त्याला शिवीगाळ केली व धमकावले. चाकूने त्याच्या उजव्या हाताच्या बोटावर व डोक्यावर मारले. ज्यामुळे वेदांत जखमी झाला. आरोपीने त्याच्या खिशातून ४ हजार रुपये जबरदस्ती काढून घेतले आणि पॉकेट फेकून दुचाकी घेऊन निघून गेला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### मुर्तीजापुर - दर्यापूर मार्गावर तिहेरी

मध्ये राहुल मोहन वानखडे (३२, रा. लोणी टाकळी), शिवम मेहरे (२७, रा. लाखपूरी), वैभव विपुल मेहरे (३८, रा. टाकरखेडा), साची संदीप जळमकर, प्राची मेहरे (७ वर्षे), वैभवी विपुल मेहरे, अन्वी मेहरे तसेच आणखी तीन अनोळखी व्यक्तींचा समावेश आहे.

माहितीनुसार, जळमकर परिवारातील महिला भाऊबीज निमित्ताने आपल्या गावाकडे जात असताना समोरून आलेल्या ट्रॅक्टर आणि ऑटोमध्ये ग्रँड विटाराची धडक होऊन हा भीषण अपघात झाला. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती.

जखमींना तातडीने श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालय, मुर्तीजापुर येथे दाखल करण्यात आले. मात्र रुग्णालयात अद्यावत अपघात विभाग आणि तज्ञ डॉक्टरांचा अभाव असल्याने सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले.

घटनास्थळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल दीपक कानडे, ज्ञानेश्वर रडके, स्वप्नील तायडे, रितेश, किरण मुकुंदे, शंकर खेडकर, सतीश घाटे आणि गणेश ठाकरे यांनी हजेरी लावून वाहतूक सुरळीत केली. पोलिसांकडून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

### झेडपी, पं. स. च्या निवडणुका

सार्वत्रिक निवडणुका पुर्ण करावयाच्या आहे. त्यामुळे शासनासह आता निवडणुक आयोगाने निवडणुकीची लगीनघाई सुरू केली आहे. एकाचवेळी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये आरक्षण, मतदार यादी कार्यक्रम लावला आहे. पहिल्या टप्प्यात शासनस्तरावर जिल्हा परिषद अध्यक्षांचे आरक्षण निश्चित करण्यात आल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात १४ पंचायत समिती सभापती आणि गट व गणाचे आरक्षण देखील पुर्ण झाले आहे.

याचबरोबर नगरपालिका, नगरपंचायत नगराध्यक्ष व प्रभागाचे आरक्षण देखील जाहिर करण्यात आले. जिल्हा परिषदेचे आरक्षण ३१ ऑक्टोबरपर्यंत अंतिम होणार असून त्यापुर्वी २७ ऑक्टोबरला अंतिम मतदारयादी प्रसिध्द केली जाणार आहे.

### प्रहारची जिल्हाधिकारी कार्यालयावर

म्हणून दिवाळी साजरी केली जात. अन्नपुरवठा विभागामार्फत दिल्या जाणारे गोरगरिबांना अन्नधान्य अंत्योदय प्राधान्य गट व अपंग बांधवांना दिला जाणारे धान्य यावर त्या लोकांची उपजीविका असते. मात्र, त्याबाबतीत कुठलीही काळजी न घेता हिंदू धर्माचे पावित्र लक्षात न घेता सरसकटपणे अन्नधान्य पुरवठा विभागामार्फत ज्वारीचा वाटप करीत आहे. दिवाळी ज्वारीच्या भाकरी करून साजरी करावी लागली आहे. ज्वारी थांबून संपूर्ण अंत्योदय प्राधान्य गट व अपंग बांधवांना दिला जाणारी ज्वारी व्यतिरिक्त दहा किलो गहू व पाच किलो साखर देऊन पूर्तता करावी. निराधार लोकांची हिंदू बांधवांची, अपंग बांधवांची वृद्धांची निराधार यांची दिवाळी साजरी करावी. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

### भांबोरा येथे विद्युत तारांच्या

आपल्या बकरी घेऊन चराई करिता गेले होते,बकरी चराई करीत असताना अचानक तिच्या अंगावर विद्युत तार कोसळली व यातच तिचा मृत्यू झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले . बकरीला वाचविण्यासाठी गेलेल्या रोशन गडलिंग या युवकाला देखील विजेचा धक्का बसला.त्यामुळे तो जखमी झाला असून त्यावर तिवसा ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.विद्युत तारेच्या स्पर्शाने बकरीचा जीव गेला असून महावितरणने घटनेची नोंद घेऊन नुकसान भरपाई देण्याची मागणी रमेश गडलिंग यांनी केली आहे.

### विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा

पण वन्यप्राण्यांकडून उभ्या पिकांची नासाडी केली जात असल्याने पिकाच्या संरक्षणार्थ शेताला तारेचे कुंपन करीत त्यात वीज प्रवाह प्रवाहित करण्यात आला.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी शेतकरी नरेश है हे शेतात गेले असता करंट सुरू होता. ते वीज प्रवाह बंद करीत असताना त्यांना वीज प्रवाहाचा जबर झटका बसला. ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. प्रकरणी पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### राज्यभरात आंदोलन पेटणार,

निमित्त लाडक्या बहिणीला लाडक्या दाजीला सगळ्यांना न्याय दिल्याशिवाय शांत बसायचं नाही. असं ऐतिहासिक आंदोलन पुन्हा होणार नाही हे देश सुद्धा पाहिल.हमीभाव कसा होत नाही, कर्जमुक्ती कशी भेटत नाही, शेतक-यांच्या कुटुंबीयांना कशा नोक-या देत नाहीत तेही बघू. शेतक-यांना आणि शेतीला नोकरीचा दर्जा देण्याची मागणी करणार आहे. सोनं, चांदी सगळं वाढलं, त्यांचं पाणीही वाढलं मात्र आमच्या दुधाला भाव मिळाला ना, असे जरांगे म्हणाले.छगन भुजबळ हे टोळ्यांचे मुकादम असल्याचा आरोप त्यांनी केला. बीडच्या ओबीसी एल्गार सभेत धनंजय मुंडे हे गोपीनाथ मुंडेंचे वारस असल्याच्या वक्तव्याचा जरांगेंनी समाचार घेतला. त्यांनी ते वाक्य वापरले खूप अवमान केला एका शब्दात. हा संधी साधू आहे. त्या विचारात वाढलेला वंश आहे ना त्यांच्याकडे, त्रास देणारा कसा होउ शकतो वारस चालवणारा, असा प्रश्न त्यांनी केला. त्यांचे हात रक्ताने भरलेले आहेत. त्यांनी हयातीत गोपीनाथ मुंडे यांना खूप त्रास दिला आहे. जो खरा वारस आहे तो हे विसरतो तरी कसा काय? जातीचा म्हणून किंवा तुमच्या घरातलं घर आहे म्हणून विसरताय त्रास दिलेला इतका, ही कुठली परंपरा आहे, असे जरांगे म्हणाले.

महादेव मुंडे हत्या प्रकरणात तपास सुरू आहे. कालच त्यांचे बंधू आणि आठ-दहा लोक माझ्याकडे आले होते. मॅटरमध्ये पडल्यावर मी मागे नाही हटत ते कोणाचंही असो. पुन्हा मराठ्याच्या नादी लागायचं नाही. आमच्यात एक म्हण आहे त्याचे ९९ गुन्हे झाले भरू द्या. गुंडाच्या टोळीचं ऐकून मराठ्यांनीच परळीत मराठ्यांना त्रास देउ नका. आमच्यापर्यंत आलं आहे त्याचं ऐकुन त्रास दिला जातोय. बीड जिल्ह्यातल्या आणि परळीतल्या प्रत्येक गावात आम्ही लक्ष ठेवून आहोत. इथून पुढे लक्षात ठेवा, असा इशारा त्यांनी दिला.

**मनोज जरांगेंचा सरकारला इशारा-** तिकडे ओबीसींना म्हणायचं तुमच्या आरक्षणाला हात लागला नाही आणि इकडे आम्हाला जीआर द्यायचा. जीआर द्यायचा पण प्रमाणपत्र द्यायचे नाहीत. तर लक्षात ठेवा आंदोलन कुठल्याही दिशेला जाउ शकतं. हे फडणवीस यांनी लक्षात ठेवावं असे जरांगे म्हणाले. १९९४ चा जीआर निघाला त्याचे प्रमाणपत्र ते आत्तापर्यंत काढत आहेत. जीआर निघालाय तो तुम्हाला कायमचा झाला हे समजून घ्या. या जीआरच्या आधारे एका वर्षात सगळ्यांना आरक्षणात घालू. तो आली बाबा म्हणतोय संविधानापेक्षा जीआर मोठा नाही. जर आमचा जीआर संविधानापेक्षा मोठा नाही तर तुमचा सुद्धा जीआर संविधानापेक्षा मोठा नाही हे लक्षात घ्या. आमच्या जीआर ला काही झालं तर तुमच्यालाही होणार. १६८ जीआर आहे त्यामध्ये ३०,२०, २५ जाती घातल्या ते सगळं मला माहित आहे, असा इशाराही जरांगेंनी दिला.

### अण्णा हजारे यांची नाराजी

लोकपाल परदेशी गाड्या का खरेदी करत आहे? आपल्याकडे चांगल्या भारतीय गाड्या नाहीत का? हा निर्णय पंतप्रधान मोदींच्या स्वदेशी मिशनच्या विरोधात आहे.□ असे म्हणत आपली नाराजी जाहीर केली.

नेमकं प्रकरण काय?

भारतात भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी लोकपाल सदस्यांची नेमणूक केलेली आहे. या लोकपाल सदस्यांना आता आलिशान आणि महागड्या बीएमडब्ल्यू गाड्या मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### *बायकोची हत्या करून*

झालेल्या होत्या. त्यामुळे बेदम मारहाणीत त्यांचा मृत्यू झाल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं.

पण हा सगळा प्रकार घडेपर्यंत हरीकिशन तिथे थांबलाच नाही. आपल्या घरावर पोलिसांच्या पडलेल्या छाप्यानंतर घाबरलेल्या अवस्थेत हरीकिशननं तिथून पळ काढला. पोलिसांनी आसपास केलेल्या तपासात हरीकिशन प्रचंड संतापी वृत्तीचा असल्याचं त्यांना समजलं. गेल्या काही महिन्यांमध्ये फूलादेवी व हरीकिशन यांच्यातील वाद मोठ्या प्रमाणावर वाढले होते. हरीकिशन वारंवार पूलादेवी यांना मारहाणदेखील करत होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली.

दरम्यान, पोलिसांनी केलेल्या तापासातून हरीकिशन याला फूलादेवी यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता अशी माहिती समोर आली. याच संशयातून त्यांच्यात वारंवार भांडणं व मारहाण होत असल्याचंही पोलिसांना समजलं. हरीकिशनचा ठावठिकाणा शोधण्याच्या प्रयत्नांना २ दिवसांत यश आलं. उत्तर प्रदेश पोलिसांनी हरीकिशनला बाराबंकी परिसरातून अटक केली.

या प्रकरणात हरीकिशनविरोधात हत्या व पुरावे नष्ट करण्यासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं. तसेच, प्रथमदर्शनी विवाहबाह्य संबंधांच्या संशयातून हरीकिशननं पत्नी फूलादेवी यांची हत्या केल्याचं दिसत असल्याचंही पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

### न्यूझीलंडवर करो या मरो

फक्तएका धावेवर बाद केले. त्यानंतर कर्णधार सोफी डिव्हाइनला सहा धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. त्यावेळी भारताचा विजय निश्चित समजला जात होता. पण त्यानंतरही न्यूझीलंडने कडवी लढत दिली. पण भारताच्या अचूक आणि गोलंदाजीपुढे त्यांचे पानही हलले नाही. त्यामुळे भारताला या महत्वाच्या सामन्यात विजय मिळवता आला.

### सरन्यायाधीश गवई यांच्यानंतर

वकिली करण्यासाठी चंदीगडला गेले. त्यांनी संवैधानिक, नागरी आणि सेवा बाबींमध्ये विशेष तज्ज्ञता मिळवली आणि अनेक विद्यापीठे, मंडळे आणि बँकांमध्ये कायदेशीर सल्लागार म्हणून काम केले.

उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय

वकिलीतील त्यांच्या उत्कृष्टतेमुळे त्यांना पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे महाधिवक्ता म्हणून नियुक्त करण्यात आले. २००४ मध्ये त्यांना न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आले आणि नंतर ते हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले. त्यांची स्पष्ट विचारसरणी, निष्पक्ष निर्णय आणि न्यायिक दृष्टिकोनाने त्यांना सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहचवले. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी जेव्हा ते भारताचे ५३ वे सरन्यायाधीश होतील तेव्हा न्यायव्यवस्थेत ऊर्जेचे आणि आशेचे एक नवे युग सुरू होईल. त्यांची नियुक्ती केवळ हरियाणातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील तरुणांना प्रेरणा देणारी आहे कारण एका लहानशा शहरातून त्यांनी हे यश मिळवलेले असेल.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, २४ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# आमखेडा येथे पारधी समाजामध्ये घरगुती वादातून चाकूहल्ला ; एकाचा मृत्यू तर तिघे जखमी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्ह्यातील आमखेडा येथे दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास पारधी समाजामध्ये घरगुती नातेसंबंधांवरून झालेल्या वादातून गंभीर चाकूहल्ला झाला. या हल्ल्यात अविनाश निमिचंद चव्हाण (हम) यांच्या मानेवर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर संदेश निमिचंद चव्हाण, स्वाती शिवा चव्हाण, गजानन निमिचंद चव्हाण, आकाश दर्याभन चव्हाण हे चौघे व्यक्ति जखमी झाले, त्यांना तात्काळ वाशिम येथील सरकारी दवाखान्यात हलविण्यात आले आहे.**





स्थानिक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा हल्ला राजू रामचंद्र पवार (गिव्हा), पवन गजानन चव्हाण (बोराळा), अजय गजानन चव्हाण (बोराळा), दादाराव गंभीर पवार (वाघी) अशोक रामचंद्र पवार (वाघी), सुधाकर रामचंद्र पवार (आमखेडा), इंडियन सारा चव्हाण (उर्फ नावजी जांभरूण), सीताराम पिंटू चव्हाण (नावजी जांभरूण), मोठा पिंटू चव्हाण (नावजी जांभरूण) या सर्वांनी धारदार चाकू व शस्त्रांनी हल्लाकेला त्यात एकाचा मृत्यू झाला, तर इतरांना गंभीर जखमी केले. घटनास्थळी गुन्हेगारांनी वापरलेल्या दोन ते तीन मोटरसायकली जागीच सोडून दिल्या असून, त्यावरील नंबर प्लेट आधीच काढून टाकण्यात आल्याचे पोलिसांना आढळले आहे. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

आमखेडा येथील मृतकाचा देह पोस्टमार्टम साठी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात आणला असता तेथे नातेवाईकाचा आक्रोश सुरू असतानाही वाशिम शहर पोलीस स्टेशनची या परिसरात असलेल्या चौकीवर एकही पोलीस कर्मचारी दिसून आला नाही रात्रीची वेळ असतानाही त्या ठिकाणी पोलीस नसणे हे सर्वसामान्य नागरिकांसाठी चिंताजनक बाब आहे.

## ॲक्युपंचर उपचार पद्धतीला आयुष मंत्रालयात समाविष्ट करा; वैद्यकीय तज्ञांचे साकडे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दुर्धर आजारावर गुणकारी व लाभदायक ठरलेल्या व जगभरात मान्यता पावलेल्या ॲक्युपंचर उपचार पद्धतीचा समावेश केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयात करण्यात यावा, अशी मागणी ॲक्युपंचर प्रॅक्टिसनर असोसिएशन इंडियाच्या वतीने करण्यात आली. याबाबत गुरुवार, २३ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. माधव हिवाळे यांच्या नेतृत्वात संस्थेच्या प्रतिनिधींनी केंद्रीय आयुष मंत्री खा. प्रतापराव जाधव यांना निवेदन दिले.

निवेदनात नमूद आहे की, महाराष्ट्रात २०१५ मध्ये लागू झालेल्या महाराष्ट्र ॲक्युपंचर कायद्यानुसार ॲक्युपंचर उपचार पद्धतीला कायदेशीर मान्यता आहे. त्यामुळे या पद्धतीचा समावेश अलाईड हेल्थ सर्विसेसमध्ये न करता थेट आयुष मंत्रालयात करावा. ॲक्युपंचर ही औषधविरहित, वैज्ञानिक आणि सुरक्षित उपचार पद्धती आहे. कायदेशीर मान्यता मिळालेली आहे. जर अलाईड हेल्थ सर्विसेसमध्ये या पद्धतीचा समावेश केला तर व्यावसायिकांचा दर्जा कमी होईल.

## खऱ्या लक्ष्मीचे पूजन करून दिवाळी साजरी

**अकोला :** 'घरातील जिवंत लक्ष्मीच खऱ्या अर्थाने पूजनीय असते,' हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा एक सुंदर आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणारा उपक्रम समाजसुधारक, समाजसेवक आणि 'निर्भय बनो जनआंदोलन' चे संयोजक तसेच अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन हरणे यांनी यंदाच्या दिवाळीतही कायम ठेवला.जिल्हा परिषद नगर,खडकी बु. ता. अकोला येथील आपल्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गजानन हरणे यांनी पारंपरिक लक्ष्मीपूजनाऐवजी आपल्या घरातील 'खऱ्या लक्ष्मींचे' म्हणजेच पत्नी सौ. यूगेश्वरी हरणे व कन्या कु. अवंती हरणे यांचे पूजन करून दिवाळी साजरी केली.या निमित्ताने त्यांनी त्यांना औक्षण करून, गोड पदार्थांनी सत्कार करून, त्यांच्या चरणी कृतज्ञतेची फुलं अर्पण केली.

## वाशिम एसटी आगाराचे वाहक अमोल वैद्य यांनी प्रवाशाला परत केली ६० हजारांची रोकड आणि मौल्यवान साहित्य असलेली बॅग



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम आगाराचे कर्तव्यनिष्ठ वाहक अमोल वैद्य यांनी पुन्हा एकदा प्रामाणिकतेचा उत्तम आदर्श घालून दिला आहे. प्रवाशाने विसरलेली ६० हजारांची रोकड, लॅपटॉप आणि इतर मौल्यवान साहित्य असलेली बॅग त्यांनी प्रामाणिकपणे परत करून एसटी विभागाची प्रतिष्ठा वाढवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एम एच ४० एन ९७९४ क्रमांकाची छत्रपती संभाजीनगर ते वाशिम ही बस प्रवासात होती. या बसमध्ये

### प्रामाणिकतेचा उत्तम आदर्श!

पैठण येथील प्रवासी भगवान बोबडे हे छत्रपती संभाजीनगरहून जालना येथे उतरले. मात्र त्यांनी चुकून बसमधील रॅकवर आपली बॅग विसरून ठेवली.

बस पुढे वाशिमकडे निघाल्यानंतर वाहक अमोल वैद्य यांना ही बॅग आढळून आली. त्यांनी बॅग उघडून पाहिल्यावर त्यात रु. ६०,००० रोख, लॅपटॉप, दिवाळीसाठी घेतलेले नवीन कपडे, शालेय कागदपत्रे आणि इतर साहित्य असल्याचे दिसले. त्वरित बॅगमधील कागदपत्रांवर असलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून त्यांनी त्या प्रवाशाशी बोलणी केली.

नंतर शिंदखेडराजा येथे बस चालक भास्कर घुगे आणि वाहक अमोल वैद्य यांनी प्रवाशी भगवान बोबडे यांना भेटून त्यांच्या बॅगसह सर्व साहित्य आणि रोकड परत केली. प्रामाणिकतेचा हा नमुना पाहून प्रवाशाने त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. विशेष म्हणजे, हे प्रवासी भाऊबीजेच्या ओवळणीसाठी आपल्या बहिणीकडे जात होते.

यापूर्वीही अमोल वैद्य यांनी जालना येथील एका प्रवाशाची ५० हजार रुपयांची बॅग परत करून आदर्श प्रामाणिकतेचा परिचय दिला होता. आज पुन्हा त्यांनी ६० हजार रुपयांची रोकड आणि इतर साहित्य परत करून आपली सचोटी सिद्ध केली आहे.

## विद्यार्थ्यांची गगनभरारी!




**तेल्हारा :** दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ ला अमरावती विभागस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन स्व. वसंत देसाई स्टेडियम अकोला येथे करण्यात आले होते. या स्पर्धेतील वयोगट १४ मध्ये अमरावती, अकोला, वाशिम ,बुलढाणा, यवतमाळ येथील जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत निवड झालेल्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्वामी विवेकानंद ज्ञानपीठ तेल्हारा येथील चिन्मय अनुप उंबरकार याने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ ला प्रभात किड्स अकोला येथे झालेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

## रांगोळीच्या माध्यमातून एनसीसी विद्यार्थ्यांनी दिला व्यसनमुक्तीचा संदेश; एक पणती व्यसनमुक्तीची

■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशाची नवी पिढी व्यसनमुक्त राहावी तसेच युवकांनी व्यसनापासून दूर रहावे म्हणून या दिवाळीत 'एक पणती व्यसनमुक्तीसाठी' या उपक्रमात श्री बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसी विद्यार्थी यांनी आपल्या घरासमोर सुंदर रांगोळीच्या माध्यमातून जनतेला व्यसनमुक्तीचा संदेश दिला. तंबाखू हे व्यसन शरीराला अत्यंत घातक आहे तंबाखू खाणे म्हणजे जीवनाचा खेळ खल्लास करणे होय. तंबाखू सारख्या घातक व्यसनापासून तरुणांना रोखण्यासाठी शासनाच्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनात बाकलीवाल विद्यालयाच एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी स्पर्धेचे आयोजन केले व एनसीसीच्या विद्यार्थ्यांचा




उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आज युवा पिढी बांधव व्यसनाच्या आहारी जात आहे. तंबाखू, सिगारेट, बिडी, गुटखा यासारख्या व्यसनाने कर्करोग सारखा भयंकर आजार होऊ शकतो. त्यापासून युवापिढीने दूर राहावे म्हणून या दिवाळीत एक पणती व्यसनमुक्तीची लावावी हा संदेश विद्यार्थ्यांनी या रांगोळीच्या माध्यमातुन दिला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विघ्नेश वानखेडे, द्वितीय क्रमांक रजत कुटे, तृतीय क्रमांक वेदिका धामणकर या विद्यार्थ्यांनी पटकावला. यशस्वी या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात येणार आहे. हया सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे ॲड. सुरेंद्रकुमार मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी कौतूक केले.

## दीपोत्सव २०२५: स्वर, संगीत आणि कलेच्या तेजाने उजळली वाशिम नगरी !



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर 'रसिकांची दिवाळी स्वर आणि संगीतातून उजळावी' या संकल्पनेतून 'दीपोत्सव' हा बहारदार गीत-संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम विठ्ठलवाडी सभागृह, वाशिम येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

सायंकाळी ६:४० वाजता दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी आकाशवाणी ज्येष्ठ पत्रकार सुनील कांबळे, रितेश देशमुख, समाजभूषण पुरस्कारप्राप्त कवी-गायक प्रज्ञानंद भगत, शाहीर संतोष खडसे, सामाजिक कार्यकर्ते नारायण सरकटे, तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालय, छत्रपती संभाजीनगरचे सहाय्यक संचालक कार्यालयीन समन्वयक सचिन पाईकराव यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

राज्यस्तरीय संकल्पना – वाशिममध्ये उत्साही प्रतिसाद

या उपक्रमामागे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची संकल्पना असून, सचिव किरण कुलकर्णी (भाप्रसे), संचालक विभीषण चवरे, व सहाय्यक संचालक संदीप बलखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून दिवाळी निमित्त राज्यभरात आयोजित या कार्यक्रमांद्वारे लोककला आणि मराठी गीतसंस्कृतीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करण्यात आले आहे.

**गायक-कलावंतांनी रंगवली सुरेल सायंकाळ :** वाशिमच्या 'दीपोत्सवा'त प्रसिद्ध गायक मयूर सुकाळे (मुंबई), कुणाल वराळे (छ. संभाजीनगर), गायिका पौर्णिमा कांबळे आणि स्थानिक कलावंत शाहीर संतोष खडसे यांनी एकापेक्षा एक सुरेल गीतांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

संगीत, अभंगवाणी आणि मराठी गीतांच्या संगमातून दिवाळीचा हा सुरेल सोहळा रसिकांच्या हृदयात घर करून गेला. सूत्रसंचालन आणि संयोजन कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रसिद्ध निवेदक तथा कवी प्रा. भास्कर पाईकराव यांनी केले.

**लोककलेचा दिवाळी दीप :** वाशिमच्या विठ्ठलवाडी सभागृहात 'दीपोत्सव'मुळे दिवाळीच्या झगमगत्या प्रकाशात स्वर, शब्द आणि कलेचा अनोखा संगम खुलला. मराठी गीत, संगीत, अभंगवाणी आणि लोककलेचा हा सुरेल मिलाफ वाशिमच्या रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

**सुरेल सुरांनी उजळली सायंकाळ :** गायिका पौर्णिमा कांबळे यांनी 'मोगरा फुलला' आणि 'शरद सुंदर रात्री' या गीतांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले, तर मयूर सुकाळे यांनी 'बघ उघडून दार' हे गीत सादर करून दाद मिळवली.

## राजस्थानी सेवा संघाचा दीपावली मिलन सोहळा

**अकोला :** राजस्थानी सेवा संघाच्या वतीने बुधवारी स्थानिक खंडेलवाल भवन येथे राजस्थानी समाजाचा भव्य दीपावली मिलन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.खंडेलवाल वैश्य सभेच्या अतिथ्यात संपन्न या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आ वसंत खंडेलवाल, माजी आ बबनराव चौधरी,माजी आ गोपीकिशन बाजोरिया,माजी आ विप्लव बाजोरिया, माजी महापौर व गुर्जर समाज अध्यक्ष मदन भरगड, माजी महापौर विजय अग्रवाल, राजस्थानी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष एड मोतीसिंह मोहता,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ आरती कुलवाल, सौ अनिता उपाध्याय, सौ सुनीता खंडेलवाल, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, महामंत्री संजय खंडेलवाल,दीपक शर्मा, अग्रवाल आदी उपस्थित होते.

## भव्य एकदिवसीय ध्यान शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट, वाशीम यांच्या वतीने नियमितपणे निशुल्क ध्यान शिबिरे आयोजित करण्यात येत असतात. ध्यान हा मानवी जीवनातील एक अतिशय प्रभावी साधन आहे, ज्यामुळे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक सर्वच पातळ्यांवर सकारात्मक बदल घडून येतात.

नियमित ध्यान केल्याने असाध्य आजारांवर मात करता येते, मन शांत राहते, ताण-तणाव, चिंता, राग, नैराश्य यांसारख्या मानसिक विकारांपासून मुक्ती मिळते. शरीरातील ऊर्जा केंद्रे (चक्रे) संतुलित होतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढते, आणि एकूणच व्यक्तीमध्ये आध्यात्मिक विकास साधला जातो.

या शृंखलेत, येत्या काही दिवसांत वाशीम शहरातील जनतेसाठी भव्य एकदिवसीय ध्यान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. हे शिबिर पूर्णपणे निशुल्क असणार असून, सर्व शिबिरार्थ्यांसाठी अन्नप्रसादाची व्यवस्था सुद्धा निशुल्कच करण्यात आली आहे. या शिबिरात भारतभरातील वरिष्ठ ध्यान मास्टर्स सहभागी होणार असून, ते ध्यानाचे विविध टप्पे, योग्य श्वासोच्छ्वास पद्धती, आणि ध्यानाद्वारे जीवनातील सकारात्मक बदल याविषयी मार्गदर्शन करतील.

या शिबिरादरम्यान वाशीम शहरात काही ठिकाणी पिरॅमिडची स्थापना देखील करण्यात येणार आहे. पिरॅमिड हा केवळ वास्तू नसून ऊर्जेचा शक्तिशाली स्त्रोत मानला जातो.

पिरॅमिडची रचना विशिष्ट प्रमाणात — ५० अंश ५१ मिनिटांच्या कोनात तयार केली जाते. या अचूक कोनामुळे पिरॅमिडमध्ये ब्रह्मांडातून येणारी कॉस्मिक एनर्जी (ब्रह्मांडी ऊर्जा) तीनपट अधिक प्रमाणात केंद्रित होते. या ऊर्जेमुळे ध्यान लवकर लागते, मन स्थिर राहते आणि रोग-व्याधींपासून मुक्तता मिळते. पिरॅमिडमध्ये बसून ध्यान केल्यास व्यक्तीची आत्मिक ऊर्जा वाढते, मेंदू शांत व तल्लख बनतो, तसेच जीवनात आनंद, समाधान आणि संतुलन येते. या शिबिराचे नियोजन वाशीम पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटच्या सक्रिय टीमने केले आहे. या समितीमध्ये रुपेश लड्ढा, सुमित खत्री, संजय व्यास, एकनाथ सुरुशे, रवींद्र बैतुळे, राम भाटी, डॉ. नारायण डाळे आणि इतर सदस्यांचा सक्रिय सहभाग आहे. संस्थेचा उद्देश आहे 'प्रत्येकाने ध्यान करावे आणि आनंदी जीवन जगावे.'

ध्यानाद्वारे समाजात शांती, प्रेम आणि जागरूकता पसरविणे हेच पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटचे मुख्य ध्येय आहे. समितीने पुढील महिन्यातील नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी हे भव्य ध्यान शिबिर आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

## धनादेश रक्कम भरली तरी शिक्षा अनिवार्य

### महिला आरोपीस धनादेश अनादर प्रकरणी शिक्षा

■ प्रतिनिधी | अकोला ■

समित्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अकोला शाखा (तिलक रोड) यांनी दाखल केलेल्या धनादेश अनादर प्रकरणात आरोपी हेमलता सुधीर बन्ने हिला आज शिक्षा सुनावण्यात आली.

वि. सातवे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी श्रीमती जांभळे यांनी एन.आय. ॲक्ट कलम १३८ अन्वये दिलेल्या निकालात आरोपीस कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा व धनादेश रक्कमे सोबत २०,००० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. प्राप्त माहितीनुसार, आरोपीने बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या अंशतः परतफेडीसाठी धनादेश दिला होता. मात्र तो धनादेश अनादरित झाल्याने बँकेने कायदेशीर कारवाई करत नोटीस व इतर सोपस्कार पूर्ण करून न्यायालयात तक्रार दाखल केली.

प्रकरण चालू असतानाच आरोपीने अनादरित धनादेशाची रक्कम न्यायालयात जमा केली होती. तरीही न्यायालयाने सर्व बाबींचा विचार करून आरोपीस शिक्षा दिली.या निर्णयामुळे समाजात एक सकारात्मक संदेश गेला असून, 'धनादेशाची रक्कम परत भरली तरी कर्ज किंवा आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात आरोपीस शिक्षा होऊ शकते' हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.या प्रकरणात बँकेच्या वतीने अधिवक्ता गणेशलाल परियाल यांनी काम पाहिले असून त्यांना अधिवक्ता अक्षय नवलकार यांनी सहकार्य केले.

## अवघ्या दोन तासांत अडत दुकानफोडीचा गुन्हा उघडकीस

### रिसोड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील चार अडत दुकाने फोडून चांदीचे सिक्के व रोख रक्कम चोरल्याची घटना घडल्यानंतर अवघ्या दोन तासांत गुन्हा उघडकीस आणत रिसोड पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील डी.बी. पथकाने आरोपीस जेरबंद करत पोलिसांची कार्यक्षमता पुन्हा सिद्ध केली.

ही घटना दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी उघडकीस आली. फिर्यादी किसन धनराज अग्रवाल (वय ४९, रा. गजानन नगर, रिसोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की त्यांनी त्यांचे अडत दुकान २१ ऑक्टोबरच्या रात्री १०.३० वाजता बंद केले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वाजता सेक्युरिटी गार्डने फोन करून दुकान फोडल्याची माहिती दिली. तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता दुकानाचा दरवाजा, सीसीटीव्ही कॅमेरे, टेबलचा ड्रॉवर तुटलेला आढळला. तसेच शेजारील तीन दुकाने देखील फोडलेली असल्याचे दिसून आले. चोरट्यांनी एकूण



सुमारे ४५,३०० किंमतीचा माल लंपास केला होता.

सदर घटनेवरून अज्ञात आरोपीविरुद्ध रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याच्या तपासासाठी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी.बी. पथकास तातडीने सूचना दिल्या. पथकातील अधिकारी व अंमलदारांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक साधनांच्या साहाय्याने संशयितांचा शोध सुरू केला. केवळ दोन तासांच्या आत पोलिसांनी वाढोणा (जि. हिंगोली) येथील शेतशिवारातून ज्ञानेश्वर भिमा पवार (वय ४४, रा. समर्थनगर, रिसोड) यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यास अटक केली असून त्याच्या साथीदारांपैकी दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे (IPS), अपर पोलीस अधीक्षक लता फड, आणि सहायक पोलीस अधीक्षक नवदिष अग्रवाल (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली, तर पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आघाव, पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार प्रशांत राजगुरू, श्रीकिसन नागरे, तसेच पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे आणि रवि इरतकर यांचा समावेश होता.

रिसोड पोलीस ठाण्याच्या तत्परतेमुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, ठाणेदार चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२४ ■ शुक्रवार, २४ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## झेंडूला कवडीमोल भाव; शेतकऱ्यांसोबत विक्रेत्यांची दिवाळी अंधारात


### -फुलशेती कोलमडली, फटाक्यांच्या तेजात शेतकऱ्यांचा संघर्ष हरवला

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी म्हणजे प्रकाश, आनंद आणि उत्सवांचा सण. परंतु या वर्षी शहरासह ग्रामीण भागात झेंडूच्या फुलांना कवडीमोल दर मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांसह विक्रेत्यांच्या घरात निराशेचे सावट दाटले आहे. दिवाळीच्या काळात पूजेसाठी आणि सजावटीसाठी झेंडूला नेहमी मोठी मागणी असते, मात्र यंदा बाजारपेठेत प्रती किलो फक्त १५ ते २० रुपये दर झेंडूला मिळतो आहे. महागड्या बी-बियाण्यांचा, खतांचा, मजुरीचा व वाहतुकीचा खर्च भरूनही निघत नसल्याने फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे गणित बिघडले आहे. तर शहरातील अनेक चिल्लर विक्रेत्यांनी झेंडूचे फूल मोठ्या प्रमाणात घेतले मात्र विक्री न झाल्याने रात्रीच्या वेळी झेंडूची फुले रस्त्यावर टाकून फुल विक्रेते निघून गेले, तर शहरातील अनेक चौका चौकात फुलांचा सडवा दिसून आला, यावेळी अनेकांनी प्लास्टिक फुलांचा वापर केल्याने झेंडूच्या फुलाकडे नागरिकांनी पाठ फिरवली, साठवणूक सुविधा, आधारभाव आणि हमीभावाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांना अक्षरशः तोटा सोसावा लागत आहे .दिवाळीच्या झगमगाटात शहरातील फटाका विक्रेत्यांच्या दुकानांवर मात्र ग्राहकांची मोठी गर्दी आहे. फटाक्यांच्या भावात झालेल्या वाढीमुळे व्यापाऱ्यांचा खिसा फुगतो आहे, तर शेतकऱ्यांचा घाम मातीमोल होत आहे. शासनाच्या उदासीन भूमिकेबद्दल ग्रामीण भागात संताप व्यक्त होत आहे.शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, फुलशेतीसाठी कोणतीही ठोस योजना किंवा हमीभाव यंत्रणा नसल्याने त्यांचा व्यवसाय पूर्णपणे जोखमीचा बनला आहे. फुलं नेण्याचा, मजूर ठेवण्याचा आणि दररोज बाजारात बसण्याचा खर्च वाया जातो आहे. काही ठिकाणी विक्रेते न मिळाल्याने फुले रस्त्यावर टाकावी लागली, असे दृश्यदेखील जिल्ह्यात पाहायला मिळाले.या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने हस्तक्षेप करून फुलशेतीला आधारभाव, साठवणूक सुविधा आणि स्थिर बाजारव्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे, अशी मागणी शेतकरी प्रतिनिधींनी केली आहे. दिवाळीचा आनंद सर्वांच्या घरात यावा, यासाठी झेंडूवाल्या शेतकऱ्यांच्या घरात प्रकाश आणण्याची वेळ आता शासनावरच आली आहे.



## दिवाळीत रंगांची उधळण: नितीन निंबलवार यांच्या रांगोळीवर कौतुकाचा वर्षाव

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी म्हटली की प्रकाश आणि रंगांचा उत्सव शहरातील मुद्रण व्यवसायी आणि प्रतिभावान कलाकार नितीन निंबलवार यांनी या उत्सवाला साजेशी मनमोहक रांगोळी साकारत सर्वांचे लक्ष वेधले आहे.परंपरेचा आदर आणि सर्जनशीलतेचा संगम असलेली ही रांगोळी पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी उसळली. प्रत्येक रंग आणि रेषेतून दिवाळीचा आनंद, संस्कृतीचा गंध आणि कलाविष्काराची झळाळी प्रकट झाली.या कलाकृतीने निंबलवार यांच्या कलाप्रेमाची प्रचीती पुन्हा एकदा दिली असून, वर्धा जिल्हा मुद्रक असोसिएशन तर्फे त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. शहरवासीयांनी त्यांच्या कौशल्याला मनापासून दाद दिली आहे.




## दिवाळी-पाडव्याच्या निमित्तानं उमेदवारांची रंगीत तालीम

### -राजकारण 'सणमय'; शुभेच्छा, चरणस्पर्श आणि गुप्त सौदेबाजीची लगबग

**वर्धा जनमाध्यम :** सत्तेच्या रंगमंचावर पुन्हा एकदा रोषणाई, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची चाहूल लागताच वर्धा जिल्ह्यातील राजकारणात दिवाळीपेक्षा जास्त झगमगाट दिसू लागला आहे.



दारोदार शुभेच्छा, हात जोडून चरणस्पर्श आणि हसऱ्या चेहऱ्यामागचे गणित हीच सध्या वर्ध्याची खरी राजकीय दिवाळी म्हटली जाते.सात-दहा वर्षांपासून जिल्ह्यात निवडणुका ठप्प. आता जिल्हा परिषदेच्या ५२ जागा, सहा नगरपालिकांची खु ची आणि पंचायत समित्यांची समीकरणे यामुळे प्रत्येक इच्छुकाची झोप उडाली आहे.

पंधरवड्यात निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल, या शक्यतेने आकांक्षी नेत्यांनी सणासुदीच्या भेटीगाठींतूनच रंगीत तालीम घेण्यास सुरुवात केली.महायुतीत अजून एकमत नाही. भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्र लढणार की नाही, यावर संभ्रम आहे. त्या गोंधळात आघाडी मात्र एकजूट दाखवू पाहतेय. उद्धव ठाकरे यांच्या उद्धव सेनेपासून ते शिंदे गटापर्यंत सर्वांनी मतदारांशी संवादाचे दार ठोठावले आहे, तर काँग्रेस अजूनही उमेदवार शोधण्याच्या टप्प्यात अडकलेली दिसते. गावोगावी सणाच्या निमित्ताने शुभेच्छांच्या कार्यक्रमांमधून उमेदवारांनी पाय धरत मतदारांना हसरे आश्वासन दिले. अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनाही आम्ही आहोत तुमच्या सोबत असा दिलासादायक सूर उमेदवार देताना दिसले. दिवाळीचा सण संपला, पण राजकीय पाडवा आता दिवसेंदिवस रंगतोय हेच वर्ध्याचं सध्याचं चित्र.

## देवळीतील श्री संत साबाजी महाराज पुण्यतिथी उत्सवास रविवारी प्रारंभ

**देवळी जनमाध्यम :** अग्रवाल परिवाराच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत साबाजी महाराज पुण्यतिथी उत्सवाची उत्सवी सुरुवात रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी होत आहे. श्री संत साबाजी महाराज मंदिरात कार्तिक शुद्ध पंचमी ते द्वादशी (२६ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर) दरम्यान हा आठ दिवसांचा कार्यक्रम पार पडणार आहे.सकाळी काकडा, अभिषेक, देवपूजन आणि आरतीने दररोजचा कार्यक्रम सुरू होईल. ह.भ.प. रत्नाकरराव कल्याणी, ह.भ.प. सत्यविजय येसनखेडे, ह.भ.प. रामुजी पाटील यांच्यासह वारकरी भजन मंडळ सहभाग घेणार आहे. संध्याकाळी हरीपाठ व सामुदायिक प्रार्थनेनंतर रात्री ८ ते १० या वेळेत महिला भजन मंडळांचे भजन होणार आहे. दररोज वेगवेगळ्या महिला भजन मंडळांकडून संतगीतमय सादरीकरणे होतील. मुख्य कार्यक्रमाचे आकर्षण सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी असणार असून दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत ह.भ.प. प्रशांत महाराज मानमोडे (कारंजा, जि. वर्धा) यांचे गोपालकाल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर प्रदक्षिणा, दहीहांडी व सायं. ६.३० पासून महाप्रसादचा कार्यक्रम होईल.या पुण्यतिथी उत्सवासाठी सर्व गावकऱ्यांनी, श्रद्धावान भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक मोहन अग्रवाल आणि अग्रवाल परिवार, यांनी केले आहे.

## श्री यंत्र मंदिरात दिवाळी पंचमी दीपोत्सव भक्तिभाव, आनंद आणि संस्कृतीचा तेजोमय संगम

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी-शिरपूर रोडवरील जगातील एकमेव श्रीचक्र आकाराचे गर्भगृह असलेल्या श्री यंत्र मंदिरात दिवाळी पंचमी निमित्ताने यंदा दीपोत्सवाचा दिव्य सोहळा रविवारी (दि. २६ ऑक्टोबर) सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. श्री रेणुका देवींच्या सान्निध्यात सामूहिक दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला प्रारंभ होईल.मंदिर परिसर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघणार असून विद्युत रोषणाई, फुलांची सजावट, देखणी रांगोळी आणि पारंपरिक संगीताने वातावरण आनंदमय होणार आहे. डीजे भक?तीगीते, गरबा नृत्य आणि आतषबाजीने उत्सवाला चैतन्य मिळणार आहे.मंदिर समितीने सर्व भक्तांना सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन केले असून, भक्तांनी आपल्या हातची पणती घेऊन येत रेणुका माऊलींच्या चरणी अर्पण करावी, असे सांगण्यात आले आहे. सामूहिक नैवेद्य आणि प्रसादाचे वितरण उत्सवाच्या अखेरीस होईल. या दीपोत्सवाचा हेतू केवळ दिव्यांचा नव्हे, तर भक्ती, प्रेम आणि संस्कृतीचा प्रकाश जागविणे हा असल्याचे आयोजक माजी नगराध्यक्ष प्रशांत सव्वालाखे यांनी सांगितले.



## विधवेचा राखेत गेला संसार.. आ.कुणावारांनी दिला नवसंजीवनीचा हात

### संकटात उजळली वडनेर गावची दिवाळी

**हिंगणघाट जनमाध्यम :** वडनेर येथील विधवा मंजुळा दांडेकर यांच्या घराला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण घरसंसार राखेत मिळाला. कपडे, धान्य, घरगुती साहित्य सगळं काही काही क्षणांत जळून गेलं. रविवारी पहाटे घडलेल्या या घटनेने गावात हळहळ व्यक्त झाली. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र संसार उद्ध्वस्त झाला.



या घटनेची माहिती समजताच आमदार समीर कुणावार यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानाचा आढावा घेतला. आगग्रस्त दांडेकर यांना जीवनावश्यक साहित्य, कपडे तसेच घराच्या पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत देऊन त्यांना धीर दिला. या कठीण प्रसंगात आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असा आश्वासक शब्द आमदार कुणावार यांनी दिला.मंजुळा दांडेकर या कष्टाळू आणि आत्मनिर्भर महिला आहेत. स्वतःच्या मेहनतीने उभा केलेला संसार आगीत राख झाला; पण आमदार कुणावार यांच्या मदतीमुळे तो पुन्हा उभा राहू लागला आहे. ही मदत त्यांच्या जीवनात केवळ आर्थिक नाही, तर भावनिक आधारही ठरली. दिवाळी म्हणजे फक्त दिव्यांचा सण नव्हे, तर एखाद्याच्या आयुष्यात आशेचा दिवा लावण्याची संधी, असं आमदार कुणावार यांनी यावेळी सांगितलं. या कार्यक्रमाला भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वंचितांसाठी उजळली दिवाळी : अहिल्या बचत गटाचा उपक्रम कौतुकास्पद



**वर्धा जनमाध्यम :** समाजातील वंचित घटकांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा प्रकाश फुलविण्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई सोशल असोसिएशनच्या सौजन्याने अहिल्या बचत गटतर्फे दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम हाती घेण्यात आला. देवपूजेने सुरू झालेल्या या उपक्रमाला उत्साही प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या नवनियुक्त जिल्हाध्यक्षा श्रीमती अरूणा धोटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासह वर्षा दौड, कुमारी स्वरुपादेवी हजारे, भाग्यश्री उराडे, संगीता ठवळे, मनीषा फिसके, कमाल डगवार आणि शालिनी मरसकोल्हे या मान्यवर उपस्थित होत्या.या उपक्रमातून महिलांनी एकजुटीने समाजसेवेचा उत्तम संदेश दिला असून फराळ वाटपामुळे गरजू कुटुंबांमध्ये सणाचा उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

## गिरडच्या मातीतील पहलवानांचा दमदार डाव

### -११३ वर्षांची अखंड परंपरा : जोशात रंगली कुस्ती आमदंगल

**समुद्रपूर जनमाध्यम :** दिवाळी पाडव्याच्या दिवशी गिरड ग्रामस्थांसाठी कुस्तीची आमदंगल हा एक सोहळाच असतो. श्रीराम मंदिर देवस्थानांतर्गत हनुमान व्यायाम शाळेच्या वतीने या पारंपरिक आमदंगलीला यंदा ११३ वर्षे पूर्ण झाली असून, या अखंड परंपरेने दिवाळीचा उत्साह अधिकच वाढवला. पोलिस ठाण्याच्या मैदानावर दिवसभर सुरू राहिलेल्या आमदंगलीत गिरड, सिर्सी, बेसूर, महालगाव, केसलापूर, पिपरा, सावंगी, उमरेड, चिमूर आदी गावांतील नामांकित पहलवानांनी लाल मातीत ताकद, डावपेच आणि चातुर्याचे कसलेले प्रदर्शन सादर केले. प्रत्येक झुंजीवर प्रेक्षकांचा जयघोष ऐकू येत राहिला.कार्यक्रमास पोलिस उपनिरीक्षक गोमेद पाटील, बहादुरसिंग अकाली, श्रीराम मंदिर देवस्थानचे अध्यक्ष बळवंत गाठे, सचिव संदीप शिवणकर, कोषाध्यक्ष सुधाकर बाकडे व पत्रकार निर्भय पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. पंचपदाची जबाबदारी डॉ. गोपीकृष्ण थुटे आणि प्रशांत लांडे यांनी पार पाडली.१९१२ साली श्रीराम देवस्थानाचे मठाधिपती सीताराम महाराज यांनी सुरु केलेली ही कुस्ती परंपरा आजही गावातील तरुणांमध्ये व्यायाम, तंदुरुस्ती आणि पारंपरिक खेळांविषयी प्रेरणा जागवते. आयोजनाच्या यशात विकी सहारे, मंगेश दोडके, सचिन शेळके, वैभव अंडरस्कर, मंथन भांदककर, तसेच हनुमान व्यायाम शाळेचे सदस्य आणि सोनामाता युवा प्रसारक मंडळाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.गिरडच्या मातीतल्या या कुस्ती आमदंगलीने परंपरेसोबतच गावाची एकता, स्फूर्ती आणि उत्साह यांचा सुंदर संगम घडवून दिवाळीचा आनंद दुणावला.



## शेतकऱ्यांच्या मनातला आमदार नाचणगाव शिवारात आ. बकाने यांची भावनिक भेट

**देवळी जनमाध्यम :** बलिप्रतिपदेच्या शुभदिनी नाचणगाव शिवारातील सटवाई माता मंदिरात आमदार राजेश बकाने यांनी शेतकरी व शेतमजूर बांधवांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर खुला संवाद साधत त्यांनी संवेदनशील नेतृत्वाचं दर्शन घडवलं.पूजेनंतर आमदार बकाने म्हणाले, शेतकऱ्यांच्या घामाचे सोनं व्हावं, मेहनतीला न्याय मिळावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम व्हावी, हाच माझा संकल्प आहे. विजेची तुटवड्याची समस्या, सिंचन सुविधा, बाजारभावातील चढ-उतार आणि पीकहानी यांसारख्या विषयांवर त्यांनी शेतकऱ्यांकडून थेट मते जाणून घेतली. प्रत्येक प्रश्न शासनापर्यंत पोहोचवण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.



भावनाविवश होत आमदार बकाने म्हणाले, मी फक्त प्रतिनिधी नाही तर या भूमीचा पुत्र आहे. माझं नातं शेतकऱ्यांशी राजकारणाचं नाही, रक्ताचं आहे. या संवाद सोहळ्याला राहुल चोपडा, दिनकर ओक, जयंत ओक, प्रवीण सावरकर, भाजपा पुलगाव शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, नाचणगाव मंडळ अध्यक्षा जयश्री मोकदम यांसह अनेक मान्यवर आणि शेतकरी उपस्थित होते.या भेटीद्वारे आमदार बकाने यांनी पुन्हा एकदा सिद्ध केलं की, ते केवळ राजकारणी नसून शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे लोकनायक आहेत.

## वाघेडा-लसनपूर रस्त्यावरील पुलाच्या दुरुस्तीला आ.कुणावार यांची तातडीची दखल

**समुद्रपूर जनमाध्यम :** अतिवृष्टीमुळे वाघेडा-लसनपूर रस्त्यावरील पुलाचा भाग खचल्याने वाहतुकीस अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पुलाच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी वाघेडा ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे आमदार समिर कुणावार यांच्याकडे केली होती. मागणीची त्वरित दखल घेत आमदार कुणावार यांनी संबंधित विभागाच्या अभियंत्याला पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या मार्गावरूनच वाघेडा गावाचा मुख्य रस्त्याशी संपर्क असल्याने पुलाची दुरवस्था नागरिकांसाठी मोठी समस्या ठरत होती. ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावेळी सरपंच अमोल मसराम, उपसरपंच रवींद्र ठोंबरे, तसेच ग्यानी शिरोडे, शेषराव तुळणकर, रवींद्र लडी आणि होमराज आराडे उपस्थित होते. आमदारांनी दिलेल्या त्वरित प्रतिसादामुळे परिसरातील ग्रामस्थांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## कॅन्सरच्या रुग्णाचा जबडा काढून त्वचेची सर्जरी

### -सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे प्रथमच 'फ्री फ्लॅप' शस्त्रक्रिया

**अमरावती /प्रतिनिधीः-** संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे मायक्रोव्हस्कुलर (फ्री फ्लॅप) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. यामध्ये कॅन्सरच्या रूग्णाचा पूर्ण जबडा बाहेर काढून त्या जागी पुन्हा त्वचेची सर्जरी करण्यात आली. अशा प्रकारची शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे पहिल्यांदाच झाली आहे, हे विशेष.सदर रुग्ण हा ३२ वर्षीय पुरुष असून, तो अमरावती येथील रहिवासी आहे. त्याच्या तोंडाच्या कॅन्सरची शस्त्रक्रिया करण्यात आली; मात्र या शस्त्रक्रियेमुळे ओठ व गालाच्या आतील पूर्ण भाग (जबडा) काढण्यात आला. त्यामुळे चेहऱ्यावर खड्डा पडला आल्याने सदर रुग्ण नैराश्येत जाण्याची भिती होती. अशा परिस्थितीत 'फ्री फ्लॅप' शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यामुळे कॅन्सरची शस्त्रक्रिया करतानाच प्लास्टिक सर्जरी व कॅन्सर सर्जरीच्या चमूने सदर रुग्णाच्या हाताची त्वचा काढून ती रूग्णाच्या चेहऱ्याला लावून शखक्रिया केली. या शस्त्रक्रियेने रुग्णाचा चेहरा आता पूर्वीप्रमाणेच पूर्ववत दिसतो. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विनामूल्य करण्यात आली.

## पंचवटीत वाहनाला लागली आग; अग्निशमन दलाचा तत्पर हस्तक्षेप

**आर्वी जनमाध्यम :** पंचवटी परिसरातील प्रवीण दुपारे यांच्या घरासमोरील वाहनाला आज गुरुवारी सायंकाळी अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने अग्निशमन दलाच्या तात्काळ प्रतिसादामुळे मोठ्या अनर्थाचा संभव टाळला गेला.गांधी विद्यालयाजवळील फटाका दुकाने परिसरात ड्युटीवर असलेल्या आर्वी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला ही घटना सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता दूरध्वनीद्वारे कळताच, जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आग लागलेल्या वाहनावर सलग पाण्याचा मारा करून दलाने आग पूर्णपणे आटोक्यात आणली.या मोहिमेत वाहन चालक कम ऑपरेटर नरेश आखरे, तसेच बबन बावनकर, शिवाजी चिमोटे, महेंद्र गोयर, अरुण पंड्या, करण चावरे, रणजीत गोयर आदी कर्मचारी सहभागी झाले होते. दलाच्या तत्परतेमुळे परिसरातील लोकांनी सुटकेचा निश्वास सोडला.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

## गोपीनाथ मुंडेंचा वारसा, फक्त आणि फक्त माझी पंकू ताई प्रकाश महाजनांची पोस्ट चर्चेत

**मुंबई/प्रतिनिधी :** गोपीनाथ मुंडेंच्या राजकीय वारसदारावरून सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे हेच खरे वारसदार असल्याचे म्हटले, तर प्रकाश महाजन यांनी पंकजा मुंडेंना पाठिंबा



दिला. छगन भुजबळांनीही धनंजय मुंडेंनाच वारसदार ठरवले होते. गेल्या काही दिवसांपासून गोपीनाथ मुंडेंचे राजकीय वारसदार कोण यावरुन सातत्याने चर्चा सुरु आहेत. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनजंय मुंडे यांच्यावर टीका करणा-या करुणा मुंडे शर्मा यांनी त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत. राजकारणात पोटचा नव्हे तर विचारांचा वारसा असतो. हे धनंजय मुंडे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे गोपीनाथ मुंडे यांचे खरे वारस धनंजय मुंडे हेच आहेत, असे विधान करुणा शर्मा यांनी केले होते. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया समोर येत आहे. आता यावर मनसेचे माजी प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रकाश महाजन यांनी नुकतंच त्यांच्या अधिकृत फेसबुकवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी करुणा मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. तसेच गोपीनाथ मुंडे यांच्या ख-या वारसदार पंकजा मुंडे आहेत, असे विधान प्रकाश महाजन यांनी केले आहे. क्या जमाना आ गया, स्वर्गीय मुंडे साहेबांचा वारस कोण ठरवत आहे, एक भ्रष्टाचारी कारागृहात बरेच महिने काढून आलेला आणि दुसरी जी रोज उठून आपल्याच कुंकवाची अब्रू जगाच्या वेशीवर टांगते. स्वर्गीय मुंडे साहेब यांचा वारसा मग तो सामाजिक असो किंवा राजकीय असो, फक्त आणि फक्त माझी पंकू ताई , दुसरे कोणी नाई, असे प्रकाश महाजन म्हणाले. दरम्यान बीडमधील ओबीसींच्या महाएल्गार सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारस धनंजय मुंडे हेच आहेत. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी त्यांनी काम करावे, असे म्हटले होते. यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्यात. त्यातच याच विषयावरून करूणा मुंडे यांनी भाष्य करत चक्क धनंजय मुंडे यांचे कौतुक केले. त्यांच्या राजकीय संघर्षाचे आपण साक्षीदार आहोत, २००९ ते २०१९ दरम्यान, धनंजय मुंडे यांनी जो संघर्ष केला, त्यात मी ही होते, असे करूणा मुंडे म्हणाल्या. छगन भुजबळ यांनी १०० टक्के सत्य सांगितलं आहे. राजकारणामध्ये पोटचा वारसा नसून तो विचारांचा वारसा असतो आणि आज ते धनंजय मुंडे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. घरामध्ये वाद झाला होता, मात्र धनंजय मुंडे यांनी गोपीनाथ मुंडेंसारखच तळागाळामध्ये जाउन स्वतःचे व्यक्तिमत्त्व निर्माण केलं. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा खरा राजकीय वारस हे धनंजय मुंडेच आहेत आणि त्यांची सून म्हणून मी सुद्धा. धनंजय मुंडे यांनी आपलं कर्तव्य पार पाडलं, असेही करूणा मुंडे यांनी म्हटले. पंकजा मुंडेंना हरवण्यामध्ये भाजपाचा हात होता. त्यामध्ये पंकजा मुंडे यांचं खच्चीकरण झालं.

## लम्पी आजाराने आठ गाईंचा मृत्यू पशुपालकांमध्ये भीती, बार्शीटाकळी तालुक्यातील घटना

**अकोला-** जिल्ह्याच्या बार्शीटाकळी तालुक्यातील जनुना पुनर्वसन येथील एका पशुपालकाच्या आठ गाईंचा लम्पी आजाराने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली, भीमराव खंडारे या पशुपालकाच्या आठ गायी गंभीर साथीच्या आजाराने दगावल्या, भीमराव खंडारे यांच्याकडे तब्बल १६० गाई, गुरे असून ते अनेक वर्षांपासून पशुपालनाचा व्यवसाय करतात, अकोला जिल्ह्यात व इतर जिल्ह्यात सुद्धा गुरे चारण्यासाठी आपली गुरे ते कळपाच्या स्वरूपात घेउन जातात, सध्या चारा उपलब्ध असल्याने या सर्व गायी, गुरे जनुना शिवारात आहेत, लम्पी सारख्या साथीच्या आजाराने यापैकी आठ गाईंचा मृत्यू झाला असून अनेक गाई गंभीर अवस्थेत असल्याची माहिती पशुपालक खंडारे यांनी दिली

## तलवार व लोखंडी कोयत्यासह एक जेरबंद

**बारामती -**एमआयडीसी परिसरात दहशत माजविण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे तलवार आणि लोखंडी कोयता बाळगणा-या व गुन्ह्याच्या वेळी या हत्यारांचा वापर एका करणा-या आरोपीवर कारवाई करत बारामती तालुका पोलिसांनी अटक केली आहे. समर्थ सिद्ध मल्हारे (रा. मालुसरेवस्ती, वंजारवाडी, ता. बारामती) असे या आरोपीचे नाव आहे.

## पासपोर्ट रद्द करण्याचा निर्णयामुळे घायवळ यांच्या अडचणींमध्ये वाढ!

**मुंबई-**निलेश घायवळ प्रकरणात आता सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. घायवळचा पासपोर्ट अखेर रद्द करण्यात आला असून, प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाकडून यासंदर्भात आदेश जारी झाले आहेत. पुणे पोलिसांनी काही दिवसांपूर्वी न्यायालयासह पासपोर्ट प्रादेशिक कार्यालयात घायवळविरुद्धचा तपशीलवार अहवाल सादर केला होता. या निर्णयामुळे घायवळच्या अडचणी आणखीनच वाढल्या आहेत.

## शरद पवारांना धक्का! राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष विखे पाटलांच्या भेटीला!

**मुंबई-**आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांनी बुधवारी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची शिर्डी येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, भांगरे यांनी आपल्या आई, सुनीता भांगरे यांच्यासह विखे-पाटलांशी बंद दाराआड चर्चा केल्याने त्यांच्या संभाव्य राजकीय भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले असून बंद दाराआड नेमके काय शिजले? याची जोरदार चर्चा होत आहे.

## मान्सूनच्या माघारीनंतर नागपूर राज्यातील सर्वाधिक प्रदूषित शहर

**मुंबई-**राज्यातून मान्सून माघारी गेल्यानंतर वातावरणातील कोरडेपणा वाढल्याने नागपूरमध्ये हवेचे प्रदूषण झपाट्याने वाढले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १७ ते २३ ऑक्टोबरदरम्यानच्या आकडेवारीनुसार, नागपूर हे राज्यातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. दरम्यान, मुंबई, पुणे, नाशिक आणि औरंगाबादला अधूनमधून झालेल्या पावसाचा आणि आर्द्रतेचा फायदा झाल्याने या शहरांमधील धूळकणांचे प्रमाण कमी झाले आहे.

## आजाराला कंटाळून तरूणाने रूग्णालयातच घेतला गळफास,अकोल्यात खळबळ

***अकोला-*** शहरातील एका हास्पिटलमध्ये आज सकाळी उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णाने गळफास घेउन आत्महत्या केली. मृताचे नाव अमोल कावनपुरे (वय ३२, रा. पहाडीपुरा, बनोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती) असे आहे. अमोल हा २८ ऑक्टोबर रोजी पायाच्या उपचारासाठी हास्पिटलमध्ये दाखल झाला होता. आज सकाळी नर्सने रुग्णाची रूम बंद असल्याचे लक्षात घेतले. दरवाजा तोडून पाहिले असता, अमोलने दुपट्ट्याने पंख्याला गळफास घेतल्याचे दिसले. डाक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलीस घटनास्थळी पोहोचले असून, पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरणी नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. मात्र ही आत्महत्या आजाराला कंटाळून केली असल्याची चर्चा आहे.

## 60 लाखांची खंडणी मागणा-या बंटीवर गुन्हा दाखल

**नागपुर**-कुख्यात गुंड बंटी उर्फ संतोष शाहूने व्यापा-याला पिस्तुलाचा धाक दाखवून तब्बल ६० लाखांची खंडणी मागितल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी लकडगंज पोलिसांनी बंटी आणि त्याचे साथीदार राजदीप उर्फ गोल्डी शाहू आणि आणखी दोघांविरुद्ध खंडणीसह इतर गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार चंद्रशेखर शिवचरण प्रजापती (३८, रा. बिनाकी मंगळवारी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घाला म्हणणारे लोक मूर्ख आणि राष्ट्रद्रोही-चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) ही राष्ट्रसेवा, समाजाची सेवा आणि राष्ट्र निर्माण यासाठी कार्य करणारी देशातील प्रमुख संस्था आहे. या संस्थेवर बंदी घालण्याची मागणी करणारे लोक मूर्ख आणि राष्ट्रद्रोही आहेत, अशी जोरदार टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे भंडारा या ठिकाणी केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशात राष्ट्रभावना निर्माण केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेत संघाची विचारधारा प्रतिबिंबित होते. त्यामुळे जो कोणी संघावर बंदी घालण्याचा विचार करतो, तो खरं तर राष्ट्रद्रोही आहे असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. आजवर एकाही सरकारने ३२ हजार कोटींचं पॅकेज दिलं नाही-बावनकुळे



बावनकुळे यांनी एका बाजूला राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याच्या विचाराला राष्ट्रद्रोह म्हटलं. तर दुसरीकडे महायुती सरकारचं शेतकरीपक्षीय धोरण आणि विरोधकांच्या आरोपांना उत्तर देत सरकारच्या भूमिकेचं ठाम समर्थन केलं. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेतक-यांना ३२ हजार कोटी रुपयांचं पॅकेज दिलं नव्हतं. हे पॅकेज शेतक-यांना दिलासा देणारे ठरणार असून रब्बी हंगामासाठी आवश्यक भांडवल उभं करण्यास मदत करेल. आम्ही शेतक-यांचं संपूर्ण नुकसान भरून काढू असं म्हणत नाही, पण हे पॅकेज शेतक-यांना नव्याने उभं राहण्याची ताकद देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नाना पटोले यांनाही दिलं प्रत्युत्तर**

नाना पटोले यांनी शेतक-यांची दिवाळी अंधारात गेली असा आरोप केला होता,.त्यावर प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने दिवाळीपूर्वीच शेतक-यांसाठी ठोस उपाययोजना केल्या आहेत. विरोधक फक्त टीका करतात, पण त्यावरील उपाय दाखवत नाहीत.

**मतचोरीच्या आरोपांबाबत काय म्हणाले बावनकुळे?**-विरोधकांकडून वारंवार मत चोरीच्या आरोपांवरही बावनकुळे यांनी पलटवार केला. ते म्हणाले, नाना पटोले, विजय वडेट्टीवार आणि काँग्रेसचे इतर नेते खासगीत पराभव मान्य करतात. पण कार्यकर्त्यांना टिकवण्यासाठी ते लोक मत चोरीचे आरोप करतात. आता जनता महायुतीच्या मागे उभी आहे, त्यामुळे विरोधकांना आपला पक्ष आणि कार्यकर्ते टिकवण्यासाठी अशा खोट्या गोष्टींचा आधार घ्यावा लागतो. संजय राउत यांच्या टीकेवर मिश्किल शैलीत प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले, कोण संजय राउत? त्यांना उठल्यावर दिवसभर फटाके फोडायचे असतात. दीपावलीचा दिवस आहे, म्हणून फार सिरीयस होउ नका. आम्हाला विकासाच्या राजकारणात भंडारा जिल्ह्याला पुढे न्यायचं आहे, बाकी फटाके फोडण्याचं काम त्यांच्यावर सोडा.

## 1 नोव्हेंबरपासून बदलणार बँकेचे नियम नॉमिनीचा नवा पर्याय मिळणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बँक ग्राहकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आता तुम्ही तुमच्या बँक खात्याला एक, दोन नव्हे तर तब्बल चार नॉमिनी म्हणजे वारसदार जोडू शकता. १ नोव्हेंबर २०२५ पासून बँक खात्यांमध्ये नॉमिनीबाबत नवीन नियम लागू होणार आहेत. यामुळे ग्राहकांना अधिक सोयीचे होईल आणि आपत्कालीन परिस्थितीत पैसे मिळवणे सोपे आणि पारदर्शक होईल. अर्थ मंत्रालयाकडून गुरूवारी



महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. अर्थ मंत्रालयाने गुरुवारी सांगितले की, बँकिंग कायदा (दुरुस्ती) अधिनियम, २०२५ मधील महत्त्वाचे कलम १ नोव्हेंबरपासून लागू होतील. या कायद्यात नॉमिनीबद्दल नवीन नियम आहेत. आता कोणताही बँक ग्राहक आपल्या खात्यासाठी, लाकरसाठी किंवा सुरक्षित ठेवलेल्या वस्तूंसाठी जास्तीत जास्त चार नॉमिनी निवडू शकतो. बँकिंग कायद्यातील काही नियम लागू झाले आहेत. तर सेक्शन १०,११,१२,१३ एक नोव्हेंबरपासून लागू होणार आहेत. नवीन नियमांनुसार, ग्राहक आपल्या बँक खात्यासाठी चार लोकांना नॉमिनी बनवू शकतो. उदाहरणार्थ, जर एखाद्या ग्राहकाने चार नामिनी निवडले आणि पहिला न?मिनी हयात नसेल, तर आपोआप दुसरा नॉमिनी वारसदार बनेल. तसेच ग्राहक चारही नॉमिनींमध्ये पैशांची वाटणी किती टक्के करायची हे देखील ठरवू शकतो. जसे की प्रत्येकी २५ टक्के किंवा ग्राहकाच्या सोयीनुसार. मंत्रालयाने सांगितले की, सेफ कस्टडी आणि लाकरमध्ये ठेवलेल्या वस्तूंसाठी फक्तक्रमिक नामिनीची अनुमती असेल. याचा अर्थ, एका नामिनीच्या मृत्यूनंतरच दुस-याला अधिकार मिळेल. सरकारचे म्हणणे आहे की, या बदलामुळे बँकिंग व्यवस्थेत एकरूपता, पारदर्शकता येईल आणि पैसे मिळण्याची प्रक्रिया वेगवान होईल.

## बिहारच्या राजकारणावर 'घराणेशाही'चे वर्चस्व! RJD चे 42 टक्के आमदार नेत्यांची मुले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहार हे राज्य अनेक पुरोगामी आंदोलनांचे केंद्र राहिले आहे, पण राजकारणातील घराणेशाहीच्या बाबतीत देखील या राज्याचा क्रमांक अव्वल मानला जातो. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एका रिपोर्टनुसार, सध्याच्या २४३-सदस्यांच्या विधानसभेत घराणेशाहीचा दबदबा राहिला आहे. बिहारच्या विधानसभेत घराणेशाहीने पोहचलेल्या नेत्यांची संख्या ७० (म्हणजेच २८.८१ टक्के) आहे, जी एकूण संख्येच्या एक-चतुर्थांशापेक्षाही अधिक आहे.लालू प्रसाद यादव यांच्या आरजेडी (डख्र) पक्षाच्या ७१ आमदारांपैकी ३० आमदार हे राजकीय घराणेशाहीतून पुढे आलेले आहेत, म्हणजेच आरजेडीच्या एकूण ४२.२५ टक्के आमदार घराणेशाहीतून आलेले आहेत. तर जेडीयूच्या ४४ आमदारांपैकी १६ आमदार असे आहेत, म्हणजेच जेडीयूच्या ३६.३६ टक्के आमदारांना घराणेशाहीमुळे संधी मिळालेली आहे. तर भाजपामध्ये हा आकडा काहीसा कमी आहे. भाजपाकडे असलेल्या ८० पैकी १७ आमदार म्हणजेच २१.२५ टक्के आमदार हे घराणेशाहीचा भाग आहेत. मावळत्या विधानसभेत काँग्रेसच्या १७ आमदारांपैकी चार आमदार असे आहेत.

नीतीश कुमार यांच्यासह बिहारच्या २३



मुख्यमंत्र्यांपैकी किमान सात मुख्यमंत्र्यांचा राजकीय वारसा सध्या लवकरच विसर्जित होणा-या विधानसभेत त्यांच्या कुटुंबीय सदस्यांनी आणि नातेवाईकांनी पुढे चालवला आहे. यामध्ये लालू प्रसाद-राबडी देवी यांचे पुत्र तेजस्वी यादव आणि तेज प्रताप यादव, तसेच केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी यांची सून दीपा मांझी यांचा समावेश आहे. यादीत भाजपाचे दोन मंत्री नीतीश मिश्रा आणि अमरेंद्र प्रताप सिंग यांचा देखील समावेश आहे, जे अनुक्रमे काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा आणि हरिहर सिंग यांचे पुत्र आहेत.

सध्याच्या विधानसभेत घराणेशाहीतून आलेल्या नेत्यांच्या यादीत जेडीयू-भाजपा राज्य सरकारमधील इतर सात मंत्र्यांचा समावेश आहे. यामध्ये विजय कुमार चौधरी (जेडीयू), नितीन नवीन (भाजपा), महेश्वर हजारी (जेडीयू), शीला कुमारी (जेडीयू), सुमित कुमार सिंग (जेडीयू), सुनील कुमार (जेडीयू) आणि जयंत राज (जेडीयू) यांचा समावेश आहे. या नेत्यांमध्ये जवळजवळ ५७ आमदार हे दुस-या पिढीचे आहेत आणि तीन आमदार तिस-या पिढीतील आहेत.राजकारणात तिसरी पिढी असलेले नेते देखील विधानसभेत आहेत. जेडीयूचे मंत्री सुमित कुमार सिंह यांच्या वडील आणि आजोबा आमदार आणि मंत्री होते. सुदर्शन कुमार जेडीयूचे आमदार आहेत आणि त्यांचे आई-वडील आणि आजोबा आमदार होते. आरजेडीचे यूसुफ सलाहुद्दीन यांचे वडील महबूब अली कैसर खासदार होते आणि आजोबा चौधरी सलाहुद्दीन मंत्री होते. फक्त विधानसभाच नाही विधान परिषदेतही घराणेशाहीचे वर्चस्व पाहायला मिळते, येथे राबडी देवी यांच्यासह एकूण १२ प्रतिनिधी आहेत.

## पोलीस आणि आयबीचे लोक माझा पाठलाग करताय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांनी हा आरोप केला आहे की पोलीस आणि आयबीचे लोक त्यांचा पाठलाग करतात. लडाखचे पर्यावरवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक हे सध्या जोधपूरच्या मध्यवर्ती कारागृहात आहेत. दरम्यान सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांनी सर्वोच्च न्यायालयात बोलत असताना पोलीस आणि आयबीवर गंभीर आरोप केला आहे. राजस्थान पोलीस आणि इंटेलिजन्सचे ब्युरोचे अधिकारी माझ्यावर नजर ठेवून आहेत. माझा पाठलाग करत आहेत. मी जेव्हा माझे पती सोनम वांगचुक यांना भेटायला जाते तेव्हा दिल्लीला परत येईपर्यंत पोलीस माझ्यासह असतात. मला प्रत्येक गोष्ट त्यांच्या निगराणीखालीच करावी लागते, असं गीतांजली यांनी म्हटलं आहे. इतकंच नाही तर सर्वोच्च न्यायालयात गीतांजली यांनी एक प्रतिज्ञापत्र दाखल केलं आहे. त्यामध्येच त्यांनी हा गंभीर आरोप केला आहे. गीतांजली म्हणाल्या, मी ७ ऑक्टोबर आणि ११ ऑक्टोबरला जोधपूर येथे असलेल्या मध्यवर्ती तुरुंगात सोनम वांगचुक यांना भेटायला गेले होते. त्यावेळी जोधपूरच्या विमानतळावर उतरताच मला पोलिसांच्या कारमध्ये बसवण्यात आलं. त्यानंतर मी तुरुंगापर्यंत पोहचेपर्यंत पोलीस माझ्या बरोबरच होते. मला सोनम वांगचुक यांना भेटायचं असेल किंवा बाहेर कुठेही जायचं असेल तर आधी पोलिसांना सूचित करावं लागतं असाही



*सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांचा सर्वोच्च न्यायालयात पोलीस आणि आयबीवर गंभीर आरोप*

आरोप त्यांनी प्रतिज्ञापत्रात केला आहे. बार अँड बेंचने हे वृत्त दिलं आहे.गीतांजली यांनी प्रतिज्ञापत्रात असाही आरोप केला आहे की जोधपूरला त्यांना इतर कुणालाही भेटू दिलं जात नाही किंवा दुसरीकडे कुठेही जाउ दिलं जात नाही. मी एकदा ट्रेनने आले होते, ट्रेन सुटायला भरपूर वेळ होता त्यावेळी मला पोलिसांनी रेल्वे स्टेशनवर बसवून ठेवलं. पोलीस अधिकारीही माझ्यासह बसून राहिले होते. ३० सप्टेंबरला जेव्हा मी पत्रकार परिषद घेतली त्यानंतर माझ्या घराजवळ पोलीस निगराणी ठेवू लागले. मी जेव्हा बाहेर पडते तेव्हा काहीजण माझा बाईक किंवा कारने पाठलाग करतात असाही आरोप गीतांजली यांनी केला आहे. लडाखला राज्याचा दर्जा मिळावा, या मागणीसाठी आंदोलन झाले होते. यादरम्यान झालेल्या हिंसाचारात आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये बुधवारी हिंसक संघर्ष झाला होता. ज्यामध्ये चार जणांचा मृत्यू आणि ८० जण जखमी झाले होते. सरकारने या हिंसाचारासाठी पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना जबाबदार धरले असून, २७ सप्टेंबरला त्यांना लडाख पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. सोनम वांगचुक यांनी म्हटले होते की, त्यांना कोणत्याही क्षणी अटक होउ शकते. त्यामुळे जर अटक झाली तर त्यांना आनंद होईल. दरम्यान अटकेनंतर त्यांची रवानागी जोधपूर येथील मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे.

## मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्तविशेष गाड्या

**नागपूर/प्रतिनिधी :** सणासुदीच्या काळामुळे रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळली आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने प्रवाशांना दिलासा दिला असून मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. मध्य रेल्वेद्वारे मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाडी सोडण्यात येईल. दिवाळी आणि छठ पूजा उत्सवानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. विशेष गाडी क्र. ०१००५ मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २५ ऑक्टोबरला ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्र. ०१००६ नागपूर येथून २५ ऑक्टोबर रोजी १८.१० वाजता सुटेल आणि मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुस-या दिवशी ०८.२५ वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावल, मलकापुर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा येथे थांबा राहील. २० तृतीय वातानुकूलित आणि दोन जनरेटर व्हॅन अशी गाडीची संरचना राहील, असे मध्य रेल्वेने स्पष्ट केले.

**अमरावती-पुणे-अमरावती विशेष गाडीच्या फे-या वाढवल्या**

सणासुदीच्या काळात प्रवाशांची अतिरिक्तगर्दी लक्षात घेता विशेष गाडी सोडण्यासह काही नियमित गाड्यांच्या फे-यात देखील वाढ केली. प्रवाशांच्या सोयीसाठी अमरावती -पुणे- अमरावती (गाडी क्रमांक ०१४०४/०१४०५ ) ही एक विशेष गाडी ८ ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबरदरम्यान आठ फे-या (दर बुधवार) चालविण्यात येत आहे. भुसावळ विभागातून एकूण एक हजार ४६४ विशेष सेवा चालवल्या जात आहेत. या गाड्या नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, अकोला आणि बडनेरा आदी प्रमुख स्थानकांवर थांबतात. आतापर्यंत भुसावल विभागातून ५४४ विशेष गाड्या चालवल्या गेल्या आहेत.

**विनाअडथळा प्रवासाचे नियोजन**

रेल्वेच्या भुसावळ विभागात परिचालन, वाणिज्य, सुरक्षा आणि अभियांत्रिकी विभागाने समन्वय साधून सणासुदीच्या काळातील गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन करण्याचे नियोजन केले आहे. प्रवाशांना सुरक्षित, सोयीस्कर आणि तणावरहित प्रवास अनुभवता येण्यासाठी विभागाचे प्रयत्न आहेत. सर्व विभागांच्या समन्वय, नियोजन आणि सूक्ष्म देखरेखीमुळे या सणासुदीच्या काळात प्रवाशांना सुरक्षित प्रवास अनुभव येणार असल्याचा दावा मध्य रेल्वे प्रशासनाने केला. रेल्वेच्या नियोजनामुळे प्रवाशांना गर्दीच्या काळात मोठा दिलासा मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## हार्ट अटॅकच्या ९९% रुग्णांमध्ये समान धोकादायक घटक; संशोधकांचा मोठा खुलासा!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** फकीर या नावाने ओळखले जाणारे गायक आणि अभिनेता ऋषभ टंडन यांचं बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी वयाच्या ३५ व्या वर्षी दिल्लीमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ते मुंबईत आपल्या पत्नी आणि अभिनेत्री- माडेल ओलेसिया नेडोबेगोवा यांच्याबरोबर राहत होते. मात्र दिवाळी साजरी करण्यासाठी ते आपल्या कुटुंबाबरोबर काही दिवसांसाठी दिल्लीला गेले होते. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबाला जबर धक्का बसला आहे. गेल्या काही वर्षात कमी वयात येणा?या हृदयविकाराच्या झटक्यांचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे एकूणच हृदयविकार ही जागतिक समस्या ठरते आहे. यासंदर्भात गेले दशकभर सुरु असलेल्या संशोधनात काही महत्त्वाची निरीक्षण आढळून आली आहेत. ९९ टक्के हृदयविकारांच्या रुग्णांमध्ये काही समान गोष्टी आढळल्या आहेत. त्या मुख्यत्त्वे हृदयविकारासाठी कारणीभूत ठरतात आणि त्यांची काळजी घेतली तर हृदयविकार टाळता येउ शकतो, असा दावा या संशोधकांनी केला आहे.

हृदयविकार टाळता येउ शकतो का?

हृदयाच्या आजाराची लक्षणं ओळखून योग्य वेळी उपचार आणि काळजी घेतली, तर सुमारे ८० टक्के हृदयविकाराची प्रकरणं पूर्णपणे टाळता येउ शकतात. म्हणजेच, योग्य जीवनशैली, तपासण्या आणि वैद्यकीय सल्ल्याचं पालन केल्यास अनेकांचा जीव वाचू शकतो, असं मत तज्ज्ञ व्यक्त करतात.



अभ्यासातून समोर आलेलं सत्य

सिएटल येथे झालेल्या एका क्रांतिकारी संशोधनात एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष समोर आला आहे. या संशोधनात असं दिसून आलं की, हृदयविकाराचा झटका किंवा मेंदूला रक्तपुरवठा बंद होउन येणारा झटका आलेल्या ९९ टक्क्यांहून अधिक लोकांमध्ये आरोग्यासाठी घातक असलेल्या गोष्टींना नियंत्रित ठेवण्याची काळजी घेण्यात आली नव्हती. या गोंष्टींचे वर्णन जोखीम असलेले घटक म्हणून करण्यात येते.

रक्तदाब वाढलेला असणं, रक्तातील साखर (डायबिटीज) जास्त असणं, कोलेस्ट्?लचे प्रमाण वाढणं, वजन जास्त असणं, धूम्रपान किंवा व्यायामाचा अभाव इत्यादी. हे घटक संशोधनासाठी पडताळणी करण्यात आलेल्या हृदयविकारांच्या रुग्णांमध्ये म्हणजेच अपु-या नियंत्रणाखाली होते. या सगळ्यामुळे शरीरावर ताण वाढतो आणि हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी वाढतो.

या निष्कर्षातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो. हृदयविकाराशी संबंधित जोखीम असलेल्या घटकांची नियमित तपासणी आणि त्यावर नियंत्रण ठेवणं अतिशय गरजेचं आहे. अनेकदा लोकांना वाटतं की, ते निरोगी आहेत, पण रक्तदाब, साखर किंवा कोलेस्ट्?ल नकळत वाढत असतात. अशा मूक जोखमींवर वेळीच लक्ष दिलं, तर गंभीर आजार टाळता येतात. तज्ज्ञांच्या मते, नियमित तपासण्या, योग्य आहार, व्यायाम, धूम्रपान टाळणं आणि ताण नियंत्रण या सवयी अंगीकारल्यास हृदयाचे आजार मोठ्या प्रमाणावर कमी होउ शकतात.

दशकभराचं व्यापक संशोधन

हे संशोधन Journal of the American College of Cardiology या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिकात प्रकाशित झालं आहे. यात अमेरिकेतील जवळपास ७,००० प्रौढ व्यक्तींच्या आणि दक्षिण कोरियातील तब्बल ९ दशलक्ष लोकांच्या वैद्यकीय नोंदींचा अभ्यास करण्यात आला. हा डेटा गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत तपासण्यात आला असून, इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेलं हे संशोधन आजवरचं सर्वांत व्यापक संशोधन मानलं जातं आहे. या निष्कर्षांमुळे जगभरातील आरोग्यतज्ज्ञ पुन्हा एकदा लोकांना वेळीच तपासणी आणि जीवनशैली सुधारण्याचं महत्त्व पटवून देत आहेत. या संशोधनाचा सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की, बहुतांश हृदयविकार हे अचानक किंवा अनपेक्षितपणे होत नाहीत. उलट, ते हळूहळू वाढणा-या आणि दुर्लक्षित राहिलेल्या जोखीम असलेल्या घटकांमुळे निर्माण होतात. संशोधनात असं आढळलं की, बहुतेक रुग्णांमध्ये उच्च रक्तदाब, रक्तातील साखर, कोलेस्टेरल आणि धूम्रपान हे चार प्रमुख जोखीम घटक आधीपासूनच अनियंत्रित पातळीवर होते. म्हणजेच, हे घटक अनेक वर्षांपासून शरीरात बदल घडवत होते, पण त्याकडे वेळेवर लक्ष दिलं गेलं नाही. परिणामी, हळूहळू रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण झाले आणि शेवटी हृदयविकाराचा झटका आला. प्राव्हिडन्स स्वीडिश रुग्णालयातील कार्डियोल?जिस्ट आणि हृदय पुनर्वसन विभागाच्या वैद्यकीय संचालिका, सारा स्पेक, यांनी या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट केली.

प्रे. ट्रम्प यांना अमेरिकेचाच नव्हे तर जगाचा हुकूमशहा व्हायचे आहे. रशियाचे पुतीन आणि चीनचे शी जिनपिंग यांचेही स्वप्न तेच आहे. भारततही मोदी यांना त्यांच्या अंधभक्तांनी 'विश्वगुरू'पदी बसवून ठेवलेच आहे. प्रश्न इतकाच आहे की, अमेरिकेत जनतेने ट्रम्प यांच्या विरोधात रविवारी जसा तिसऱ्यांदा 'एल्गार' पुकारला तसे इतर हुकूमशाही राजवटींमध्ये कधी घडेल? ट्रम्प महाशय जागतिक शांततेची कबुतरे रोज उडवीत असले तरी त्यांच्याच विरोधात अमेरिकन जनता प्रचंड अशांत आहे. याच अशांततेची आग आता ट्रम्प यांच्या बुडाला लागली आहे. जगभरात कोठेही हुकूमशाही उतू-मातू लागली की लोकशाहीचा आत्मा जागा होतो. हा इतिहास आहे!जगातील वेगवेगळ्या देशांमधील युद्धे आणि संघर्ष आपणच थांबवले, असे दावे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उठताबसता करीत असतात. जागतिक शांततेचे आपणच एकमेव ठेकेदार आहोत, नियतीने ती जबाबदारी फक्त आपल्या एकट्यावरच सोपवली आहे, अशाच तोऱ्यात ते तोंडाच्या वाफा दवडत असतात. प्रत्यक्षात आता ट्रम्प यांच्याच बुडाखाली अशांततेची आग लागली आहे. रविवारी अमेरिकेत ट्रम्प यांच्या विरोधात आतापर्यंतचे सर्वात मोठे जनआंदोलन झाले. तेथील २६०० शहरांमध्ये अमेरिकन जनतेने ट्रम्प यांच्या विरोधात भव्य मोर्चे काढले. सुमारे ७० लाख लोक 'नो किंग्ज प्रोटेस्ट' या ट्रम्पविरोधी निदर्शनात सहभागी झाले होते. ट्रम्प हे हुकूमशाहीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत, असा आरोप करीत रविवारी संपूर्ण अमेरिकेत जनतेने निदर्शने केली. खरे तर ट्रम्प महाशयांना फक्त अमेरिकेचाच नव्हे तर संपूर्ण जगाचाच हुकूमशहा व्हायचे आहे. त्यासाठीच त्यांनी जगावर 'टॅरिफ युद्ध'

# संपादकीय

प्रबंध संपादकः प्रदीप देशपांडे

## 'आग'

लादले. त्या माध्यमातून जागतिक व्यापार युद्ध सुरू केले. एकीकडे विविध देशांतील युद्धे आपण थांबवली असे तारे तोडायचे आणि दुसरीकडे स्वतःच जगाला व्यापार युद्धात ढकलायचे. जगाची धोक्यात आणायची. ट्रम्प महाशय त्यांच्या या निर्णयांना 'अमेरिका फर्स्ट' असा राष्ट्रवादी वगैरे मुलामा देत असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या अनेक निर्णयांचा फटका अमेरिकन जनतेलाही बसत आहे. त्यात स्वतःच्याच आडमुठेपणामुळे त्यांच्या सरकारवर 'शटडाऊन'ची आफत आली आहे. त्यामुळेही अमेरिकन जनतेत संताप आहे. त्याचा उद्रेक रविवारी झाला. ट्रम्प यांच्या विरोधात गेल्या जून आणि जुलैमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली होती. आता रविवारी तिसऱ्यांदा जनतेने रस्त्यावर उतरून आपला संताप व्यक्त केला. अर्थात तरीही ट्रम्प यांचा तोरा कमी होण्याची आणि त्यांचे पाय जमिनीवर येण्याची चिन्हे नाहीत. देशातील जनता आपल्याविरोधात रस्त्यावर उतरली असताना हे महाशय फ्लोरिडा येथे 'वीकेंड' साजरा करीत आहेत. रविवारच्या 'नो किंग्ज प्रोटेस्ट' निदर्शनांबद्दल त्यांनी 'मी राजा नाही' असे म्हटले असले तरी दुसऱ्या बाजूला 'गिरे तो भी उपर' ही त्यांची मस्ती एका व्हिडीओमधून दाखवलीच आहे. ट्विटर अकाऊंटवर पोस्ट केलेल्या एका एआय जनरेटेड व्हिडीओमध्ये ट्रम्प यांनी स्वतःला मुकूट घातलेल्या लढाऊ विमानाच्या पायलटच्या रूपात दाखवले आहे. तसेच त्यांच्या जेटवर 'किंग ट्रम्प' असे लिहिले आहे. ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकन जनतेत प्रचंड खदखद का आहे, याचे उत्तर ट्रम्प यांनी पोस्ट केलेल्या या व्हिडीओमध्ये त्यांनी दाखविलेल्या मुजोरपणात आणि आडमुठेपणात आहे. आपल्या दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प यांनी लोकशाही मूल्ये, न्याय वगैरे खुंटीवर टांगून ठेवले आहेत. सत्तेचा आणि अधिकारांचा ते सर्रास गैरवापर करीत आहेत. त्याविरोधातील जनआक्रोशाकडे दुर्लक्ष करीत आहेत. अमेरिकेपासून भारतापर्यंत जगाच्या वेगवेगळ्या देशांमध्ये यापेक्षा वेगळे काय घडत आहे? प्रे. ट्रम्प यांना अमेरिकेचाच नव्हे तर जगाचा हुकूमशहा व्हायचे आहे. रशियाचे पुतीन आणि चीनचे शी जिनपिंग यांचेही स्वप्न तेच आहे. भारततही मोदी यांना त्यांच्या अंधभक्तांनी 'विश्वगुरू'पदी बसवून ठेवलेच आहे. प्रश्न इतकाच आहे की, अमेरिकेत जनतेने ट्रम्प यांच्या विरोधात रविवारी जसा तिसऱ्यांदा 'एल्गार' पुकारला तसे इतर हुकूमशाही राजवटींमध्ये कधी घडेल? ट्रम्प महाशय जागतिक शांततेची कबुतरे रोज उडवीत असले तरी त्यांच्याच विरोधात अमेरिकन जनता प्रचंड अशांत आहे. याच अशांततेची आग आता ट्रम्प यांच्या बुडाला लागली आहे. जगभरात कोठेही हुकूमशाही उतू-मातू लागली की लोकशाहीचा आत्मा जागा होतो. हा इतिहास आहे!

# शनिवार वाडा मेघा कुलकर्णी यांच्या पप्पाचा नाही,,,, पण !

**शनिवार वाडा केवळ एक वास्तू नाही तर येथून विजयी हिंदू वीरांच्या घोड्याच्या टापा दिल्लीच्या तख्ताकडे गेल्या होत्या आणि त्यांनी इस्लामी सिंहासने उलथापालथ करून अटकेपार भगवे झेंडे उभे केले त्यामुळे तेथील पावित्र्य राखले गेले पाहिजे.त्यामुळे हिंदूनी हाजी अली दर्गा मध्ये महाआरती किंवा श्री हनुमान चालीसा म्हटला तसेच पुण्यातील आगा खान पॅलेस मध्ये किंवा बीबी का मकबरा मध्ये हिंदू संघटनांनी महाआरती केल्यास चालेल का? माहिती नुसार ताजमहाल मध्ये हिंदू माणसाने धार्मिक कार्य केल्यास गुन्हा ठरतो मग शनिवार वाडया साठी वेगळा न्याय का ?**

पुण्यातील शनिवार वाड्यात मागील आठवड्यात दिनांक १८ ऑक्टोबर रोजी मुस्लिम महिलांनी नमाज पठण केल्याची घटना घडली आहे सदर घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला होता.या प्रकरणी भाजपच्या राज्यसभा खासदार मेधाताई कुलकर्णी आणि पतित पावन संघटनेच्या नेतृत्वाखाली शनिवार वाडयावर नमाज पठण केलेल्या स्थानी शिववंदना घेऊन'शुद्धीकरण' आंदोलन केले आहे.खा.मेघाताई कुलकर्णी यांच्या आंदोलनावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रूपाली पाटील-ठोंबरे यांच्या पासून पत्रकार निखिल वागळे आणि पैगंबर शेख पासून संजय सोनवणी यांनी तोंडसुख घेण्याचा प्रयत्न केला आहे.सोबतच शनिवार वाड्यावर नमाज पठण करणाऱ्यांवर कारवाई अथवा समज देण्या ऐवजी खा मेघाताई कुलकर्णी यांच्या वरच पोलिस कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच रूपाली ठोंबरे यांनी तर शनिवार वाडा मेघा कुलकर्णी यांच्या पप्पाचा नाही अशी व्यक्तिगत टीका करणारी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.वास्तव मध्ये शनिवार वाडा खा मेघाताई कुलकर्णी यांच्या पप्पाचा नाही हे सत्य आहे पण रूपाली ठोंबरे यांच्या बापाचा सुद्धा नाही हे लक्षात घेऊन त्यांनी वचवच करायला पाहिजे होती. काही वर्षा पूर्वी म्हणजे ऑगस्ट १०१८ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज मध्ये श्री सत्यनारायण पूजन विषयी वाद निर्माण करण्यात आला होता तेव्हा खा. सुप्रिया सुळे



यांनी 'धार्मिक कार्य सत्यनारायण घरात'असा सल्ला पुणेकरांना सल्ला दिला होता.रूपाली ठोंबरे यांच्या निदान खा. सुप्रिया सुळे यांच्या सल्ल्याच स्मरण करून खा मेधाताई कुलकर्णी यांच्यावर तोंडसुख घेतले असते तर बरे झाले असते.त्यामुळे 'धार्मिक कार्य घरात व नमाज कोठेही' हा दुटप्पी अजेंडा आता चालणार नाही.उपरोक्त सर्व प्रकारावर मंत्री नितेश राणे यांनी सर्वांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे विधान केलं असून हिंदूनी हाजी अली दर्गा मध्ये महाआरती किंवा श्री हनुमान चालीसा म्हटला तर चालेल का? असा मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे.तेथे मात्र बोलती बंद झाली असल्याचे दिसत आहे.तसेच माहिती नुसार ताजमहाल मध्ये हिंदू माणसाने काही धार्मिक कार्य केल्यास तो गुन्हा ठरतो मग जो न्याय ताजमहाल साठी आहे तोच न्याय शनिवार वाडयासाठी का नाही ? पुण्यातील आगा खान पॅलेस किंवा बीबी का मकबरा मध्ये हिंदू संघटनांनी महाआरती किंवा श्री हनुमान चालीसा म्हटला तर चालेल का? त्यामुळे खा मेघाताई कुलकर्णी यांनी घेतलेली खंबीर भूमिका योग्यच आणि अभिनंदनीय म्हणावी



लागेल.

पुण्यातील ऐतिहासिक शनिवार वाडा एखादी वास्तू किंवा पडलेली माडी नाही तर येथून विजयी हिंदू वीरांच्या घोड्याच्या टापा दिल्लीच्या तख्ताकडे गेल्या होत्या आणि त्यांनी इस्लामी सिंहासने उलथापालथ करून अटकेपार भगवे झेंडे लावले होते. त्यामुळे त्या वास्तूचे पावित्र्य राखले गेले पाहिजे अशी सर्वसामान्य माणसाची भूमिका आहे त्यामुळे शनिवार वाडयावरील नमाज पठणवर सामान्य माणसाचा आवाज खा मेघा कुलकर्णी यांनी उठविला आहे.त्यांची भूमिका योग्य असून भविष्यात अशा घटना घडू नये किंवा शनिवार वाडा परिसर स्थानी नमाज पठण चालणार नाही हा इशारा देण्यासाठी त्यांनी आंदोलन केले आहे कोणत्याही व्यक्तिगत फायदा साठी आंदोलन केलेले नाही हे प्रथम समजून घेतले पाहिजे आणि आंदोलन का केले हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. काही दिवसां पूर्वी सरसबाग या ठिकाणी सुध्दा अशी वादग्रस्त घटना घडलेली आहे. सारसबाग ते शनिवार वाडा वादग्रस्त घटना मध्ये साम्य दिसत आहे.शनिवार वाडा परिसर स्थानी नमाज पठण केल्याने फार मोठा परिणाम होईल असा विषय नाही किरकोळ घटना आहे.देशातील पुढाऱ्यांच्या घरी किंवा कार्यालयात गरजु व्यक्तींनी नमाज पठण केले आहे ही वस्तुस्थिती आहे पण सारसबाग ते शनिवारवाडा येथील घटना षड्यंत्राचा भाग नाही ना याची खातरजमा केली पाहिजे कारण शनिवार वाडया सारख्या ठिकाणी हळू हळू नमाज पठाणाचे प्रयोग करायचे कोणी लक्ष न दिल्यास अथवा विरोध न केल्यास त्या मध्ये सातत्य ठेवून शुक्रवार आणि नंतर वेळ मिळेल तेव्हा असे प्रयोग करण्याचे षड्यंत्र सुरू आहेत.या पूर्वी विशाळगड ते प्रतापगड येथे असेच छोटे छोटे प्रयोग करून गडकिल्ल्याचे इस्लामीक रणांचा प्रयत्न झालेला आहे.देशातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर सुद्धा असे प्रयोग सुरू आहेत.त्यामुळे खा.मेधा कुलकर्णी यांनी दाखविलेली जागरूकता योग्य म्हणावी लागेल. शनिवार वाडा हे ऐतिहासिक सांस्कृतिकदृष्ट्य महत्वाचे स्थान असून पुरातत्व विभागा लक्ष देते पण तेथे नमाज अदा करण्यात आली हे सत्य आहे पुढे असे प्रकार चालू राहू नयेत अशी चेतावणी देण्यासाठी खा मेधाताई कुलकर्णी यांनी प्रयत्न केलेला आहे.

आज देशात आणि महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आहे भाजपच्या राज्यसभा खासदार असलेल्या मेधाताई कुलकर्णी यांनी आंदोलन का करावे ? असा प्रश्न सुद्धा उपस्थित करून खा.मेघाताई कुलकर्णी यांच्या आंदोलना मुळे पुण्यातील सामाजिक सलोखा धोक्यात येत असल्याचे सुद्धा चर्चिले गेले आहे परंतू अशा वादग्रस्त घटनांची पुनरावृत्ती का होत आहे याचा विचार का केला जात नाही ? सारसबाग ते शनिवार वाडा येथील घटनाक्रम लक्षात घेता महिला असूनही त्यांनी केलेले निर्भीड आंदोलन नक्कीच गौरवाची बाब आहे.

राजकारण,राजकीय फायदासाठी पुण्यातील अन्य राजकीय पक्ष जेव्हा मुंग गिळून गप्प बसले आहेत किंवा काहींची दातखीळ बसली आहे तेव्हा खा मेघाताई कुलकर्णी यांनी निर्भीड आंदोलन करून हिंदुत्वाचा आवाज उठवला आहे त्यांच्या आंदोलनाची इतिहासात नक्कीच दखल घेतली जाईल असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

**अशोक राणे ,**
अकोला
भ्रम.९४२३६५८३८५

## मानवी मूल्यांचा सन्मान राखणे आवश्यक

नुकतेच इस्त्रायल आणि हमासमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरु असलेल्या रक्तरंजत संघर्षावर अखेर युध्दविरामाचा तोडगा निघून शांततेच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकले गेले. या निर्णय केवळ दोनच देशांसाठी दिलासादायक नसून तर संपूर्ण जगासाठी आशादायी ठरणार आहे. या ऐतिहासिक करारानंतर ओलीसांची सुटका होऊ शकेल. जगभरातील राष्ट्रांनी या निर्णयाचे स्वागत केले असून ही घटना मानवतेच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक ठरली आहे. मागील दोन वर्षांपासून सुरु असलेल्या या तीव्र संघर्षात हजारोंच्या संख्येने निष्पाप जीव गमावले. त्यामध्ये लहान मुले, महिला आणि वयोवृद्धांचा समावेश आहे. वित्तहानी अगणित झालेली आहे. भयभीत झालेल्या असंख्य नागरिकांनी देश सोडून पलायन केले. माझा पट्टी उदध्वस्त झाली. हमासने इस्त्रायलच्या नागरिकांना ओलीस ठेवले होते. आणि त्याच्या सुटकेसाठी इस्त्रायलने माझा पट्टीत विध्वंस घडवला. क्षेपणास्त्रांचा मारा करून अनेक लोकांना ठार मारले. शाळा, कॉलेज, रुग्णालये आणि नागरी वस्त्या यातून सुटू शकल्या नाहीत.

इस्त्रायलचा हा एकप्रकारे मानवतेवरील हल्लाच होता. आपल्या नागरिकांच्या सुटकेसाठी इस्त्रायलने जंगजंग पछाडले तरीही हमास मागे हटला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही महिन्यांपूर्वी दोन्ही राष्ट्रांमध्ये चर्चा घडवून आणली होती. त्यानंतर युद्धविराम झाल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली होती. मात्र, या चर्चेनंतर काही तासांनी इस्त्रायलने पुन्हा गाझा पट्टीवर अनेक क्षेपणासते डागली होती. त्यामुळे हा संघर्ष फारच पेटला होता. आता आपल्याच पुढाकाराने इस्त्रायल-हमासमध्ये शांततेचा करार झाला, युद्धविराम झाल्यामुळे शांततेचे पर्व सुरु होईल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. शांतता करारानुसार हमास-इस्त्रायल ओलीसांची तर पॅलेस्टिनी नागरिकांना इस्त्रायल मुक्त करेल. गाझा पट्टीतून इस्त्रायलचे सैन्य माघारी परततील.

युद्धाच्या माध्यमातून कधीही शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. युद्धातून गाझा पट्टीतील जनजीवन उदध्वस्त झाले, पायाभूत सुविधा नष्ट झाल्या, असंख्य बालके अनाथ झाली. मानवतेच्या नावाखाली होणाऱ्या या हिंसेने जगाला हादरवून सोडले होते. त्यामुळे इस्त्रायल-हमास संघर्षाच्या तोडग्याला जागतिक समुदायाकडून मिळत असलेला प्रतिसाद हा केवळ राजकीयच नव्हे तर मानवतावादी दृष्टीकोनातूनही महत्वाचा आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या वीस कलमी शांतता प्रस्तावाला हमास-इस्त्रायलने मान्यता दिली असली तरी या तहाची खरी कसोटी येथून सुरु होणार आहे. युद्ध थांबल्यानंतर परस्परांमधील विश्वास प्रस्थापित करणे ही फार कठीण प्रक्रिया आहे. शांततेचा हा पहिला टप्पा टिकवून ठेवण्यासाठी संयम, पारदर्शकता आणि मानवी मूल्यांचा सन्मान राखणे आवश्यक आहे. रशिया-युक्रेन प्रमाणेच इतर देशांतील संघर्षांना हा करार एक दिशादर्शक ठरू शकतो. युद्धाच्या राखेतून अंकुर फुटतो आणि जर या प्रयत्नात सातत्य राहिले तर विश्वास वृद्धिंगत होऊ शकेल.

**मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

## 'महायुती'तील पुरोगामी पेच..

राज्याच्या राजकारणात नेहमीच केंद्रस्थानी राहिलेले उपमुख्यमंत्री अजित पवार हे महायुतीच्या सरकारमध्ये सामील झाल्यापासून त्यांची भूमिका आणि पक्षाची वाटचाल सतत चर्चेचा विषय ठरली आहे. लोकसभा निवडणुकीतील अपेक्षेपेक्षा कमी यशामुळे महायुतीतील 'तिसरा भिडू' म्हणून त्यांच्या पक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते; परंतु विधानसभा निवडणुकीतील घवघवीत यशामुळे त्यांनी राष्ट्रवादीतील आपली ताकद सिद्ध केली आहे, ज्यामुळे 'खरी राष्ट्रवादी कोणाची?' हा प्रश्न आता गौण ठरला आहे.एकिकडे, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राज्यात आपली राजकीय ताकद सिद्ध केली आहे. दुसरीकडे, त्यांना युतीतील भाजपच्या विचारधारेसोबत जुळवून घेताना काही मुद्द्यांवर तडजोड करावी लागत असल्याचे चित्र दिसत आहे. याचे ठळक उदाहरण म्हणजे राष्ट्रवादी (अजित गट) मधील काही नेत्यांची भूमिका आहे. बीडमधील धनंजय मुंडे यांचे प्रकरण असो वा अहमदनगरमध्ये (अहिल्यानगर) आमदार संग्राम जगताप यांनी हिंदुत्वाची कास धरल्याने अल्पसंख्याक समाजाकडून झालेली टीका, या घटनांमुळे अजित पवारांच्या पक्षाला टीकेचे धनी व्हावे लागले. या घटनांच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांना आपले सर्वधर्म समभाववादी नेतृत्व जपण्याची कसरत करावी लागत आहे. पुण्यातील शनिवारवाड्यावरील नमाज पठणावरून त्यांच्या प्रवक्त्याने घेतलेली भूमिका आणि त्यावर भाजपने घेतलेला आक्षेप, ही तडजोडीची आणि 'घुसमटी'ची स्पष्ट चिन्हे आहेत.

महाज्योती आणि वैचारिक संघर्षः

# संवाद

अलीकडील 'महाज्योती' (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) च्या नवीन इमारतीच्या भूमिपूजनावरून त्यांच्या पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी केलेले 'वेदोक्त मंत्रोच्चार ही महात्मा फुलेंची मरणोत्तर विटंबना' असल्याचे विधान, हा वैचारिक संघर्षाचा टोकदार बिंदू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पाया पुरोगामी विचारांवर आधारित आहे. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक म्हणून त्यांनी स्वतःला नेहमीच सिद्ध केले आहे. परंतु, हिंदुत्ववादी विचारधारेवर आधारित भाजपसोबत सत्तेत असताना, असे वैचारिक संघर्ष उभे राहणे स्वाभाविक आहे. मिटकरींचे विधान हे केवळ त्यांचे व्यक्तिगत मत नसून, युती सरकारमध्ये पुरोगामी विचारधारेचे राजकारण करणाऱ्या एका प्रमुख नेत्याच्या पक्षातील कार्यकर्त्यांची 'घुसमट' दर्शवते.

अजित पवारांसमोरील आव्हानः अजित पवार हे एक अभ्यासू प्रशासक आणि विकासावर भर देणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी विकासाचे राजकारण आणि कठोर प्रशासकीय निर्णयांना प्राधान्य दिले आहे. मात्र, महायुतीमध्ये आल्यानंतर त्यांना विकासाच्या अजेंड्यासोबतच 'विचारधारेचा' संघर्ष हाताळावा लागत आहे.विकासाचा समतोलः त्यांना भाजप आणि शिंदे गटासोबत काम करताना आपल्या मतदारसंघांना आणि समर्थकांना न्याय देण्याचे आव्हान आहे.पुरोगामी प्रतिमा जपणेः पक्षातील नेत्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे त्यांची सर्वधर्म समभावाची आणि पुरोगामी विचारधारेची प्रतिमा जपण्याची कसोटी लागत आहे. मिटकरींच्या वक्तव्यामुळे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वैचारिक वर्तुळात नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे, जी युतीसाठी धोकादायक ठरू शकते.पाऊल काय असेल, हे राज्याच्या भविष्यातील राजकारणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

**अविनाश देशपांडे**

## उत्साह आणि ऊर्मीचा 'खळाळता' झरा!

असरानी गेले, यानिमित्ताने हिंदी चित्रपटांतील सहायक भूमिकांचा इतिहास जरा आठवून पाहाष्ठ राज कपूरच्या चित्रपटांत प्रेमनाथ असणारच, गुरुदत्तला रेहमानची साथ हवीच आणि जॉनी वॉकर तर अनेक दिग्दर्शकांना हवा; जॉनी वॉकर यांच्या तोंडी गाणेसुद्धा हवे, असाही एक जमाना होता. त्यानंतरच्या काळात टुनटुन, जगदीप, केस्टो मुखर्जी, शक्ती कपूर, कादर खान यांच्यासारख्यांना विनोदी भूमिका मिळत राहिल्याच, पण त्या एका छापाच्या होत्या. काही जणांबाबत तर निरुपा राय आईच, इफ्तिकार किंवा जगदीश राज इन्पेक्टरच, सप्रू धनाढ्य भूमिकेतच, एकेकाळचा देखणा नायक अजित हा अहंमन्यपणामुळे हास्यास्पद ठरणारा खलनायकचष्ठ असे एकसाचीकरण होत गेले आणि प्रेक्षकांनीही ते स्वीकारले. या अशा काळातही डेव्हिड, देवेन वर्मा आणि असे काही जण कितीही लहान भूमिकांत असले तरी भूमिकेला न्याय देऊन आपापली छाप कायम ठेवायचे. या अशा थोड्यांपैकी असरानी होते. त्यांना मिळणाऱ्या भूमिका कितीही लहान असल्या, चित्रपटाच्या पोस्टरांवर त्यांचे चेहरे असले किंवा नसले, या कथानकामधला कारक घटक ठरणारे खलनायकाचे स्थानही या भूमिकांना नसले, तरी एखादा चित्रपट आठवताना नायक-नायिकांसह या सहायक भूमिका करणाऱ्यांचीही आठवण व्हायचीच.'तो काळ आता सरला' असे म्हणण्याची सोयच असरानींनी अगदी आता-आतापर्यंत ठेवली नव्हती. ती बहुधा त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या जीवन संघर्षाची खूण. त्याच टापूतल्या जयपूरहून गोवर्धन असरानी हा तिथला 'रेडिओ आर्टिस्ट' असलेला, आकाशवाणीवरल्या नभो नाट्यांत सहभागी होणारा तरुण आधी मुंबईत आला आणि टक्केटोणपे खाण्यापेक्षा पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि चित्रवाणी संस्थेत जा, हा सल्ला ऐकून पुण्याच्या भारतीय चित्रपट व चित्रवाणी संस्थेत (एफटीआय) मध्ये पोहोचला.

# ऐन दिवाळी पर्वात दोन हत्याकांडांनी जिल्हा हादरला




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : ऐन दिवाळी पर्वात दोन हत्याकांडांनी जिल्हा हादरला. रेतीतस्करीच्या वादातून एकास चाकूने भोसकले. तसेच त्याच्या अंगावर बुलेट नेत खून केला. ही घटना कळंब तालुक्यातील सावरगाव-चिंचोली मार्गावरील बारसमोर सोमवारी रात्री ११ वाजतादरम्यान घडली. तर उसनवारीच्या पैशातून शेतकऱ्यावर झोपेतच कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. ही घटना पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दितील आडद शिवारात २० ऑक्टोबर रोजी घडली.

रवींद्र अशोक पारिसे (४०) रा. अंदोरी ता. देवळी असे रेतीतस्करीतून झालेल्या हत्येतील मृतकाचे नाव आहे. तर रोहन देशमुख (३०) रा. आंजी, पंकज राजू जवडे (२८), सुनील तेलरांधे (३५), तुषार ऊर्फ बाटा गघादाटे (२८) व योगेश बोटफोडे (२२) सर्व रा. देवळी जि. वर्धा अशी मारेकऱ्यांची नावे आहे. मृतक रवींद्र पारिसेला पाचही जणांनी कळंब तालुक्यातील सावरगाव-चिंचोली मार्गावरील रेस्टॉरंट बारमध्ये फोन करून बोलाविले. तसेच 'तू माझ्या रेतीच्या गाडीची टीप तहसीलदारांना का देतो?. मी बनविलेल्या रस्ताने रेतीची गाडी का टाकतो म्हणत रोहन देशमुखसह साथीदारांनी वाद घातला. दरम्यान दारूच्या नशेत रोहणने रवींद्र पारीसेवर चाकून वार केले. यात रवींद्र रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळल्याने मारेकऱ्याच्या साथीदाराने त्याच्या अंगावर बुलेट चढवून खून केला. तसेच घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मृतकाचा आतेभाऊ प्रवीण बावणे (२९) रा. अंदोरी याला कळताच त्याने रवींद्रला सावंगी मेघे येथील रुग्णालयात भरती केले. परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनास्थळी एसडीपीओ दिनेश बैसाने यांनी भेट देऊन पसार आरोपीच्या शोधार्थ विशेष पोलीस पथक रवाना केले. पुढील तपास ठाणेदार राजेश राठोड करीत आहेत. कळंबसह जिल्हाभरात रेतीमाफिया वरचढ झाले असून स्थानिक प्रशासनाला जुमानत नसल्याचे दिसून येत आहे.

मुळावा पोलीस ठाण्याचा हद्दीतील आडद येथे उसनवारीचे १५ हजार रुपये परत न दिल्याचा राग मनात ठेवून शेतकऱ्याचा कुऱ्हाडीने वार करून खून केला. ही घटना सोमवारी रात्रीदरम्यान घडली. देवराव ग्यानबा वाळके (४५) रा. धनज असे मृतकाचे नाव असून, नाव किसन सोनबा वाळके (४५) रा. धनज असे खून करणाऱ्याचे नाव आहे. २० ऑक्टोबर रोजी आडद शेतशिवारात एका इसमाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती पोफाळी पोलिसांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक सुरेश शिंदे यांनी घटनास्थळ गाठत पंचनामा केला. फॉरेन्सिक टीम यवतमाळ यांनी घटनास्थळावरून रक्ताने माखलेली कुऱ्हाड, शर्ट व पॅन्ट जप्त केले. तपासादरम्यान मृतकाचा मुलगा करण वाळके याने सदर कपडे आरोपी किसन वाळके याचे असल्याचे ओळखले. पोलीस चौकशीत आरोपी किसन वाळके याने मृतकाने माझे १५ हजार रुपये घेतले होते. पैसे परत देण्यास नकार दिल्याने रागाच्या भरात त्याच्या डोक्यावर कुऱ्हाडीने दोन वार करून खून केला, अशी कबुली दिली. सदर प्रकरणी पोफाळी पोलिसांनी आरोपी खूनाचा गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले. पुढील तपास एसडीपीओ हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनात व उपनिरीक्षक सुरेश शिंदे व त्यांची टीम करीत आहेत.

## बाभूळगावात शिवसैनिकांकडून काळी दिवाळी
# सरकारविरोधात शिदोरी आंदोलन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - शेतकऱ्यांना अद्यापही अतिवृष्टीची मदत मिळाली नसल्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिनांक २१ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात काळी दिवाळी साजरी करून सरकारचा निषेध नोंदविला.या आंदोलनामध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शिवसैनिकांनी झुणका-भाकरी खाऊन काळी दिवाळी नोंदविली. रिकाम्या थाळ्या वाजवत त्यांनी "शेतकऱ्यांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दुमदुमविला. सरकारवर तीव्र टीका करत शेतकऱ्यांसाठी तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.त्यासंदर्भातील निवेदनही यावेळी प्रभारी तहसीलदार दिलीप बदकी यांना देण्यात आले.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस व तूर पिकांचे अभूतपूर्व नुकसान झाले असून, गेल्या वर्षीच्या तिळाच्या नुकसानाची मदत अद्याप मिळालेली नाही.



आधार प्रमाणीकरणातील तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना शासकीय अनुदानापासून वंचित राहावे लागत आहे.

आंदोलनाच्या शेवटी ओला दुष्काळाबाबत प्रसिद्ध झालेल्या नवीन जीआरची होळी करत शिवसैनिकांनी सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविला. शेतकऱ्यांना विना अट कर्जमाफी, कापसाला १०,००० रुपये, सोयाबीनला ७,००० रुपये, तुरीस ९,००० रुपये क्विंटल दर आणि नुकसानभरपाई म्हणून ५०,००० रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या न्यायासाठी शिवसैनिकांनी पुढेही संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा आंदोलनादरम्यान देण्यात आला. या आंदोलनात तालुका प्रमुख गजानन पांडे, तालुका संघटक सागर धवणे, शहर प्रमुख सचिन माटोडे, प्रहार तालुकाध्यक्ष प्रमोद कातरकर, रामेश्वर पेरकुंडे, शैलेश भगत, गजानन कोळणकर, योगेश कवळे, चंद्रशेखर केळतकर, जनार्दन झाटे, प्रवीण काळे,सतीश कावळे, भानुदास राऊत,आदींसह अनेक शिवसैनिक तथा शेतकरी उपस्थित होते.

# पंचवीस ते चाळीस टक्के शेतकऱ्याकडे फार्मर आयडी नसल्याने अतिवृष्टीचे अनुदान मिळण्यास अडचणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यात माहे जुनं ते सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर पिकाचे नुकसान झाले आहे शासनाकडून शासकीय मदत जाहीर करण्यात आली आहे परंतु २५ ते ४० टक्के शेतकऱ्याकडे फार्मर आयडी नसल्यामुळे त्या शेतकऱ्यांना शासनाचे अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात झाल्याची शेतकऱ्यांतून बोलल्या जात आहे.

तालुक्यात झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे हाताशी आलेले उभे पिक पूर्ण नष्ट झाले आहे कधी नाही एवढे नुकसान शेतकऱ्यांचे यावर्षी झाल्यामुळे शेतकरी राजा आर्थिक संकटात व अडचणीत सापडला आहे शासनाकडून कधी आर्थिक मदत मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना असतांना शासनाने प्रती हेक्टरी मदत जाहीर केली आहे परंतु २५ ते ४० टक्के शेतकऱ्याकडे फार्मर आयडी नसल्यामुळे त्यांना कृषी विभागाकडून शासकीय मदत मिळण्यास अडचणी निर्माण होत आहे दररोज शेतकरी पुसद तालुका कृषी कार्यालय व तहसील कार्यालयाकडे अनुदान खात्यावर टाकण्यात आले की नाही हे विचारण्यासाठी चकरा मारत आहेत परंतु त्यांच्याकडे फार्मर आयडी नसल्यामुळे कृषी विभाग ही हतबल बनला आहे बहुतांश शेतकऱ्याकडे बँक खाते व आधार कार्ड आहेत त्यामुळे शासनाने फार्मर आयडीची अट रद्द करून त्यांच्या खात्यामध्ये अतिवृष्टीचे अनुदान वर्ग करावे व शेतकऱ्यांची आर्थिक अडचण दुर करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून करण्यात येत आहे.

शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यासाठी फार्मर आयडी ही असणे बंधनकारक करण्यात आलेले आहे ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी आहे अशा शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैशा जमा करण्यात येत आहे परंतु काही शेतकऱ्याकडे २५ ते ४० टक्के पर्यंत फार्मर आयडी नसल्यामुळे त्यांचे अनुदान बँकेत पाठवता येत नाही अशा शेतकऱ्यांनी के.वाय.सी करून अतिवृष्टीच्या अनुदानाची रक्कम ही प्राप्त करून घ्यावी.

## केळापूर ते पारवा मार्गावरील रस्त्यांची दुर्दशा
## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - केळापूर ते पारवा या राज्य मार्गावरील डांबरीकरणाचे काम पूर्ण होऊन वर्षभरही लोटले नाही, तरीही या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आणि मध्यभागी अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड वाहने नांदेडच्या दिशेने जात असल्याने रस्त्याची चाळणी झाली आहे. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार तसेच पायी चालणाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, लहानमोठे अपघातही नेहमी घडत आहेत. अनेक स्थानिक नागरिक, पुढारी व राजकीय नेत्यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून रस्ता दुरुस्तीबाबत मागणी केली असली तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. या मार्गावर चोरटी वाहतूकही मोठ्या प्रमाणात होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, एखादी मोठी दुर्घटना घडल्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार नाही. दरम्यान, वाहनचालकांनी आणि स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे.

## वेचक

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक हाजी शेख मुसा सर यांचे दुःखद निधन



उमरखेड - शहरातील नगरपरिषद उर्दू हायस्कूल व हाजी अमानुल्ला उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक हाजी शेख मुसा सर यांचे 84 व्या वर्षी राहते घरी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. हाजी शेख मुसा सर यांनी नगरपरिषद च्या उर्दू शाळेवर 32 सेवारत होते , अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे व सामाजिक कार्यात सदैव सहभाग घेणारे मुसा सर यांच्याविषयी सर्वसामान्य लोकांच्या मनात आदराचे स्थान होते . त्यांचे पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

### आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित



उमरखेड - ढाणकी येथील उत्तमज्योत आदिवासी आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षक श्री. प्रमोद सोमाजी तामगाडगे यांना बी द चेंज फाउंडेशन शिर्डी जि. अहिल्यानगर महाराष्ट्र यांच्यातर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार 2025 जाहीर झाला. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान , विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक आणि सहशालेय कार्यातील आदर्श सेवेसाठी त्यांची निष्ठा, समर्पण भावना आणि परिश्रम अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. गुणवत्तापूर्ण कार्यासाठी , शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी व समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या कार्याबद्दल त्यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या बद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित

उमरखेड - ढाणकी येथील उत्तमज्योत आदिवासी आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षक श्री. प्रमोद सोमाजी तामगाडगे यांना बी द चेंज फाउंडेशन शिर्डी जि. अहिल्यानगर महाराष्ट्र यांच्यातर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार 2025 जाहीर झाला. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान , विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक आणि सहशालेय कार्यातील आदर्श सेवेसाठी त्यांची निष्ठा , समर्पण भावना आणि परिश्रम अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. गुणवत्तापूर्ण कार्यासाठी , शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी व समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या कार्याबद्दल त्यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या बद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नती, पर्यावरण समतोलासाठी बांबू परिषद

नेर : तालुक्यातील बाणगाव येथे शेतकऱ्याच्या आर्थिक उन्नती व पर्यावरण संतुलनासाठी बांबू परिषदेला राज्य मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची उपस्थिती राहणार आहे. बांबू परिषद व हभप भूमिका तिरमारे यांचे जाहीर कीर्तन आयोजन संत बाबुजी महाराज संस्थांन येथे २५ आक्टोबर शनिवारी रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपाचे तालुकाध्यक्ष नीलेश राठोड (कारभारी) यांनी केले आहे. या बांबू परिषदेत शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन, तूर या पिकापेक्षा बांबू लागवड किती फायद्याची आहे, यावर माहिती देण्यात येणार आहे. बांबू लागवडीसाठी शासनाचे अनुदान, दरवर्षी उत्पन्न वाढ, बांबू लागवडीपासून कटाईपर्यंतचे महत्त्व याबाबत बांबू परिषदेत राज्य मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल हे मार्गदर्शन करणार राज्य मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची उपस्थिती आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी जिल्हाध्यक्ष महादेव सुपारे, जिल्हाध्यक्ष डॉ. आरती फुफाटे, जगदीश बोडे, दत्ता राहणे, देवानंद पवार आदींची उपस्थिती राहणार आहे. तसेच भाजपाचे ज्येष्ठ नेते विलास राखडे, पुरुषोत्तम लाहोटी, जिल्हा सचिव पंजाब शिरभाते, शिक्षक आघाडीचे विभागीय संयोजक प्रा. उदय कानतोडे, दिग्रस विधानसभा प्रमुख राजेंद्र देऊळकर, योगेश दहेकर, अनिल राठोड, आशिष खोडे, अनंत उन्मुगले, निखिल बायस्कर आदींची उपस्थिती राहणार आहे. या बांबू परिषदेला शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष नीलेश राठोड कारभारी यांनी केले आहे.

# शिवतीर्थ, गार्डन रोड येथे "बळीराजा पूजन" उत्सव उत्साहात साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - "बळीराजा पूजन उत्सव "शिवतीर्थ (शिवाजी महाराज पुतळा), गार्डन रोड यवतमाळ येथे मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्षांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर गायकवाड (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ) होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी अध्यक्ष साहेबराव जूनघरे,चंद्रशेखर कुडूपले, डॉ.प्रभाकर काळमेघ, कार्याध्यक्ष सुनील कडू,मार्गदर्शक प्रा. प्रवीण भोयर,जिल्हा सचिव शशिकांत खडसे, निशा बुटले जिल्हाध्यक्षा जिजाऊ ब्रिगेड, आशा काळे यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्ते नंदू भाऊ बुटे यांनी बळीराजाच्या आदर्श राज्याची संकल्पना, त्याचे सुखी व समृद्ध जीवन आणि त्याचा प्रेरणादायी जीवनप्रवास यावर सखोल विचार मांडले. याप्रसंगी इंजि.नरेंद्र गद्रे,राजू देशमुख , यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर गायकवाड यांनी महासम्राट बळीराजा महोत्सव व इतरही विषयावर मार्गदर्शन केले. संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे यांनी कार्यक्रमाचा समारोपीय भाषणात बळीराजाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या सामूहिक संकल्प केला. आभार प्रा. पंढरी पाठे यांनी मानले. या बळीराजा महोत्सवातर्गत तीन दिवस शिवतीर्थ येथे दीपोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगीकोषाध्यक्ष विजय निकम,सहसचिव सचिन डफडे, मैत्री संघटनेचे ज्ञानेश्वर चौधरी,नीरज डफळे,अशोक महाले, डॉ.ललित बोरकरअनिता गरड, स्नेहा निबाळकर, मेघा सरताबे,किशोर देशमुख, सचिन मनवर, संभाजी भिवकर, प्रधुम्यन जवळेकर, तुषार देशमुख,कृष्णा पुसनाके,रमेश होनाडे उदय सरताबे, मनोज ठाकरे, श्याम कोल्हे, संजय कोल्हे, विशाल चुटे, किशोर पोराटकर, शुभम दिवाने, इंजि. प्रज्वल खडसे,अजय देवाकते,आदित्य पाटील इत्यादी उपस्थित होते.

## राळेगाव शहरातील माऊली पार्क लेआउट झाले मद्यपींचे केंद्र
## अल्पवयीन विद्यार्थी घेत आहेत सिगारेट आणि दारूचे व्यसन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - शहराच्या अवतीभवती गेल्या काही वर्षांत अनेक लेआउट उभे राहिले असून, काही ठिकाणी अजूनही घरबांधणी सुरू आहे. अशाच वर्धा रोडवरील माऊली पार्क लेआउट मध्ये आता चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. या ठिकाणी रात्रीच्या वेळी मद्यपींची गर्दी होत असून, अल्पवयीन विद्यार्थीही सिगारेट व दारूच्या व्यसनात गुंतताना दिसत आहेत.

सकाळच्या वेळेस मॉर्निंग वॉकसाठी जाणारे नागरिक सांगतात की, रस्त्यावर दारूच्या बाटल्या, सिगारेटचे पाकिटे, बिसलरी बाटल्या अशा स्वरूपात कचरा दिसतो. या ठिकाणी रात्रीच्या सुमारास तरुण मंडळी दारूचा आस्वाद घेत बसतात आणि नंतर बाटल्या रस्त्यावर फेकून परिसर अस्वच्छ करतात. मॉर्निंग वॉकला जाणारे ज्येष्ठ नागरिकांचा ग्रुप आणि स्थानिक रहिवासी यांनी या प्रकाराविरोधात नाराजी व्यक्त केली आहे.

त्यांनी सांगितले की, "माऊली पार्क परिसरात रात्री सात ते आठच्या दरम्यान पोलिस पेट्रोलिंगची गाडी फिरली, तर असे प्रकार थांबू शकतात." नागरिकांनी राळेगाव पोलिसांना या गोष्टीकडे गंभीरतेने लक्ष देण्याचे आवाहन केले आहे. तसेच पालक वर्गानेही आपल्या मुलांवर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाचे दुर्लक्षित धोरण
# उमरखेड तहसील कार्यालयात शिदोरी आंदोलन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे महायुती शासनाचा जाहीर निषेध करीत काळी दिवाळी शेतकऱ्यांसोबत तहसील कार्यालय उमरखेड येथे करण्यात आली.

शेतकऱ्यांसाठी ओला दुष्काळ तत्काळ जाहीर करा. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्या. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा, या मागण्या शासनाने मान्य न केल्यामुळे पक्षातर्फे बुधवारी तहसील कार्यालय उमरखेड येथे 'काळी दिवाळी शिदोरी आंदोलन' करण्यात आले. शासनाचा जाहीर निषेध करण्यात आला. शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक शेतकरी बांधवांनी बेसन, भाकरी, ठेचा चटणी खाऊन शासनाने एवढा ओला दुष्काळ होऊनही मागण्या मान्य न केल्यामुळे जाहीर निषेध करण्यात आला. याप्रसंगी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख ॲड. बळीराम मुटकुळे, विधानसभा समन्वयक राजेश खामनेकर, उपजिल्हा संघटक डॉ. अजय नरवाडे,

तालुकाप्रमुख सतीश नाईक, शहर प्रमुख अमोल नरवाडे, ढाणकी शहर प्रमुख कांता वासमवार, माजी आरोग्य सभापती संदीप ठाकरे, शिवसेना शहर संपर्कप्रमुख गजेंद्र ठाकरे, शहर संघटक राहुल सोनुने, युवा सेनेचे नितीन शिंदे, संजय पळसकर, संभाजी गोरडकर, शिवसेनेचे तालुका सचिव संतोष जाधव, उपतालुकाप्रमुख गजानन पवार, साहेबराव शिंदे, नागेश गोरेवाड, श्रीराम पाटील कदम, तालुका समन्वयक धर्मेंद्र मुद्दुलवार, शिरीष शिंदे, उत्तम कदम, नागेश कदम, गजानन वानखेडे, गंगाधर शिंदे, गणेश राव कदम, अमोल धुमाळे, अनुसूचित जातीचे तालुकाप्रमुख अनिल कांबळे, उपशहर प्रमुख मुमताज खान, विजय हनवते, रवी कदम, विश्वनाथ मुकेवाड, शिवशंकर मेंडके, सुरेश कल्याणकर, संजय देवकर, अतुल पराते, श्रावण मामीलवाड, दत्तराव कदम, संतोष पवार, बारकू कदम, संदीप मिराशे, शैलेश आसोली, आकाश सूर्यवंशी, खरेदी विक्री संघाचे संचालक विजय हनवते, असंख्य शिवसैनिक व शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

# घाटंजी येथे काळी दिवाळी आंदोलन




**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी : सरकारकडून ओल्या दुष्काळासाठी जी फसवी अनुदान जाहीर करण्यात आले, ते दिवाळीच्या दिवसापर्यंतही शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झाला नाही. दिवाळी सारख्या सणातही शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाकडून करण्यात आले. यामुळे शिवसेना (उबाठा) च्या वतीने काळी दिवाळी आंदोलन करण्यात आले.

शासनाने एक जानेवारी रोजी काढलेल्या जीआरऐवजी नव्याने पूर्वी जीआर अतिवृष्टी बाधितांच्या मदतीसाठी घोषित केला. त्यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे तशी मदत मिळू शकली नाही. अशावेळी प्रत्येक शेतकऱ्याला हेक्टरी किमान ५० हजार रुपयांचे अनुदान मिळायला पाहिजे होते, मात्र ते मिळाले नाही, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यान्या निषेधार्थ निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे घाटंजी तालुका पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर चटणी भाकर खाऊन काळी दिवाळी करून सरकारचा निषेध नोंदविला. यात उपजिल्हाप्रमुख मनोज ढगले, तालुकाप्रमुख भरत दलाल, शहर प्रमुख प्रशांत मस्के व तालुक्यातील शिवसैनिक उपस्थित होते.

# तालुक्यात मेडिकल दुकानांची संगणक प्रणाली फक्त देखावा

## संगणक बिलाशिवाय विकल्या जाते औषधे, अन्न व औषध प्रशासनाची भूमिका संशयास्पद

**चांदूर बाजार प्रतिनिधी**

मेडिकल औषधी विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये, संगणकीय बिल देणे अनिवार्य आहे. मात्र तालुक्यातील ९५ टक्के दुकानांमध्ये, संगणक प्रणाली केवळ दाखवण्यासाठी ठेवण्यात आली आहे.कारण प्रत्यक्षात औषध विक्रीचे सर्वच व्यवहार, संगणकीय बिला विना करण्यात येतात . त्यामुळे मेडिकल दुकानांमधील संगणकीय प्रणाली, ही फक्त दिखावाच असल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर मेडिकल मधील सर्वच औषध विक्री व्यवहार , कोणत्याही नोंदी शिवाय , पावत्याविना करण्यात येतो.एखाद्या ग्राहकाने पावती मागीतली तर,त्यांच्या सोबत दुकानदारा कडून हुज्जत घालण्यात येते.मेडिकल दुकानातील हे सर्व व्यवहार, बिनबोभाट पुणे सुरू आहेत.असे असतांनाच ही अन्न व औषध प्रशासनाची (FDA) भूमिका, या बाबतीत संशयास्पद ठरते आहे.

राज्य सरकारच्या नियमांनुसार, प्रत्येक वैद्यकीय दुकानात संगणक प्रणालीद्वारे, औषध विक्रीचे नोंद ठेवणे बंधनकारक आहे. यामुळे कोणते औषध, कोणत्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर, कोणत्या रूग्णाला दिले गेले. याची स्पष्ट माहिती उपलब्ध राहते. तसेच नोंदीमुळे चुकीच्या औषध विक्रीवर नियंत्रण राहते. मात्र चांदूर बाजार तालुक्यात हे नियम, ९५ टक्के मेडिकल दुकानांमध्ये पाळले जात नाहीत.

स्थानिक औषधी विकत घेणाऱ्या एका नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक मेडिकल दुकानदार संगणक आणि बिलिंग सॉफ्टवेअर फक्त दाखवण्यासाठी ठेवण्यात आली आहे.प्रत्यक्षात औषध विक्री मनमानी पद्धतीने केल्या जाते. अनेकदा रुग्णांकडे डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन नसतानाही, बिनबोभाट पणे औषधे विकली जातात. यामुळे मानवी आरोग्यास जिवित हानी होण्याचा वाढला आहे.



तसेच संगणक प्रणालीद्वारे नोंद ठेवली जात नसल्यामुळे दुकानदार, कोणतीही नोंद न ठेवता औषधे विकतात व नफा कमवितात. त्यामुळे मुदतबाह्य औषधे, बंदी असलेली औषधे, किंवा अतिरिक्त प्रमाणात औषध विक्री सारख्या प्रकारांना प्रोत्साहन मिळते. ही बाब अत्यंत गंभीर आहे.तरी ही याबाबतीत अन्न व औषध प्रशासन मात्र मूग गिळून गप्प बसले आहे.विशेष म्हणजे, इडीए कडून दरवर्षी तपासणीचे आदेश असतानाही, प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याचे स्थानिक पातळीवर दिसून येते. काही दुकानदार तर तपासणीसाठी अधिकारी येण्याआधीच माहिती मिळवतात. त्यानुसार तात्पुरते संगणक सुरू करून, सर्व काही सुरळीत असल्याचा बनाव करतात. यामध्ये अधिकाऱ्यांचीही मिलीभगत असल्याचा संशय नागरिक व्यक्त करतात.

तालुक्यातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी, या प्रकाराबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र त्या फाईलमध्येच अडकून राहिल्या असल्याचे कळते. यामुळे कायदा पाळणारे आणि वैध व्यवसाय करणाऱ्या मेडिकल औषधी विक्रेत्या दुकानदारांना, अन्यायकारक स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. नियम तोडणारे मात्र भरभराटीचा व्यवसाय करत आहेत.औषध विक्री संबंधीचे नियम आणि इडीए चे निर्देश, जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र चांदूर बाजार सारख्या ठिकाणी, या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे .तरी ही अन्न व औषध प्रशासनाने याकडे डोळेझाक करत असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन आणि जिल्हा इडीए विभागाने, तात्काळ याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. संगणक प्रणालीद्वारे नोंद ठेवली जात आहे की नाही, याची नियमितपणे तपासणी करून दोषीवर कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा हा प्रकार अधिकच गंभीर होऊन, सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## फुटबॉलचा विकास करण्यासाठी महादेवा योजना

**अमरावती/का.प्र.**




महाराष्ट्र शासन, क्रीडा विभाग महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन, सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचाविकास प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने महादेवा ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉल मध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्टे आहे.

या योजनेचा भाग म्हणून राज्यातील १३ वर्षाखालील मुले/मुलींसाठी जिल्हा/विभाग आणि राज्यस्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवडचाचणीतुन निवड होणा-या खेळाडूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्या सोबत खेळण्याची एक अभुतपुर्व संधी मिळणार आहे.

तरी सदर निवड चाचणीस्थळी येण्यापुर्वी यासोबत जोडलेल्या गुगल लिंक द्वारे नोंदणी करावी (https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEvA7) आपल्या शाळा,संस्थेचे जास्तीत जास्त फुटबॉल खेळाडूंना महास्पर्धेत सहभागी होण्यास प्रोत्साहित करून? फुटबॉल या खेळात करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर चाचणीचे आयोजन जिल्हा/विभाग/राज्यस्तरावरवर होत असुन अंतिम निवड झालेल्या खेळाडूंना राज्यशासन द्वारे मुलांना प्रोत्साहीत, करिअर घडविण्याच्या दृष्टीने लिओनेल मेस्सी यांच्या सोबत खेळण्याची एक अभुतपुर्व संधी मिळणार आहे तसेच ५ वर्ष स्कॉलरशिप, निवासी प्रशिक्षण, शिक्षण, भोजन , निवास इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. जिल्हास्तर निवड चाचणी स्थळ–पोलिस ग्राऊंड,पोलिस पेट्रोल पंप मागे, अमरावती,चाचणी दिनांक उपस्थिती–दिनांक २९ ऑक्टोंबर २०२५ सकाळी ९.३० वाजता, आवश्यक कागदपत्रे – आधार कार्ड व जन्माचा दाखला (दि.०१.०१.२०१२ ते ३१.१२.२०१३ या दरम्यान जन्मतारीख) संपर्क–श्री. सुशिल सुर्वे,सचिव, अमरावती जिल्हा फुटबॉल संघटना, मो.७८७५६५२५२७ वरील प्रमाणे जास्तीत जास्त खेळाडूंनी उपस्थित राहण्याबाबत गणेश जाधव,जिल्हा क्रीडा अधिकारी,अमरावती यांनी या प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

## दिवाळीच्या पर्वावर प्रविण पोटे यांनी अनाथ व पारधी समाजाला दिला मदतीचा हाथ

**अमरावती/का.प्र.**

दिवाळी हा सण म्हणजे आनंद, आपुलकी आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची परंपरा. हा सण केवळ आपल्या घरापुरता मर्यादित न ठेवता, समाजातील दुर्बल व वंचित घटकांसोबत साजरा करत खऱ्या अर्थाने दिवाळीचा सामाजिक भाव प्राप्त होते.



अशाच सामाजिक जाणिवेतून पोटे पाटील कुटुंबियांनी अनाथ बांधव आणि पारधी समाजातील चिमुकल्यांसोबत दिवाळी साजरी करत एक स्तुत्य उपक्रम राबविला.

या उपक्रमांतर्गत प्रविण पोटे पाटील, श्रुतीताई पोटे पाटील व श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते या चिमुकल्यांना मिठाई, फटाके तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हसू पाहून खरे समाधान लाभल्याची भावना पोटे पाटील कुटुंबियांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान शिवराय कुळकर्णी, चेतन पवार, सुरेखाताई लुंगारे, भारती गुहे, संध्याताई टिकले, प्रकाश पुंड, डॉ. बबन लायदे, मनीष चौबे, अभिजित वानखडे, अंकित कावळे, कावरे साहेब, चक्रे साहेब यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी कार्य करण्याची ही प्रेरणादायी बाब असल्याचे प्रतिपादन उपस्थितांनी केले.

## भारतीय राज्यघटना सर्वधर्मसमभावावर उभी आहे- अ‍ॅड.यशोमती ठाकूर

### दोनद लुंबिनी बुध्द विहारात धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा

**अमरावती/का.प्र**

हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिमसह इतर सर्व धर्मांचा आदर करणे म्हणजे सनातन धम. 'भगवान बुद्धांचे चिवर हे भगवे आहे आणि भिक्कूच्या चिवरसमोर सर्व मानव समान आहेत. भारतीय राज्यघटना देखील सर्वधर्मसमभावावर उभी आहे. त्यासाठी जय भीमचा नारा बुलंद आहे आणि म्हणूनच आपण जय भीम म्हणतो, असे प्रतिपादन माजी मंत्री अ‍ॅड. यशोमतीताई ठाकूर यांनी केले.लुंबिनी पीपल्स डेव्हलपमेंट सोसायटी, दोनदच्या विद्यमाने ६९ वा धम्मचक्र प्रवर्तनदिन दोनद येथील लुबींनी बुध्द विहारात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक मतदारचे मुख्य संपादक अ‍ॅड. दिलीप एडतकर होते तर प्रमुख पाहुणे किशोर बोरकर, प्रा. गोपीचंद मेश्राम, डॉ. कमल राऊत, रमेशचंद्र रामटेके, सुरेश तायडे, डॉ. विजय हटकर, जगदीश गोवर्धन, हरीश मोरे, किशोर भिलकर, सतीश गोटे ,निलेशसरोदे हे होते. राज्यवर्धन बागडे यांनी पंचशील ध्वजारोहण केले. भदंत महाथेरो बुद्धघोष यांनी उपस्थित समुदायास त्रिशरण बुद्धवंदना दिली. लुंबीनी बुद्ध विहाराकरिता ज्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेती दान करण्यात आली त्या शामराव खडसे यांच्या ६५ व्या स्मृतिदिनासह मुलताबाई खडसे, अंबादास खडसे, सीताबाई खडसे, आत्माराम रायबोले, लक्ष्मणराव गवई, श्रावण बागडे, सूर्यभान मेश्राम, मंदाताई मोलके, काशिनाथ खडसे, अशोक पांडे, हरिभाऊ ब्राह्मणे, येनूताई खडसे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

लुंबीनी बुद्ध विहार निर्मितीबद्दल अ‍ॅड. पी. एस. खडसे व बाळकृष्ण खडसे यांच्यासह कार्यकारिणी सह सदस्यांची अ‍ॅड. यशोमतीताई ठाकूर यांनी प्रशंसा केली. नंदकुमार खडसे यांच्या सर्वधर्मसमभाव गीतमाला पान या पुस्तकाचे विमोचन यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता भैय्या मनोहर, पुरुषोत्तम मनोहर, गौतम खडसे, ज्ञानेश्वर सुखदेवे, ओंकार या कोल्हे, साबळे, विक्रा खडसे, शबू बाळ मनोहर यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला महिला मंडळासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे सचिव प्रभाकर शेंडे यांनी केले.

## शिराळा येथे भव्य कृषी मेळावा व उत्कृष्ट शेतकरी पुरस्काराचे आयोजन

**शिराळा :** येथे भव्य कृषी मेळावा व उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार २०२५ स्वर्गीय विनायकराव दादा देशमुख शोध व कृषी प्रतिष्ठान शिराळा तर्फे भव्य कृषी मेळावा व उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. एकुण पुरस्कार १५१००० रुपये राहिल तर उत्कृष्ट कापूस उत्पादक शेतकरी पुरस्कार ५१००० रुपये , उत्कृष्ट सोयाबीन, तुर, चना उत्पादक शेतकरी पुरस्कार ५१००० रुपये तसेच उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार ५१००० रुपये देण्यात येई.



पुरस्कार वितरण मा. ना. दत्ताभाऊ भरणे कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते देण्यात येईल तर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मा .आमदार सुलभाताई खोडके, विधानसभा तसेच विधानपरिषद तथा महासचिव राष्ट्रवादी कॉंग्रेस मा. आ. संजयभाऊ खोडके राहतील तर प्रमुख उपस्थिती या. सौ. सुरेखाताई ठाकरे, मा. बिलासभाऊ म्हहल्ले , मा.सुनिलभाऊ व- हाडे मा संतोषभाऊ महात्मे, मा. अभयभाऊ महल्ले , या. मिलिंदभाऊ तायडे आदी उपस्थित राहणार आहेत . निवड समिती अध्यक्ष उध्वराव भोवाळु तर सदस्य विलासराव खवले सईखा पठाण दादाराव कापसे दिलीप लादे रविभाऊ खाडे वामनराव नागदिवे संदिप उके अभिजित देशमुख बाबुरावजी बोराळकर अनिलभाऊ धायर तर कार्यक्रमाचे आयोजकअध्यक्ष मनोजभाऊ देशमुख स्व. विनायकराव दादा देशमुख शोध व कृषी प्रतिष्ठान समिती शिराळा.

## स्व.विनायकराव दादा देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**शिराळ/ वार्ताहर**

येथील महाराष्ट्र शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष स्व. विनायकराव दादा देशमुख याच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम श्री मनोजभाऊ देशमुख, श्री विलासभाऊ खवले, श्री मिलिंद भाऊ तायडे,श्री संजयभाऊ भुयार, श्री नरेंद्र भाऊ बारबुद्धे,, श्री लीलाधरराव मोहोड, श्री बाबुराव जी बोराळकर यांचे उपस्थितीत पार पडला. यावेळी गावातील व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिराळा परिसरातील शेतकऱ्यांसाठी उत्कृष्ट सोयाबीन उत्पादक शेतकरी पुरस्कार ५१,००० रुपये पुरस्कार व सन्मानचिन्ह तसेच उत्कृष्ठ कापूस उत्पादक शेतकरी ५१००० व स्मृतिचिन्ह तसेच महिला शेतकरी ५१००० पुरस्कार व स्मृतिचिन्ह राज्याचे कृषिमंत्री श्री दत्ता मामा भरणे ह्यांच्या हस्ते व आमदार सुलभाताई खोडके आमदार संजयराव खोडके ह्यांच्या उपस्थितीत देण्याची घोषणा मनोजभाऊ देशमुख यांनी केली. तसेच येणाऱ्या काळात गावाच्या व सर्कल च्या विकासाकरिता वेगळी भूमिका वेगळा निर्णय घेण्याची इच्छा सुद्धा मनोजभाऊंनी बोलून दाखवली कार्यक्रमाला गावातील दादाराव कापसे संजय भोवाळु दिनेश मुंदाने, बिलासराव गायकवाड, सुधाकरराव वानखडे अभिजित देशमुख, त्र्यंबकराव साखरवाडे, सुरज फरतोडे, सुनील कुकडे, कृषी सहायक मारोती जाधव, बाबुराव धाकडे, मुसाब्बिरखा पठाण, शिवा भंडारे शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिराळा परिसरातील लोकांची उपस्थिती होती.



## महामानवांच्या चरित्राचे पूजन करून दिवाळी साजरी

### ढेपे कुटुंबांचा उपक्रम

**अंजनगाव सुर्जी** -आजच्या घडीला महामानवांच्या चरित्राचे वाचन करून त्यांचे विचार घरातील नव्या पिढीला रुजावे या उदात्त हेतूने अंजनगाव येथील आकाशविहार मधील रहिवासी सत्यशोधक विचारांचे दांपत्य ललित ढेपे व राधा ढेपे या उभयत्यांनी दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीपूजन ऐवजी महामानवाच्या पुस्तकाचे पूजन केले. सोबत महिलांचे संरक्षण तिचा सन्मान करणे ही काळाची गरज आहे. या महापुरुषांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कल्याणी व नितेश ढेपे यांची कन्या कु.निधी आणि मयुरी व राजेश ढेपे यांची कन्या कु.विधी यांचे पाय धुवून,



ओवाळून,पूजन करून लेकीच्या प्रती सन्मान व्यक्त केला. यावेळी राधा व ललित ढेपे यांचे पुत्र दिव्यम, दिव्यांश, अमेय आजी सुवर्णा ढेपे आजोबा प्रल्हाद ढेपे, तृप्ती चिलात्रे, मंगेश चिलात्रे, चिन्मय चिलात्रे, आदी उपस्थित होते. परिसरात ढेपे कुटुंबीयांच्या या आगळ्यावेगळ्या दिवाळी परंपरेची चांगली चर्चा होत आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा तिसरा टप्पा ३ नोव्हेंबरपासून

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांसाठी 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास शासनाने मान्यता दिली असून, ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

२०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान काही नवीन उपक्रमांसह राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानामध्ये विविध स्तर आणि वर्गवारीमध्ये विजेत्या शाळांना एकूण ७२ कोटी २२ लाख अभियानासाठी शाळांची विभागणी (अ) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि (ब) उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारीत करण्यात येत आहे. प्रत्येक स्तरावरील विजेता या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येईल.

हे अभियान संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल. अभियानात सहभागी होऊन स्पर्धा करणाऱ्या शाळांना पायाभूत सुविधा- ३८ गुण, शासन ध्येयधोरण अंमलबजावणीसाठी-१०१ गुण आणि शैक्षणिक संपादणूकसाठी- ६१ गुण असे एकूण २०० गुण असतील.

## शकुंतला रेल्वेस्टेशनवर प्रतीकात्मक जनआंदोलनातून दिवाळी

**अचलपूर (प्रतिनिधी)**

दिवाळी म्हणजे घराघरात आनंद, प्रकाश आणि एकतेचा संदेश पसरवणारा सण, पण जर हा सण समाजातील सर्व घटकांना सहभागी करून एकत्रित साजरा झाला, तर त्याचा आनंद आणि अर्थ अधिक गहिरा ठरतो. अशाच सामाजिक एकतेचा, आनंदाचा आणि ऐक्याचा संदेश देत शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीने आपल्या ३७ व्या प्रतीकात्मक जनआंदोलनामधून शकुंतला रेल्वे स्टेशनवर एक अनोखी दिवाळी साजरी केली.

या उपक्रमात माहेर फाउंडेशन, आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटन, जमात-ए-इस्लामिक महिला संघटन, मानव सेवा समिती, व्यापारी संघटन आणि क्रांतिज्योती संघटन यांनी उत्साहाने सहभाग घेतला. दुपारी ४ वाजता रेल्वेस्टेशन परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसर चकचकीत करण्यात आला. त्यानंतर महिला लाभार्थ्यांना साड्या वाटप करण्यात आल्या. सत्याग्रह समितीच्यावतीने नागरिक, महिला आणि बालगोपाळांना फराळ, मिठाई आणि फटाके वाटप करण्यात आले. संध्याकाळी ६ वाजता रेल्वे ट्रॅकवर शेकडो हातांनी



शेकडो दिवे सजावट करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. बालगोपाळांच्या हातात फराळ आणि फटाक्यांचे पाकीट येताच त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंदाने परिसर उजळून निघाला. त्याक्षणी प्रकाशही लाजेल, असा भाव उजळला होता.शकुंतला ब्रॉडगेजचा डीपीआर मार्गी लागल्याने नागरिकांच्या मनात नव्या आशेचा किरण उजळला आहे. 'शकुंतला रेल पुन्हा एक्सप्रेस बनून धावेल,' या भावनेने नागरिकांत प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या सर्व आंदोलनांमागे आणि प्रयत्नांमागे शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचे कार्य कौतुकास्पद ठरले. कार्यक्रमात सत्याग्रही योगेश खानजोडे, डॉ. राजा धर्माधिकारी, दीपा तायडे, शारदा उईके, संजय डोंगरे, शंकर बारखडे, दयाराम चंदेले, विजय गोंडचवर, राजेश पांडे, मुरलीधर ठाकरे, रामदास मसने, कैलाश ठोसर, सारिका, प्यारेलाल प्रजापती तसेच जमात-ए-इस्लामिक हिंदच्या महिला मेहरबानो, नझिया खान, नगमा कौसर, मुब्शेर फिरदौस, यास्मीन बानो आदींची उपस्थिती होते.

# सायबर गुन्हेगारीत ज्येष्ठांचा बळी

**सा**यबर गुन्हेगारीत ज्येष्ठ नागरिक हे सध्या सर्वात सोप्पे लक्ष्य ठरत आहेत. त्यांच्या वयाचा, विश्वासाचा आणि एकटेपणाचा फायदा सायबर गुन्हेगार सहज उठवत आहेत. माहितीचा अभाव, एकटेपणा आणि डिजिटल साक्षरतेची कमतरता अशा कारणांमुळे ज्येष्ठ नागरिक ऑनलाइन फसवणुकीला सहज बळी पडतात. पुणे शहरातही नुकत्याच घडलेल्या अनेक प्रकरणांतून ही बाब उघड झाली आहे. शेअर बाजाराच्या आमिषाने फसविणे, बँक व विमा कंपनीच्या नावाखाली गंडा घालणे, डिजिटल अटक सारख्या पद्धतींनी ज्येष्ठांना भीती दाखवली जात आहे.

शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक इंटरनेट, स्मार्ट फोन आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर करतात. मात्र, त्यांना याच्या धोक्याबाबत पुरेशी माहिती नसते. ऑनलाइन व्यवहार करत असताना कोणती सावधानता बाळगायची याची पुरेशी कल्पना त्यांना नसते. विशेषत: बहुतेक ज्येष्ठ नागरिक एकटे जीवन जगत असतात. त्यांची मुले परगावी किंवा परदेशात नोकरीनिमित्त असतात. यामुळे त्यांना एकटेपणा जाणवत असतो. यामुळे ते ऑनलाइन फसवणुकीला सहजासहजी बळी पडतात.

सायबर गुन्हेगारांना ही बाब माहीत असल्याने ते ज्येष्ठ नागरिकांना सहजासहजी जाळ्यात अडकवतात. सायबर गुन्हेगार अनेकदा सरकारी अधिकारी असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकांना घाबरवतात किंवा विश?वासात घेत त्यांच्याकडून हवी असलेली गोपनीय माहिती काढून घेतात. जसे की केवायसीच्या नावाखाली बँक खात्याची माहिती, मोबाइलवर आलेला ओटीपी आदी. तर काही वेळा त्यांना तुमच्या मोबाइलचा गैरवापर केला गेला आहे वा तुमच्या नावाने पाठवलेल्या पार्सलमध्ये अमलीपदार्थ सापडले आहेत असे भासवून घाबरवतात व पैसे उकळतात.

मध्यंतरी महावितरणकडून थकीत बिल न भरल्यास तातडीने वीजजोड तोडला जाईल अशी भीती दाखवत ज्येष्ठांना टार्गेट केले जात होते. तर गॅस कंपनींच्या नावाने केवायसीची ऑनलाइन मागणी केली जात होती. या प्रकरणांत भीतीपोटी पाठवलेल्या लिंक ओपन करून किंवा ओटीपी शेअर करून अनेक ज्येष्ठ नागरिकांनी लाखो रुपये गमावले होते. गॅस कंपन्या आणि महावितरणकडून जनजागृती झाल्यावर हे प्रकार कमी झाले. मात्र, यानंतर ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक प्रलोभने आणि सोप्या पद्धतीने जास्त पैसे कमवण्याचे आमिष दाखवून गुंतवणुकीच्या फसव्या योजनांमध्ये अडकवले जात आहे. सध्या तर डिजिटल अरेस्टचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहेत. यातही ज्येष्ठ नागरिक टार्गेट केले जात आहेत.

**सायबर गुन्हेगारांना ही बाब माहीत असल्याने ते ज्येष्ठ नागरिकांना सहजासहजी जाळ्यात अडकवतात. सायबर गुन्हेगार अनेकदा सरकारी अधिकारी असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकांना घाबरवतात किंवा विश्वासात घेत त्यांच्याकडून हवी असलेली गोपनीय माहिती काढून घेतात. जसे की केवायसीच्या नावाखाली बँक खात्याची माहिती, मोबाइलवर आलेला ओटीपी आदी. तर काही वेळा त्यांना तुमच्या मोबाइलचा गैरवापर केला गेला आहे.**

आर्थिक फसवणुकीचे जाळे

सोशल मीडिया किंवा मेसेजिंग ॲपवरून गुंतवणूक योजनांची अफवा पसरवून, प्रारंभिक लघु परतावा देऊन विश?वास मिळवतात. नंतर मोठ्या रकमेची मागणी करतात आणि अचानक गायब होतात. विशेषतः शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष दाखवून असे प्रकार घडत आहेत. अनेकांना शेअर मार्केटबद्दल माहिती नसते, मात्र तरीही ते अशा फसव्या जाहिरातींना बळी पडून लाखो रुपये गमवत आहेत. यामध्ये अनेकांनी आयुष्याची पुंजी गमावली आहे. सायबर पोलिसांच्या मते, तुम्ही स्वत: शेअर मार्केटचा अभ्यास करून स्वत:चे खाते उघडून गुंतवणूक केली तरच ती सुरक्षित असते.

केवायसी आणि डिजिटल अरेस्ट

बनावट कॉल व संदेश तसेच बँक अधिकारी, विमा प्रतिनिधी किंवा सरकारी कर्मचारी असे ढोंग करून केवायसी, ओटीपी किंवा कार्ड तपशील मागवला जात आहे. बहुतेक वेळा तत्काळ पैसे भरा असा तगादा लावला जातो. समोरच्या व्यक्तीला विचार करण्यासाठी किंवा इतरांचा सल्ला घेण्यासाठी वेळही दिला जात नाही. समोरच्या सायबर गुन्हेगाराच्या दबावाखाली ज्येष्ठ नागरिक भांबावून जातात. ते त्याच्या इतक्या आहारी पडतात की समोरचा सांगेल तसे करण्यास तयार होतात. काही घटनांमध्ये तर ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःच्या मुदत ठेवी मोडून सायबर भामट्यांना ऑनलाइन पैसे दिले आहेत. डिजिटल अटकेत तर पीडिताला अमली पदार्थ तस्करी, मनी लाँडरिंगसारख्या प्रकरणांत दोषी ठरल्याचे खोटे सांगून भीती दाखवतात. पीडिताला कॅमेऱ्यासमोर ठेवून धमकी देऊन ताबडतोब पैसे मागतात.



सायबर चोरटे सतत नवे तंत्र अवलंबत आहेत; परंतु त्यांचे बळी होण्यापासून वाचण्यासाठी जागरूकता, कुटुंबाचा आधार आणि तंत्रज्ञानाची माहिती आवश्यक आहे. पुणे शहरातील उघडकीस आलेली अनेक प्रकरणे आपल्याला हे स्पष्ट करतात की सायबर सुरक्षा ही फक्त तंत्रज्ञानाशी निगडीत नाही तर सामाजिक व शैक्षणिक समस्याही आहे. ज्यावर सरकार, पोलीस, स्थानिक संस्था आणि कुटुंब एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे.

**प्रतिबंध आणि सुरक्षेचे उपाय**

**डिजिटल साक्षरता व जनजागृती :** स्थानिक मंडळे, सामाजिक संस्थांद्वारे नियमित प्रशिक्षण वर्ग आणि वर्कशॉप चालवावेत. कुटुंबाने वृद्ध सदस्यांशी ऑनलाइन व्यवहारावर चर्चा करावी; कोणतीही आर्थिक विनंती किंवा अनोळखी लिंक फरक न करता कुटुंबाशी शेअर करावी. कोणत्याही कॉलवर ओटीपी, पीन नंबर, कार्ड तपशील सांगू नयेत. बँक कधीही अशी माहिती फोनवर विचारत नाही. फसवणूक झाली तर त्वरित बँकेशी संपर्क करणे, तातडीने एटीएम कार्ड ब्लॉक करणे, सायबर पोलीस/स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवणे आणि नॅशनल सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार करणे. संशयास्पद कॉल/मेसेज/व्हॉट्सप चॅटसचे स्क्रीनशॉट सेव्ह करा; हे पोलीस तपासासाठी उपयुक्त ठरते. अज्ञात लिंक्सवर क्लिक करणे टाळणे, मजबूत आणि वेगवेगळे पासवर्ड वापरणे.

ज्येष्ठांची कुटुंबात मानहानी

४० हजार रुपयांपासून तब्बल दोन कोटी रुपयांपर्यंत रक्कम गमावलेल्या अनेक ज्येष्ठांना फसवणुकीनंतर फक्त आर्थिक धक्काच बसत नाही, तर कुटुंबीयांचा रोष, अपमान आणि नात्यांतील दुरावाही सहन करावा लागतो. सायबर फसवणुकीत विशेषतः सेक्सटॉर्शनच्या प्रकरणांमध्ये अडकलेल्या ज्येष्ठांना नातेवाईक आणि समाजात शरमेने मान खाली घालावी लागते. आपली आयुष्यभराची पुंजी गमावल्याने त्यांचे आर्थिक पाठबळ कोसळते आणि त्यातच मुलांशी नातेसंबंधही बिघडतात. अनेकदा मुलांकडून- आम्हाला कधी एक रुपया दिला नाही, मात्र अनोळखी व्यक्तीला सर्व काही दिलेत अशा टोमण्यांना सामोरे जावे लागते. परिणामी, काही मुले जबाबदारी नाकारतात व ज्येष्ठ अधिकच एकटे पडतात.

सायबर तज्ज्ञांचा सल्ला

सायबर फसवणुकीचे प्रमाण लक्षात घेऊन तज्ज्ञ व तपास यंत्रणांतील अधिकारी ज्येष्ठ नागरिकांना स्मार्टफोनऐवजी साधा बटणाचा मोबाइल वापरण्याचा सल्ला देतात. इंटरनेट नसल्याने भामट्यांच्या जाळ्यात अडकण्याचा धोका कमी होतो. जर स्मार्टफोन वापरावाच लागला, तर तो बँक खाते, ऑनलाइन बँकिंग किंवा आधारकार्डला जोडू नये, असा इशारा तज्ज्ञ देतात. अनेकदा गुन्हेगार रिमोट अ?क्सेस घेऊन खात्यातील पैसे वळवतात. त्यामुळे प्रतिष्ठेपेक्षा सुरक्षिततेला प्राधान्य देऊन व्यावहारिक कारणांसाठी साधा मोबाइल वापरणे हेच ज्येष्ठांसाठी योग्य ठरेल, असा ठाम सल्ला दिला जात आहे.

**संजय कडू**

# दिवाळीचा फराळ आणि ऐतिहासिक संदर्भ



दिवाळीचा काळ म्हणजे पावसाळा संपून शेतात नवीन पीक (खरीप) तयार होण्याची वेळ असते. शेतीत वर्षभर केलेल्या कष्टानंतर आलेल्या नवीन पिकाचा आनंद फराळाच्या माध्यमातून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील ओव्या (उदा. दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळीष्ठ) या परंपरांचा शेती आणि पशुधनाशी असलेला संबंध दर्शवतात. दिवाळीचा फराळ आपल्या समृद्ध कृषी, ऐतिहासिक परंपरेशी जोडलेला आहे. तो केवळ चवदार खाद्यपदार्थ नाही, तर ऋतूप्रमाणे शरीराचे आरोग्य जपणारे पौष्टिक विज्ञान आणि कुटुंब, समाज यांना एकत्र आणणारा एक शक्तिशाली सांस्कृतिक दुवा आहे.

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि नवचैतन्याचा सण. हा सण साजरा करण्यापूर्वी भारतीय संस्कृतीमधील एका महत्त्वाच्या पैलूवर विशेष काम केले जाते, तो पैलू म्हणजे दिवाळीची साफसफाई. ही केवळ घराची स्वच्छता नसते, तर ती मनात वर्षभर जमा झालेला 'अव्यवस्थितपणा' दूर करण्याची एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे. याच प्रक्रियेला जगप्रसिद्ध जपानी जीवनशैली तज्ञ मेरी कोंडो यांच्या 'कोनमारी' या तत्त्वज्ञानाची जोड दिल्यास दिवाळीची तयारी अधिक अर्थपूर्ण आणि परिणामकारक होऊ शकते.

त्याचबरोबर दिवाळीच्या उत्सवाचा अविभाज्य भाग म्हणजे दिवाळीचा फराळ. या फराळाची चव, त्यामागचे ऐतिहासिक संदर्भ, त्यांचे पौष्टिक मूल्य आणि कुटुंबाला एकत्र आणणारे फराळाचे सांस्कृतिक सामर्थ्य या लेखात सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दिवाळीची लगबग केवळ साफसफाई आणि रोषणाईने पूर्ण होत नाही. ती पूर्णत्वाला जाते ती घरात तयार होणा-या फराळ नावाच्या विशेष दिवाळी मेजवानीने.

फराळ हा केवळ खाद्यपदार्थांची रेलचेल नसून तो भारतीय संस्कृती, ऋतुमानाचे विज्ञान आणि कुटुंबाना जोडणारा दिवाळी सणाचा महत्त्वाचा धागा आहे. दिवाळी साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबर (आश्विन-कार्तिक) महिन्यात येते. हा काळ म्हणजे पावसाळा संपून शेतात नवीन पीक (खरीप) तयार होण्याची वेळ असते. शेतीत वर्षभर केलेल्या कष्टानंतर आलेल्या नवीन पिकाचा आनंद फराळाच्या माध्यमातून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील ओव्या (उदा. दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळीष्ठ) या परंपरांचा शेती आणि पशुधनाशी असलेला संबंध दर्शवतात.

**ऐतिहासिक उगम** – प्राचीन उपनिषदे आणि पुराणांमध्ये शरद ऋतू (आश्विन-कार्तिक) मध्ये केल्या जाणा-या यज्ञांचा आणि मेजवान्यांचा उल्लेख आहे. दिवाळी याचदरम्यान येते. काही ऐतिहासिक नोंदीनुसार, लाडूसारख्या गोड पदार्थांची निर्मिती सुमारे २४०० वर्षांपूर्वी मिठाई म्हणून नव्हे, तर औषधी गरज म्हणून झाली असावी. धान्य, तूप आणि गूळ किंवा साखर वापरून बनवलेले हे लाडू पौष्टिक आणि शारीरिक थकवा दूर करण्यासाठी वापरले जात असत.

**प्रादेशिक पदार्थांचा समावेश**

महाराष्ट्राच्या फराळात काही मूळ पदार्थ आहेत, तर काही इतर प्रांतांतून स्वीकारले गेले आहेत.

चकली : दक्षिण भारतातून आली असून (तेथे मुरुक्कू म्हणतात), महाराष्ट्रात ती अविभाज्य भाग बनली आहे. येथे ती तांदूळ आणि विविध डाळींच्या भाजणीपासून बनवली जाते, जी तिला अधिक पौष्टिक बनवते.

**बुंदीचा लाडू :** मूळतः राजस्थानचा मानला जातो. तो पूर्णपणे स्वीकारला गेला आणि बेसन तसेच रव्याच्या लाडवांसोबत महाराष्ट्राच्या फराळाचा आवश्यक गोड पदार्थ बनला.

**करंजी :** महाराष्ट्रातील एक पारंपरिक गोड पदाथ. यात मुख्यतः सुके खोबरे, रवा, खसखस आणि वेलचीचे सारण भरले जाते. करंजीचा इतिहास प्राचीन आहे. मौर्यकालीन शिल्पांमध्ये करंजीसारखी मिठाई दर्शविणा-या शिल्पाकृती आढळतात. प्राचीन संस्कृत पाकशास्त्रीय ग्रंथात याचा उल्लेख 'पूपक' म्हणून आढळतो.

मेरी कोंडो शैलीतील साफसफाई आपल्याला भौतिक आणि मानसिक गोंधळ दूर करून एका शांत व अर्थपूर्ण जीवनाची कल्पना साकारण्यास मदत करते. घरात आनंद देणा-या वस्तूच ठेवण्याचा हा संकल्प घरात येणा-या लक्ष्मीचे स्वागत अधिक जागरूकपणे करण्याची संधी देतो.

दिवाळीचा फराळ आपल्या समृद्ध कृषी, ऐतिहासिक परंपरेशी जोडलेला आहे. तो केवळ चवदार खाद्यपदार्थ नाही, तर ऋतूप्रमाणे शरीराचे आरोग्य जपणारे पौष्टिक विज्ञान आणि कुटुंब, समाज यांना एकत्र आणणारा एक शक्तिशाली सांस्कृतिक दुवा आहे.

# विज्ञान रंजन पिकतील मोती

**स्वा**ती नक्षत्राचा पाऊस सागरी भागात पडला तर 'मोती' पिकतात असं आम्ही बालपणापासून ऐकत आलोय. आपल्या कृषिप्रधान देशात २७ नक्षत्रांपैकी पावसाची नऊ नक्षत्रेच अधिक महत्त्वाची. 'हस्त' नक्षत्राचा पाऊस पडला की, 'मृग' नक्षत्रापासून संततधार धरणारा पाऊस संपत आल्याची नांदी. 'हस्ता'नंतरच्या 'चित्रा' नक्षत्रात पावसाने शेतकऱ्यांसाठी उसंत घ्यायला हवी ही अपेक्षा आणि त्यानंतरच्या 'स्वाती' नक्षत्रात मात्र मोत्यांच्या उत्पादनासाठी 'आ'वासून बसलेल्या शिंपल्यांमध्ये पावसाचे थेंब पडले तर त्यातून मोती पिकतात असं शेकडो वर्षांचं अनुभवजन्य निरीक्षण.

या वर्षी दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी स्वाती नक्षत्र लागतं. यंदाचा पाऊस फारच लांबला. हा लेख लिहीत असताना किनारपट्टीच्या भागातून त्याने माघार घेतलेली दिसतेय खरी, पण समुद्रात वारंवार उद्भवणारे कमी दाबाचे पट्टे आणि चक्रीवादळे यांची कारणे काहीही असली तरी शेतातल्या मोत्यासारख्या आणि सागरातल्या खऱ्या मोत्यांच्या 'पिका'वर त्याचा विपरित परिणाम दिसतोय हे मात्र वास्तव.

आता केवळ 'स्वाती' नक्षत्रातल्या पावसाच्या पाण्यानेच 'मोती' पिकतात असं नाही. कारण मोत्यांची पैदास जगात सर्वत्र होत असते. हिंदुस्थानातले मोती उत्पादन परंपरेने मोठ्या प्रमाणावर होते ते दक्षिणेकडच्या श्रीलंकेजवळच्या 'गल्फ ऑफ मन्नार' किंवा मन्नारच्या आखातामध्ये मोत्यांची निर्मिती होत असल्याची आणि हे विविधरंगी नैसर्गिक मोती दक्षिणेतील पाण्डय़ राजांपासून ते सम्राट अशोकाच्या राजप्रासादापर्यंत पोहोचत असल्याचा इतिहास आहे. या ठिकाणी सापडणाऱ्या आठ प्रकारच्या मोत्यांची नोंद आढळते.

मन्नारप्रमाणेच हिंद महासागर, लाल समुद्र या भागांत प्राचीन काळापासून अनेक पाणबुडे समुद्रातून मोती काढत असल्याचेही उल्लेख आहेत. मोती हा तेजस्वी नैसर्गिक मणी दागिन्यांची शोभा वाढवणारा आहेच. मोत्याच्या माळा, कंठा, कानातली भिकबाळी वगैरे पुरुषी दागिनेही त्या काळात मोठय़ा प्रमाणावर वापरले जात. राजेरजवाड्यांना मिळणाऱ्या बहुमोल



नजराण्यांमध्ये मोत्याचा समावेश असायचा. काही राजांकडे पोत्यांनी मोती असायचे आणि ते धान्यासारखे वाळवले किंवा सुकवले जायचे अशा कथा अतिरंजित असतीलही, पण त्यातून मोत्यांची पैदास आणि हव्यास या गोष्टी प्रतिबिंबित होतात. पाश्चात्य देशात स्पॅनिश लोकांनी क्युबा, व्हेनेझुएला, मार्गारिटा इत्यादी देशांजवळच्या समुद्रात मोत्यांचा शोध घेणाऱ्या मोहिमा काढल्या. या भागांत मोत्यांची पैदास करणाऱ्या आणि शिंपल्यात 'ऑइस्टर' किड्यांचा मोठय़ा प्रमाणावर अधिवास होता.

वैज्ञानिकदृष्टय़ा मोती म्हणजे शिंपल्यातल्या लिबलिबित किंवा गोगलगायीसारख्या मऊ शरीराच्या मोलस्क (किंवा कालव) जिवांद्वारे तयार होणारा कठीण पदार्थ आहे. एखाद्या सूक्ष्म वाळूकणाभोवती हे शिंपल्यातले जीव त्यांच्या शरीरातून स्रवणाऱ्या रसाचं 'कवच' करतात. त्यात मुख्यत्वे कॅल्शियम कार्बोनेट असल्याने ते घट्ट होत जातं. या द्रवाचे एकावर एक थर साचून 'मोती' बनतो. अत्यंत गोलाकार मोती जास्त किमतीचा ठरतो. अनेक मोती वेगवेगळय़ा आकारांचे असतात. नैसर्गिक मोत्यांचे शिंपले मिळवण्यासाठी सागरतळी फार शोध घ्यावा लागतो. मोत्याची प्रचंड मागणी नैसर्गिक मोती पूर्ण करू शकत नाहीत हे लक्षात आल्यावर मोत्यांची निर्मिती करणाऱ्या 'ऑइस्टर'ची समुद्राच्या खाऱ्या किंवा गोड्या पाण्यातही 'शेती' करून कृत्रिमरीत्या मोती उत्पादन करण्यावर विचार सुरू झाला. त्याचाही इतिहास मोठा आहे. चीनमध्ये सन ९६० च्या काळात 'सॉन्ग' राजांनी अशा उद्योगाला प्रोत्साहन दिलं. १६ व्या शतकापासून ही चिनी विद्या युरोपात पोहोचली. त्यांनी त्यावर मायक्रोस्कोपसारखी उपकरणं वापरून विविध प्रयोग केले. त्यातून कृत्रिम मोती निर्मितीच्या 'सॅण्ड ग्रेन कॉझेशन' किंवा 'पॅरसाइट कॉझेशन' पद्धती विकसित झाल्या.

१९१६ मध्ये जपानने त्यात आघाडी घेतली. 'झकोया पर्ल ऑयस्टर' शोधून त्यांनी अक्षरशः मोत्याचं पीक घेतलं! अर्थात, त्या प्रयत्नात १२ वर्षे गेली. म्हणजे १९२८ पासून कृत्रिम मोत्यांची पैदास वेगाने होऊ लागली. त्याला आता एक शतक होत आलंय. रंगीत खनिज मिसळून रंगीत मोतीही तयार केले जाऊ लागले. उदाहरणार्थ, कोबाल्ट क्लोराइडचा वापर करून गुलाबी रंगाचे मोती बनवले जातात. कृत्रिम मोत्यांमध्ये अकोया, ताहितियन, गोड्या पाण्यातील तसेच दक्षिण सागरातील मोत्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. अकोया मोती चमकदार, तर ताहितियन मोती काळ्या रंगाचे (ब्लॅक पर्ल) असतात. दक्षिण सागरातील मोती सोनेरी रंगाचे तसेच शुभ्र रंगाचेही बनतात. गोड्या पाण्यात बनवले जाणारे मोती विविध आकार आणि रंगांचे बनवता येतात. जगभर प्रतिवर्षी सुमारे २००० मेट्रिक टन कृत्रिम मोत्यांची निर्मिती होते. त्यात चीनचा वाटा १६०० टनांचा असतो.मोत्याची किंमत त्याच्या आकार, वजन आणि चमकदारपणावरून ठरते. मोती हजारापासून, लाखो रुपये किमतीचे असू शकतात. दागिन्यांसाठी तर मोत्यांचा वापर होतोच, पण आयुर्वेदात, 'मौक्तिक भस्म'सारख्या औषधांसाठीही होतो.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला जिल्हा विशेष

# सरसकट नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ होण्याची शक्यता !

## खेट्रीत कोतवालऐवजी खाजगी व्यक्तीकडून कागदपत्रे संकलन

■ *प्रतिनिधी | खेट्री* ■

***पातूर तालुक्यातील विविध भागात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाच्या वतीने नुकसानीचे सरसकट सर्वेक्षण सुरू असले तरी या सर्वेक्षण प्रक्रियेत अनेक त्रुटी समोर येत आहेत. खेट्री गावात तलाठी फिरकत नसून, कोतवालऐवजी एका खाजगी व्यक्तीकडून शेतकऱ्यांची आधार कार्डे, पासबुकच्या झेरॉक्स प्रती गोळा केल्या जात असल्याची माहिती समोर आली आहे.***

शासनाच्या अधिकृत आदेशांशिवाय अशा प्रकारे खाजगी माध्यमातून कागदपत्रे संकलन करणे ही प्रक्रियेच्या पारदर्शकतेस बाधा मानली जात आहे. शेतकऱ्यांकडून गोळा केलेली कागदपत्रे शासकीय यंत्रणेकडे न पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात असून, त्यामुळे अनेक शेतकरी सरसकट पीक नुकसानीच्या लाभापासून वंचित राहू शकतात.




शेतकऱ्यांकडून अशी मागणी होत आहे की, आधार कार्ड व पासबुकच्या झेरॉक्स प्रती केवळ शासकीय अधिकारी - तलाठी किंवा कोतवाल यांनीच जमा कराव्यात, जेणेकरून पारदर्शकता राहील आणि शेतकऱ्यांचा विश्वास टिकून राहील.

**तलाठी, कोतवाल फिरकेना; शेतकरी हताश ! :** खेट्री गावचे तलाठी धम्मपाल नकाशे यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाल्याने अतिरिक्त प्रभारी तलाठी गावात येत नाहीत. कोतवाल देखील गावात फिरकत नसल्याने सर्वेक्षणाचे काम खाजगी व्यक्तीकडे सोपविण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की, पैसे देण्यास नकार दिल्यास त्या शेतकऱ्यांची कागदपत्रे शासकीय कार्यालयात पोहोचत नाहीत. परिणामी, अशा शेतकऱ्यांना नुकसानीच्या भरपाईपासून वंचित राहावे लागत आहे. यापूर्वी सुद्धा अशाच प्रकारे अनेक शेतकरी नुकसानभरपाईच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे.

'सरसकट पीक नुकसानीचा लाभ देण्यासाठी आधार कार्ड आणि पासबुकच्या झेरॉक्स प्रती गोळा करण्याचे काम शासकीय यंत्रणेकडून न करता खाजगी दलालांमार्फत केले जात आहे. हे अत्यंत गैर असून, अशा पद्धतीमुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत होत आहे. दलालांना पैसे न दिल्यास कागदपत्रे शासकीय कार्यालयात पोहोचत नाहीत. त्यामुळे शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.'

**जहूर खान,** सरपंच खेट्री

## राजस्थानी नामदेव भवनात कीर्तन महोत्सव

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

कार्तिक मासानिमित्त दाबकी रोड परिसरातील गुरुदत्त नगर येथे काकड आरती मंडळाच्या वतीने संत श्री जगद्गुरू तुकाराम महाराज गाथा पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दाबकी रोडवरील गुरुदत्त नगर परिसरातील राजस्थानी नामदेव भवनामध्ये बुधवार दि. २९ ऑक्टोबरपासून दि. ५ नोव्हेंबरपर्यंत हा भव्य कीर्तन महोत्सव पार पडणार.

या कीर्तन महोत्सवात बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता पाळोदीचे ह.भ.प. राजेंद्र महाराज वक्ते कीर्तन सेवा देतील. या नंतर गुरुवार दि. ३० ऑक्टोबर रोजी गंगाखेडचे ह.भ.प. माणिक महाराज शास्त्री; शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी मुक्ताईनगरचे ह.भ.प. वाल्मिक महाराज सुरायकर; शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी भगवानगडचे ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री भक्तिभावाने समारोप करण्यात येईल.

# किसान ब्रिगेडच्या आंदोलनाला लोकप्रतिनिधींचा प्रतिसाद

## नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात शासकीय खरेदी केंद्र सुरू होणार

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

कापूस आणि सोयाबीन खरेदीसाठी शासकीय केंद्र सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना अल्प दरात उत्पादन विकले असल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर किसान ब्रिगेडने लोकप्रतिनिधींच्या घरासमोर घेराव आंदोलनाचा इशारा दिला होता.



मात्र, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर आणि आमदार अमोल मिटकरी यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची दखल घेत थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली. यानंतर शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आमदार रणधीर सावरकर आणि आमदार अमोल मिटकरी यांनी किसान ब्रिगेडला दिली आहे.

लोकप्रतिनिधींच्या या सकारात्मक प्रतिसादाबद्दल किसान ब्रिगेडने आभार व्यक्त करत आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात खरेदी केंद्र सुरू न झाल्यास १० नोव्हेंबरला बेमुदत घेराव आंदोलन करण्यात येईल, अशी भूमिका किसान ब्रिगेडने स्पष्ट केली आहे.

किसान ब्रिगेडने पुढे अशी मागणी केली आहे की, आतापर्यंत अल्प दरात सोयाबीन विकणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून प्रति शेतकरी दोन हजार रुपये नाफेडमार्फत देण्यात यावेत. तसेच खरेदी केंद्र सुरू झाल्यानंतर अतिरिक्त २००० रुपये प्रति क्विंटल किंवा एकरी २०,००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत.


शेतकऱ्यांनी आपला माल नाफेडच्या केंद्रातच विकावा, तसेच कुणालाही आपले सातबारे किंवा आधार कार्ड देऊ नये, असे आवाहन किसान ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे. कोणी जबरदस्तीने अशी मागणी करत असल्यास त्याची माहिती किसान ब्रिगेडला द्यावी, असेही संघटनेने सांगितले आहे.

**नोव्हेंबरमध्ये केंद्र सुरू करणे ही जबाबदारी – आमदार रणधीर सावरकर**



नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी शासन आणि नाफेड पूर्ण तयारीत असून केंद्र सरकारकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळून ही केंद्रे वेळेत सुरू होतील, असे आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांची फसवणूक करू नका – प्रकाश पोहरे :** शेतकरी अतिवृष्टी आणि



अस्मानी संकटाने आधीच हतबल झाला आहे. शासनाने त्यांच्या भावनांचा आदर करून त्वरित खरेदी केंद्रे सुरू करावीत, अन्यथा १० नोव्हेंबरला किसान ब्रिगेडकडून बेमुदत घेराव आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी दिला. त्यांनी शेतकऱ्यांना इशारा दिला की, कोणी आपले सातबारे व्यापाऱ्यांकडे गहाण ठेवण्याचा प्रयत्न केल्यास किसान ब्रिगेड त्यांच्यावर कठोर भूमिका घेईल.

# स्वखर्चाने बसविल्या विहिरींवर लोखंडी जाळ्या

## आलेगावचे सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांचा पुढाकार

■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

पातूर तालुक्यातील आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी पुन्हा एकदा समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. ग्रामपंचायत आलेगाव हद्दीतील माळीपुरा भागातील विहीर तसेच विटाची विहीर (काळपांडे सरांच्या घरासमोर) या दोन्ही विहिरींवर त्यांनी स्वखर्चाने लोखंडी सुरक्षा-जाळ्या बसविल्या आहेत.

गेल्या चार वर्षांपासून या विहिरींवर सुरक्षा व्यवस्थेची मागणी ग्रामस्थांकडून होत होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. अखेर निलेश कापकर यांनी



स्वतः पुढाकार घेत स्वतःच्या खर्चाने हे काम पूर्ण केले आणि ग्रामस्थांना सुरक्षिततेचा 'दिवाळीचा दीप' अर्पण केला.

या विहिरींत पूर्वी जनावरं पडण्याच्या घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आता लोखंडी जाळ्या बसवल्याने लहान मुलांसह सर्व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुटला आहे.

नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांचे या समाजहिताच्या कार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले आहेत. कापकर म्हणाले, 'मला 'काम बोलो काम' या तत्त्वावर विश्वास आहे. लोकांनी त्यांच्या समस्या सांगाव्यात, त्या मी प्रत्यक्ष कृतीतून सोडवून दाखवतो.' त्यांच्या या उपक्रमामुळे आलेगाव परिसरातील नागरिकांचा समाजसेवेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# जिवंत काडतूसांसह देशी रिव्हॉल्वर बाळगणाऱ्या आरोपीला न्यायालयाकडून जामीन

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

दिवाळीच्या दिवशी पोलिसांनी अकोल्यातील कुख्यात गुन्हेगार मिथुन उर्फ मॉन्टी सुधाकर इंगळे याला देशी कट्टा, जिवंत काडतूस, लोखंडी तलवार व कत्ता यांसह अटक केली होती. या प्रकरणी आता अकोला येथील कनिष्ठ न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीनुसार चिवचिव बाजार परिसरात छापा टाकला. या कारवाईदरम्यान आरोपीकडून एकूण ३१,३०० किमतीचा अवैध शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. आरोपीकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नव्हता. तसेच, गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने आरोपीने ही शस्त्रे जवळ बाळगल्याचा उल्लेख पोलिसांच्या एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

अटक झाल्यानंतर आरोपीला अकोला येथील न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांनी पोलिसांनी केलेल्या आरोपांवर प्रभावी युक्तिवाद मांडला. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सौ. पूनम जमाईवार यांच्या न्यायालयाने सादर केलेले मुद्दे ऐकून आरोपी मिथुन उर्फ मॉन्टी इंगळे याला जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड. सुमित महेश बजाज यांनी आरोपीच्या बाजूने प्रभावी युक्तिवाद केला, तर ॲड. वर्षा सदार, ॲड. अजय भारसाकळे आणि ॲड. श्रीरंग महाजन यांनी सहकार्य केले.

## गरजू कर्णबधिर चिमुकल्याला दिले श्रवणाचे 'सामर्थ्य'

**अकोला :** वंचित, गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळसणाचा आनंद पेरुन 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम सामर्थ्य फाउंडेशनच्यावतीने गेल्या तीन वर्षापासून निरंतर राबविण्यात येत आहे. एकविरा फाउंडेशनद्वारे संचालित बालविकास केंद्रातील चिमुकल्या विद्यार्थ्याला कर्णबधिर यंत्राचे उपकरण देऊन त्याचात श्रवणाचे 'सामर्थ्य' निर्माण केले.

# उपचारासाठी दाखल झालेल्या तरुणाने केली आत्महत्या

**अकोला :** शहरातील सिव्हिल लाइन पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या गजानन हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल झालेल्या एका युवकाने रुग्णालय परिसरातच आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. अमोल कावनपुरे (वय ३३ वर्ष) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव असून तो अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेल्या काही दिवसांपूर्वी पायाच्या उपचारासाठी मृतक अमोल कावनपुरे हा शहरातील गजानन हॉस्पिटल येथे दाखल झाला होता. गुरुवारी सकाळी रुग्णालयातील नर्स

**रुग्णालयात उडाली खळबळ**

दैनंदिन तपासासाठी अमोलच्या खोलीत गेली असता दार उघडण्यात आले नाही. नर्सला संशय आल्याने हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांना ही बाब सांगितली, त्यानुसार कर्मचाऱ्यांनी दरवाजा तोडला असता अमोल हा रूम मधील पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. यावेळी रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासले असता अमोलला मृत घोषित करण्यात आले. सदर घटनेची माहिती सिव्हिल लाइन पोलिसांना देण्यात आली असता पोलिसांनी सदर प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

## अखिल भारतीय वाल्मीकी महापंचायत तर्फे वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजांत आंबेडकर यांचा सत्कार



■ **प्रतिनिधी | अकोला** ■

बीड जिल्ह्यातील वाल्मीकी समाजातील युवक यश ढाका यांच्या परिवारावर अन्याय झाल्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजांत आंबेडकर यांनी त्या परिवाराची सात्वनभेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत न्याय मिळवून देण्यासाठी ठाम भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक यांना दिले आहेत.

वाल्मीकी समाजाच्या न्यायासाठी नेहमी अग्रभागी राहणारे सुजांत आंबेडकर हे आज अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता अखिल भारतीय वाल्मीकी महापंचायत तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय प्रवक्ता सचिन चावरे यांनी सुजांत आंबेडकर यांना भगवान वाल्मीकी महाराजांची प्रतिमा भेट देत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या प्रसंगी अरुंधती शिरसाठ, प्रमोद देंडवे, गजानन गवई, मनोहर वानखडे, किरण शिरसाट, ऋषिकेश सातव, गणेश ठाकरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमातून वंचित बहुजन आघाडी आणि वाल्मीकी समाज यांच्यातील ऐक्य व सामाजिक न्यायासाठीची लढाऊ भावना अधोरेखित झाली.

# बहिणींच्या हक्कासाठी अन्नत्याग आंदोलनाचा पाचवा दिवस

## शासनाकडून ठोस निर्णयाचा अभाव

■ **प्रतिनिधी | हिवरखेड** ■

लाडक्या बहिणींना न्याय मिळवून देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे रवी घुंगड यांनी हिवरखेड येथे सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन आज पाचव्या दिवशी पोहोचले असून, अद्यापही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विलास शूद्रे यांच्या जागेत, बुलडाणा अर्बन बँकेजवळील चंडिका चौक, हिवरखेड येथे सुरू असलेल्या या अन्नत्याग आंदोलनाला स्थानिक नागरिक आणि महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'लाडक्या बहिण'



योजनेतील थकलेले हप्ते आणि नव्या अर्जांच्या मंजुरीसाठी सुरू केलेल्या या आंदोलनाच्या ठिकाणी लाडक्या बहिणींची सतत रीघ लागलेली दिसत आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आंदोलनस्थळी महिलांचे केवायसी नोंदणीचे काम सुरू असून, ज्या लाभार्थिनींचे हप्ते थांबले आहेत त्यांनी आपले आधार कार्ड, राशन कार्ड आणि बँक पासबुक घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आंदोलनस्थळी तहसीलदार समाधान सोनवणे आणि महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी पुसदकर साहेब यांनी भेट देऊन आंदोलकांची विचारपूस केली. त्यांनी थकलेले हप्ते पुन्हा सुरू करण्यासाठी माहिती गोळा करण्याचे आश्वासन दिले असून, इतर मागण्या राज्य शासनस्तरावरील असल्याने त्या संदर्भात वरिष्ठांना अहवाल पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

**आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या :**

- लाडक्या बहिण योजनेचे थकलेले हप्ते तात्काळ सुरू करावेत.
- या योजनेअंतर्गत नव्या अर्जांची नोंदणी पुन्हा सुरू करावी.
- शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार प्रत्येक लाडक्या बहिणीस दरमहा २१०० अनुदान द्यावे.
- शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करून तातडीने अंमलबजावणी करावी.

शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाने दिला आहे.

## जिल्ह्यातील पहिली महीला लोगो पायलट योगीता गाढे हिचा सत्कार

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

तालुक्यातील शिवर या छोट्याशा पण तेजस्वी गावाने इतिहास रचला आहे. गावातील कन्या कु. योगीता श्रीकांत गाढे हिने अतिशय कमी वयात मेट्रो ट्रेनची लोगो पायलट बनून गावाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री दुर्गादेवी संस्थान शिवर, श्री हनुमान संस्थान शिवर तथा श्री दत्तात्रय अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने तिचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज मुरुमकार, ह.भ.प. बळीराम महाराज दोड व श्री दत्तात्रय अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष श्री जगदीश मुरुमकार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते योगीताचा सत्कार करताना त्यांनी तिच्या अथक परिश्रमांचे, चिकाटीचे आणि जिद्दीचे मनापासून कौतुक केले. यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, 'योगीताने कठोर मेहनत आणि स्वविश्वासाच्या जोरावर जे यश मिळवले आहे.

# पोलीस पाटलांचे मानधन रखडल्याने दिवाळी अंधारात!

## कुटुंबावर उपासमारीची वेळ; प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप

■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

राज्यातील पोलीस पाटलांच्या मानधनासाठी शासनाने दिवाळीपूर्वीच निधी उपलब्ध करून दिला असतानाही अकोला जिल्ह्यातील अनेक पोलीस पाटलांना अद्याप मानधन मिळालेले नाही. ग्रामपातळीवर कायदा आणि सुव्यवस्था राखणारे तसेच शासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करणाऱ्या या पाटलांना सणासुदीतही मानधन न मिळाल्याने त्यांच्या घरची दिवाळी अंधारात गेली आहे.




अलीकडेच शासनाने पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ जाहीर करून त्यांना दिलासा दिला होता. मात्र, संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हा निधी वेळेत वितरित करण्यात अपयश आले आहे. या मानधनावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या अनेक पाटलांची आर्थिक स्थिती ढासळली असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे पोलीस पाटलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

शासनाने निधी वेळेवर दिला असला तरी प्रशासनिक निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच आता पोलीस पाटलांनाही दिवाळीत आर्थिक अंधाराचा सामना करावा लागत आहे. संघटनेकडून शासनाकडे तातडीने मानधन वितरणाची मागणी करण्यात आली असून, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

'जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या मानधनाकरिता शासनाने ग्रँट उपलब्ध करून दिली आहे. तरीही जर संबंधित विभागातील कर्मचारी शासनाच्या धोरणाला केराची टोपली दाखवत मानधन थांबवत असतील, तर जिल्हा संघटनेतर्फे त्या विभागाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन उभारण्यात येईल. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांची राहील.'

**राजेंद्र चेनेकर,** जिल्हाध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटना (अकोला जिल्हा).

.................

'दिवाळीपूर्वी दहा-पंधरा दिवसांपूर्वीच शासनस्तरावरून मानधनाकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे पोलीस पाटलांची दिवाळी अंधारात गेली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.'

**संतोष बोर्डे पाटील,**
प्रसिद्ध प्रमुख, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटना.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अतिवृष्टीने खरडून नेली सुपीक माती; 'मनरेगा' ठरणार शेतकऱ्यांसाठी जीवनदायी

**नापीक जमिनी पुन्हा शेतीयोग्य करण्यासाठी राज्य शासनाचा उपक्रम; हेक्टरमागे मिळणार तीन लाख रुपयांची मदत**

**वर्धा/जनमाध्यम**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. काही तालुक्यांमध्ये अतिवृष्टी आणि पूरस्थितीने पिकांसह सुपीक माती वाहून नेल्याने अनेक शेतजमिनी नापीक अवस्थेत गेल्या आहेत. अशावेळी राज्य शासनाने 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) अंतर्गत नष्ट झालेल्या शेतीजमिनींच्या पुनरुज्जीवनासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे.



ही योजना शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरणार असून, उत्पादनक्षम माती पुन्हा तयार करण्यास सरकार थेट हातभार लावणार आहे.कृषी व ग्रामीण विकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली जमिनींच्या दुरुस्तीसाठी समतल चर खोदणे, बांधकामे उभारणे, माती भरणे आणि चर व नाली निर्मिती अशी कामे हाती घेतली जाणार आहेत. ही सर्व कामे ग्रामपंचायतीमार्फत राबवली जातील. मनरेगांतर्गत या उपक्रमासाठी मजुरी आणि सामग्रीचा खर्च अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात राहणार असून, त्यामुळे स्थानिक मजुरांनाही रोजगाराच्या संधी निर्माण होतील.लहान व सीमांत शेतकऱ्यांना या योजनेत प्राधान्य देण्यात आले आहे.

एका हेक्टर जमिनीच्या दुरुस्तीसाठी कमाल तीन लाख रुपये, तर एका शेतकऱ्यासाठी दोन हेक्टरपर्यंत पाच लाख रुपयांपर्यंत मदत मिळू शकते. तसेच अतिवृष्टीमुळे तुटलेल्या किंवा गाळाने भरलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठीही सरकारकडून स्वतंत्र सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.वर्धा जिल्ह्यातील एकूण १ लाख ६७ हजार हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले असून, सुमारे १०.९० हेक्टर शेतीचे सुपीक आवरण वाहून गेल्याची आकडेवारी प्रशासनाने दिली आहे.

या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे 'मनरेगा जॉबकार्ड' असणे आवश्यक आहे. तसेच पंचनामा झालेली आणि सातबारा उताऱ्यावर नोंद असणारी जमीन असणे बंधनकारक आहे.

जॉबकार्ड नसलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित ग्रामपंचायतीशी संपर्क साधून नवे जॉबकार्ड तयार करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे अतिवृष्टीत उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळेल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

## रानडुकरांचा धुमाकूळ; उमरीतील दीड एकर कपाशीचे पीक उद्ध्वस्त

**आर्वी/जनमाध्यम**

अतिवृष्टी, रोगराई आणि बाजारभावातील अनिश्चिततेने त्रस्त शेतकऱ्यांवर आता रानडुकरांच्या हल्ल्याचे नवे संकट कोसळले आहे. आर्वी तालुक्यातील उमरी गावात या जंगली प्राण्यांनी दीड एकर कपाशीचे पीक उध्वस्त केले असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

गोविंद विश्राम उईके यांच्या शेतात सकाळच्या सुमारास रानडुकरांचा कळप शिरला. त्यांनी कपाशीचा बहरात आलेला भाग पूर्णपणे आडवा केला. याआधीच सोयाबीन पीक हानीग्रस्त झाले होते, त्यात आता कपाशीचा नाश झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

परिसरात गेल्या काही दिवसांपासून रानडुकरांचा प्रचंड त्रास सुरू आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळेस धोका निर्माण होत आहे. ग्रामीण भागात या जंगली श्वापदांचा बंदोबस्त करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## पिपरी जिल्हा परिषद सर्कलमध्ये भाजप उमेदवारीसाठी संभ्रम

**पक्ष कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज**



**पिपरी/दिलीप पिंपळे**

जिल्हा परिषद सर्कलमध्ये आगामी सरकारी निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाची उमेदवारी कोणाला देणार यावर कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि गोंधळ सुरू आहे. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेतील ५२ मतदारसंघांची आरक्षणे घोषित करण्यात आल्या असून, पिपरी सर्कलचे आरक्षण सर्वसाधारण असल्याने भाजप मध्ये उमेदवार निवडीवर मोठा वाद चालू असल्याचे संकेत आहेत.

भाजपकडून माजी जिल्हा परिषद सदस्य शाम गायकवाड यांच्या निधनानंतर २०१२ मध्ये अविनाश देव यांना प्रतिनिधित्व मिळाले होते.२०१७मध्ये ओबीसी आरक्षण असल्याने प्रशांत इंगळे यांना उमेदवारी मिळाली, पण ते निवडून येऊ शकले नाहीत. सध्याच्या निवडणुकीत अविनाश देव यांच्या नावावर जोरदार चर्चा असून, त्यांना अनेक कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा आणि पाठिंबा मिळत आहे. परंतु या यादीत फारूक शेख यांचा जीवाचा प्रश्न उभा आहे. अल्पसंख्यांक व जन सामान्य यांच्या भक्कम पाठिंब्याचा दावा करणाऱ्या फारूक शेखांना भाजपात २५ वर्षांचे योगदान असूनही तर पंचायत समिती सदस्य पदावरच संधी मिळाली आहे. यावेळी त्यांना उमेदवारी मिळेल की नाही याबाबत गडबड आणि संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये आहे. याशिवाय पप्पू मोरे, अजय गौळकर व कुमुदिनी लाजूरकर या पक्षातील दावेदारांनीही उमेदवारीसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपच्या अंतर्गत गटबाजीमुळे तसेच मोठ्या नेत्यांसह हितसंबंधांच्या जोरावर उमेदवार निवडीसाठी संघर्षाला तोंड देण्यात येत आहे. भाजपचे कार्यकर्ते विचारत आहेत की, पक्षातील निष्ठावंत आणि सामान्य कार्यकर्त्यांना खरंच उमेदवारीची संधी मिळणार की नविन, गटाध्या उमेदवार आणि नेतृत्त्वांच्या जवळजवळच्या व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल. आत्तापर्यंत अधिकृत उमेदवारा बाबत कोणतीही घोषणा झालेली नाही. मात्र, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकांमध्ये या सर्व प्रश्नांवर चर्चा होत असून, लवकरच यावर अंतिम निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे. पिपरी लोकांसाठी या उमेदवारीचा निकाल राजकीय भविष्य आणि स्थैर्यावर प्रभाव टाकणारा ठरणार आहे. त्यामुळे भाजपच्या निर्णयाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## गांधींच्या विचारांवर चाललंच तरच देश बदलेल

**केरळचे महमूद ए.सी. सेवाग्रामला भेट देऊन घेतला गांधी मार्गाचा वेध**

**सेवाग्राम/जनमाध्यम**

महात्मा गांधींच्या विचारांची आजही देशाला नितांत गरज आहे. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष उलटली असली तरीही देशातील अनेक भागांना अजूनही मूलभूत सुविधांची कमतरता भासत आहे, असे मत केरळ राज्यातील पन्नूर येथील निवृत्त अधिकारी महमूद ए. सी. यांनी सेवाग्राम आश्रम भेटीनंतर व्यक्त केले.महमूद गेल्या काही दिवसांपासून देशभर पदयात्रा करत आहेत. ७ ऑक्टोबर पासून त्यांनी केरळच्या पन्नूर येथून प्रवासास सुरुवात केली. गांधीजींनी या ठिकाणी कधी काळी भेट दिली होती. या यात्रेत त्यांनी केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल, भूतान, बांगलादेश सीमेचा भाग,नेपाळ, बिहार, मध्य प्रदेश, नागपूर आणि अखेरीस सेवाग्राम अशा अनेक ठिकाणी भेट दिली.गांधीजींच्या समकालीन नेत्यांसह त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. पण आपण त्यांच्या तत्त्वांना विसरत चाललो आहोत. स्वार्थीपणाला खतपाणी घालण्यात आले आणि सत्तेचा केंद्रबिंदू काहींच्याच हातात गेला, अशी टीका महमूद यांनी केली.त्यांनी नेपाळचा उल्लेख करत सांगितले की, तेथील लोक श्रीमंत नाहीत, पण समाधानी आहेत. आपल्या देशात मात्र संपत्ती आहे, समाधान नाही. त्यांनी पुढे सांगितले की, विकासाच्या बाबतीत केरळ, तामिळनाडू, कर्नाटक आणि पंजाब हे राज्ये आघाडीवर आहेत, परंतु अजूनही गरिबीचा प्रश्न शिल्लक आहे.

शिक्षण, आरोग्य, शेती, पर्यावरण आणि स्वावलंबन या क्षेत्रांवर अधिक भर दिला पाहिजे. गांधीजींच्या आदर्शावर चाललंच तरच समाजात खरा बदल घडू शकेल, असे महमूद यांनी ठामपणे सांगितले.

## दिवाळी ओसरताच बाजारपेठेत शांतता; व्यापारी घेत आहेत विश्रांती

**वर्धा/जनमाध्यम**

दिवाळीनिमित्त गेल्या पंधरा दिवसांपासून शहरातील बाजारपेठेत उसळलेली गजबज आता ओसरली आहे. लक्ष्मीपूजन पार पडताच खरेदीची लगबग मंदावली असून आज बाजारात शुकशुकाट जाणवतो आहे. सणासुदीच्या खरेदीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. कपडे, मिठाई, फटाके आणि सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठेचा रंगतदार देखावा साधला होता. या गर्दीत वाहतुकीची कोंडी, पार्किंगची समस्या आणि व्यापारी वर्गाची धावपळ सुरू होती.मात्र, आता सण संपल्याने व्यापारात काहीसा ब्रेक लागला आहे. अनेक दुकानदारांनी दिवसरात्र मेहनत घेतल्यामुळे विश्रांतीचा मोड सुरू केला आहे. काही दुकानांवर 'आज सुट्टी'च्या पाट्या झळकताना दिसत आहेत, तर काही व्यापारी मनसोक्त श्वास घेत बसलेले आहेत. खरेदीच्या ओघात नाहिशा झालेल्या शांततेने आज शहरात काहीसा निवांतपणा आणला आहे.दरम्यान, येत्या लग्नत्सव आणि थंडीच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांनी नव्या वस्तूंच्या ऑर्डर सुरू केल्या आहेत. अल्प विश्रांतीनंतर पुन्हा व्यापारी हालचाली वाढतील आणि बाजारपेठेतील गजबज पुन्हा परतेल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांतून व्यक्त होत आहे.

## दिवाळीच्या शुभसंध्येला विद्यार्थ्यांच्या कलागुणांची झळाळी

**सर्जनशीलतेने सजली शाळा; विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मान्यवरांची दाद**

**देवळी/जनमाध्यम**

प्रकाशाचा आणि आनंदाचा उत्सव असलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर येसगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत दिवाळी तुम्हा आम्हा सर्वांची आनंदाची या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची ओळख करून दिली.



रांगोळ्या, ग्रीटिंग कार्ड्स, आकर्षक सजावट आणि विविध कलाकृतींनी संपूर्ण शाळा झळाळून गेली.शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री बोडखे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींचा माहितीपट सादर केला. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सोनाली तालन अध्यक्षस्थान भूषवून उपस्थित राहिल्या होत्या. भैय्यासाहेब बोडखे सरांनी विद्यार्थ्यांना शिस्त, परिश्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले, तर रमेश तेलरांधे सरांनी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रेरणादायी विचार मांडून कलामसारखे स्वप्न पाहा आणि ते साकार करण्यासाठी मेहनत घ्या, असे आवाहन केले.कार्यक्रमाला अजय कदम, हरीष चिंचघाटे यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. भैय्यासाहेब बोडखे यांनी शाळेसाठी घड्याळ व चटई भेट दिली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रमाला रंगत आणली.शेवटी विद्यार्थ्यांनीच कौशल्यपूर्ण पद्धतीने आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. दिवाळीच्या या आनंदसोहळ्यात विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा सहभाग यामुळे शाळेचे वातावरण आनंद आणि प्रेरणेने उजळून गेले.

## किन्हाळा गावचा हाल: अंत्ययात्रेलाही खड्डेमय रस्त्याचा त्रास

**समुद्रपूर/जनमाध्यम**

समुद्रपूर तालुक्यातील किन्हाळा गावाजवळील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अतिवृष्टीमुळे खचून



गेला असून, गावकऱ्यांना अंत्ययात्राही दुर्दशाग्रस्त रस्त्यातून न्यावी लागत आहे. शासनाने तत्काळ दुरुस्ती करून मार्ग सुरळीत करावा, अशी संतप्त मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक कै. यशवंतराव मारोतराव कामडी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमीकडे जाण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र रस्ता पुरात वाहून गेल्याने वाहने तर सोडाच, पायदळ जाण्यालाही अडचण निर्माण झाली. अखेर अंत्ययात्रेला शेताच्या पायवाटेने मार्ग काढावा लागला.ग्रामस्थ संतापाने म्हणाले, रस्त्याची अवस्था एवढी बिकट झाली आहे की, दैनंदिन वाहतुकीलाही धोका निर्माण झाला आहे. तरीसुद्धा प्रशासनाकडून दुरुस्तीच्या बाबतीत कोणतीही हालचाल दिसत नाही. गावकऱ्यांनी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग पुन्हा मोकळा करावा, अशी मागणी केली आहे.

## डिजिटल सुरक्षेचा धडा: हिंदी विद्यापीठात सायबर जनजागृती

**पोलीस सायबर विभागाचे मार्गदर्शन; विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षेचा मंत्र**

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय (MGAHV), वर्धा येथे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात पोलिस सायबर विभागाचे अंमलदार अंकित जिभे आणि स्मिता महाजन यांनी डिजिटल जगात वाढत चाललेल्या फसवणुकीच्या प्रकारांवर आणि त्यापासून सुरक्षित



राहण्यासाठी आवश्यक खबरदारीवर सविस्तर मार्गदर्शन केले. अंकित जिभे यांनी ओटीपी (OTP) फसवणूक, क्यूआर कोड स्कॅनिंग, फिशिंग लिंक्स, जॉब स्कॅम आणि सोशल मीडियावरील बनावट प्रोफाइल फसवणुकीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तर स्मिता महाजन यांनी मोबाइल आणि इंटरनेट वापरात सुरक्षिततेची जाणीव ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अनोळखी लिंक्सवर क्लिक करू नये, कोणालाही आपले बँक तपशील किंवा ओटीपी सांगू नये, मजबूत पासवर्ड वापरावे आणि टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा अवलंब करावा, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.सायबर फसवणूक झाल्यास त्वरित '१९३०'या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा किंवा सायबर पोर्टल (cybercrime.gov.in) वर तक्रार नोंदवावी, असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या समारोपावेळी विद्यापीठाचे येथे प्रमुख व्यक्तीचे पद आणि नाव लिहा.यांनी पोलिस विभागाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, आजच्या डिजिटल युगात सायबर साक्षरता ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी जागरूक राहून सुरक्षित डिजिटल नागरिकत्व जोपासावे. या उपक्रमामुळे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांना ऑनलाइन व्यवहार आणि सोशल मीडियावरील सुरक्षिततेचे भान देणारा प्रभावी संदेश मिळाला.

## संक्षिप्त

### वर्धेत गळफास लावून तरुणाची आत्महत्या

**वर्धा -** मनोधैर्य खचलेल्या तरुणाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना पुलफैल परिसरात घडली. विजय ब्रिजलाल यादव (३५) असे मृताचे नाव आहे. यादव हे दुग्ध व्यवसाय करीत होते. शिवाय त्यांना दारूचे व्यसन जडले होते. अशातच दोन वर्षापूर्वी त्यांची पत्नी त्यांना सोडून माहेरी गेली. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते विवंचनेत होते. अशातच गळफास घेत यादव यांनी आत्महत्या केल्याची चर्चा घटनास्थळी होती. या प्रकरणी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**वर्धा-** वन्यजीवांपासून पिकांच्या संरक्षणासाठी शेताला लावलेल्या तारेच्या कुंपनात वीज प्रवाह प्रवाहित करण्यात आला. याच प्रवाहित विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना नजीकच्या मलकापूर येथे घडली. नरेश मारोतराव शिंगोडे (६०, रा. मलकापूर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मलकापूर येथील नरेश यांनी गावाच्या परिसरात ७ एकर जमीन भाड्याने घेतली. ज्यावर तूर व सोयाबीन या पिकांची त्यांनी लागवड केली. पण वन्यप्राण्यांकडून उभ्या पिकांची नासाडी केली जात असल्याने पिकाच्या संरक्षणार्थ शेताला तारेचे कुंपन करीत त्यात वीज प्रवाह प्रवाहित करण्यात आला.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी शेतकरी नरेश है हे शेतात गेले असता करंट सुरू होता. ते वीज प्रवाह बंद करीत असताना त्यांना वीज प्रवाहाचा जबर झटका बसला. ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. प्रकरणी पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### स्वस्थ नारी सशक्त परिवारला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विजयगोपाल-** तालुक्यातील आयुष्यमान आरोग्य मंदिर विजयगोपाल अंतर्गत येत असलेल्या कांदेगाव उपकेंद्रात बुधवारी (ता. २४) स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान उपकेंद्र कांदेगाव येथे राबविण्यात आले. या अभियानाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानाचे उद्घाटन सरपंच प्रदीप हेंडवे यांच्या हस्ते करण्यात आले. अभियानामध्ये उपकेंद्र कांदेगाव येथे १५६ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. अभियानामध्ये रक्तदाब, मधुमेह, इसीजी, रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या.

शिबिरामध्ये स्तन कॅन्सर व इतर राष्ट्रीय कार्यक्रमाविषयी जनजागरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन नीलेश गायकवाड तर प्रास्ताविक कल्याणी जाधव यांनी केले. आरोग्य विभागाअंतर्गत घेण्यात आलेल्या शिबिराचे सरपंच प्रदीप हेडवे यांनी कौतुक केले. कार्यक्रमाकरिता पोलिस पाटील संजय पचारे, उपसरपंच रूपेश वाघ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. आभार श्री. वानरे यांनी मानले.

### दिवाळीचा उत्साह ओसरताच शहरात फटाक्यांचा कचरा उघड

**वर्धा-** दिवाळीच्या आनंदात मंगळवारी संपूर्ण शहर उजळून निघाले, मात्र दुसऱ्याच दिवशी सकाळी शहरभर फटाक्यांचा कचरा पसरलेला दिसला. लक्ष्मीपूजनानंतर रस्त्यांवर, गल्लीबोळात, वॉर्डागणिक आतषबाजीचा माळा फोडला गेला. परिणामी, बुधवारी सकाळी रस्त्यांवर फोडल्याचे अवशेष, कागद, कवचांचा ढिगारा दिसून आला. नगरपरिषदेवर सध्या प्रशासक राज असल्याने सफाई यंत्रणा सुट्टीच्या मूडमध्ये असून, अनेक भागांतील कचरा संध्याकाळपर्यंत जैसेच्या तसा पडून राहिला. सणानंतर निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे शहराचे सौंदर्य मलिन झाले असून वातावरण धूरमय झाले आहे. रहिवाशांनी तातडीने सफाई मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे.

### खापरी ढोणे येथे तरुणाकडून चाकू फिरवत दहशत

**वर्धा-** खापरी (ढोणे) गावात एका तरुणाने हातात चाकू घेऊन गावात दहशत माजवल्याची घटना बुधवारी (दि. २२ ऑक्टोबर) घडली. पोलिसांनी तत्काळ धाव घेऊन त्या तरुणाला ताब्यात घेत चाकू जप्त केला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.दहेगाव गोसावी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, साहील सुरेश तुमठाम (वय २२, रा. खापरी ढोणे, ता. सेलू) हा हातात लोखंडी सतुर घेऊन गावातील नागरिकांना शिवीगाळ करून धमकावत होता. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पो.हवा. मंद्रकिशोर द्रवे यांच्या पथकाने मौजेस खापरी ढोणे येथे धाड टाकली.गावातील पंच विजय वाणी आणि गणेश उईके यांच्या उपस्थितीत आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून लोखंडी सतुर किंमत ३०० रुपये असा जप्त करण्यात आला. या कार्यवाहीचे छायाचित्रण आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग पोलीस कर्मचारी शैलेश टेकाम यांनी केले. आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस सुरु आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# राज्य अजिंक्यपद स्पर्धेकरिता अमरावती जिल्हा संघाची निवड



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र टेबल टेनिस संघटनेच्या आयोजना खाली दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या ८७ राज्य अजिंक्यपद ५४ व्या आंतर जिल्हा टेबल टेनिस स्पर्धा बालेवाडी पुणे येथे .राजू बोडस , माळवे जनरल सेक्रेटरी यतीन टिपणीस, सेक्रेटरी आशुतोष पोतनीस यांच्या मार्गदर्शन व आयोजना खाली संपन्न होत आहे. सदर स्पर्धेत कमीत कमी १००० खेळाडू भाग घेणार आहे.

या स्पर्धे करिता राज्य संघटनेचे निर्देशानुसार जिल्हा संघाचे अध्यक्ष प्रदीप काळेले, बकुल कक्कड, शरद कासट व आंतर राष्ट्रीय पंच एच ए खान यांच्या मार्ग दर्शनाखाली जिल्हा मानांकित स्पर्धा घेऊन जिल्हा संघाची निवड करण्यात आली व निवड करण्यात आलेला संघ पुणे येथे होणाऱ्या राज्य अजिंक्य पद स्पर्धेत जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

निवड झालेले व प्रतिनिधित्व करणारा संघ ११वर्ष वयोगट श्रेयांश जगताप, आदित्य आंडे, ध्रुव इंगोले, १३ वर्ष वयोगट, ऋषीत दाभाडे, अर्णव डोंगरे, मयंक कुमरे, १५ वर्ष वयोगट हानिश बोहरा, सार्थक पुरेकर, स्कंद बढे, फुझेल खालिद, १७ वर्ष वयोगट हानिश बोहरा, सार्थक पुरेकर, मयंक कुमरे, आराध्य झाडे, पुरुष संघ, अथर्व वायंगणकर यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या संघाला अमरावती चे आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके व क्रीडा क्षेत्रात मोलाचे कामगिरी करून खेळाडूंचे मनोबल वाढणारे यश खोडके यांनी आशीर्वाद दिले. उपसंचालक क्रीडा व युवक सेवा गणेश जाधव, प्रदीप काळेले ,बकुल कक्कड,शरद कासट यांच्या मार्ग दर्शनाखाली संघ दिनांक २३ ऑक्टोबर २५ रोजी अमरावती पुणे ट्रेन ने पुणे येथे रवाना होत आहे. जिल्हा संघ पुणे येथे आंतर राष्ट्रीय पंच एच ए खान यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा खेळणार आहे तसेच गजानन आँडे संघासोबत जात आहे. निवड झालेले संघ व अमरावती येथे सराव करणारे सर्व खेळाडू ~घ् ए प्रशिक्षक शहजाद खान, रमेश परदेशी ,राजू फ्रान्सिस,संजय सस्तकर यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशुद्ध सराव करतात. अमरावती संघ नेहमी स्पर्धेत आपले कौशल्य दाखवून वाह वाही लुटत असते.शालेय राज्य खुल्या विदर्भ व राज्य अजिंक्य पद स्पर्धा असो अमरावतीचे खेळाडू उत्कृष्ट प्रदर्शन करतात. अजिंक्यपद स्पर्धेकरिता सर्व पालक, प्रशिक्षक, सर्व शुभ चिंतक यांनी शुभेच्छा देवून आशीर्वाद दिले.

# धेंडाई काढण्याची प्रथा ४०० वर्षापासून मोर्शीकरांनी ठेवली जपून !

**मोर्शी/प्रतिनिधीः-** दिवाळीच्या रात्री धेंडाई काढण्याची प्रथा ४०० वर्षांपासून मोर्शी शहरात जपली जात आहे.येथे धेंडाईची वेगवेगळी चार मंडळे असून त्यात काही वंशपरंपरेने चालत आलेली आहेत.धेंडाई हा एक आगळावेगळा व पारंपरिक प्रकार मोर्शी शहरात पहायला मिळतो.

जिल्ह्यातील सावंगा येथून धेंडाई काढण्यास सुरूवात झाली असे ग्रामस्थ सांगतात.

राज्यात अवधुती पंथ,वैष्णवीपंथ आणि महानुभाव पंथ असे तीन पंच प्रामुख्याने मानले जातात.त्यापैकी अवधुती पंथाने धेंडाईची सुरूवात केली.

धेंडाई ही संपूर्ण लाकडापासून पालखीसारखी बनविलेली असते.दोन माणसांना उचलता येईल अशी समोर आणि मागच्या बाजूला काठ्यांची व्यवस्था केली असते.धेंडाईमध्ये एकूण ८५ दिवे लावले जातात.दिव्यांची संख्या पुरातन काळातील चौसर या खेळावरून घेण्यात आली आहे.चौरसमध्ये ८४ घरे असतात म्हणजेच एक भागामध्ये २१ घरे असतात.याच आधारावर धेंडाईच्या एका भागामध्ये २१ दिवे असतात,चार भाग मिळून ८४ आणि एक दिवा धेंडाईच्या मधात अशा एकूण ८५ पणात्या लावण्यात येतात. धेंडाईच्या वरच्या टोकावर गवताचा प्रकार असलेल्या लईपासून बनविलेली रई व त्या रईमध्ये भाताचा दिवा लावलेला असतो. अंधार,अज्ञान व गरिबीवर मात करण्याच्या उद्देशाने ही धेंडाई रात्री घरोघरी फिरविली जाते.



यावेळी घराघरातील महिला या धेंडाईची पुजा करतात नंतर आरती होऊन ती धेंडाई समोर निघून जाते. झेंडू तयाचे चित्तरंगास्त वत्सव दिनया राजाचे,कुपची काठी कुपची जळ गाई म्हशीन वाडे भरले,गायी म्हशीने भरले वाडे,विघ्न नामाने उडाले' या सारख्या अनेक ओव्या गायिल्या जातात.

दुसऱ्या दिवशी धेंडाईची सांगता होते.अधिक मासात महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात येतो.पाहिली धेंडाई सुलतानपुऱ्यातील बजरंगबली संस्थान येथून दुसरी माळीपुऱ्याच्या रामजीबाबा संस्थान येथून,तिसरी दिव्यज्योती धेंडाई मंडळ आणि चौथी धेंडाई महादेवराव गहुकार यांच्या घरून निघते.ही परंपरा मोर्शी वासियांनी मोठ्या आनंदाने जपली आहे.सावंगा येथून आलेल्या ही धेंडाई गावागावात पोहचली आहे. शिरजगाव,अंबाडा,नेरपिंगळाई, ब्राह्मणवाडा,हिवरखेड या गावातून धेंडाई निघत होती.

मोर्शीकरांनी मात्र ही प्रथा आजही जोपासून ठेवली.या धेंडाईसोबत श्रीकांत कांडलकर,मोहन घाटोळ,अरुण मडघे,संजय काळे, उमेश मिसळे, प्रवीण खेरडे,राजाभाऊ मगरदे, वसंतराव मनगटे, वामनराव रडके,उमेश मनगटे, किशोर बनसोड, सुरेश दरवाई,किशोर लेकुरवाळे, शेषरावजी मेंढे,अनुराग मिसळे, परीक्षित धर्माधिकारी, सर्वज्ञ मनगटे,पार्थ मनगटे,लावण्य पाचघरे, कुंदन काळे,किशोर बहादुरकर,श्रीकांत भोजने,गणेश कुबडे, प्रभाकर मनगटे,प्रकाश कांडलकर हे चारही मंडळाचे सदस्य व कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

# ज्वारीची पुरणपोळी कशी बनवायची ?

## -स्वस्त धान्य दुकानांत गोरगरीब ग्राहकांची ओरड

### -नाइलाजास्तव घ्यावी लागतेय ज्वारी



**पथ्रोट :** मागील वर्षी निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन मोठा गाजावाजा करीत गोरगरिबांची दिवाळी गोड व्हावी म्हणून आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला होता. परंतु, यावर्षी ना आनंदाचा शिधा वाटप ना गव्हाचा वाटप होत आहे. दिवाळी सारख्या सणाला गरीबांच्या थैली मध्ये स्वस्त धान्य दुकानातून ज्वारी वाटप होत असल्याने साहेब, मायबाप सरकार ज्वारीची पुरणपोळी, करंजी कशी बनवायची, असा सवाल ग्राहक करीत आहेत.


सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र शिधापत्रिका धारकांना देण्यात येणारा 'आनंदाचा शिधा' यावर्षी मात्र मिळणार नाही. गौरी-गणपती आणि दीपावलीच्या सणासाठी गेल्या पाच वर्षांपासून शंभर रुपयांत आनंदाचा शिधा देण्यात येत होता. यामध्ये शंभर रुपयांत चणा डाळ, रवा, साखर, खाद्यतेल प्रत्येकी एक किलोचा समावेश होता. परंतु, यावर्षी दिवाळीला कोणताही आनंदाचा शिधा वाटप तर झाला नाही, उलट रेशन कार्डवर कुटुंबातील एक व्यक्तीप्रमाणे एक किलो ज्वारी, चार किलो तांदूळ, तसेच अंत्योदय कार्डधारकांना १५ किलो ज्वारी, १० किलो तांदूळ मिळत आहे. जर या ज्वारीच्या बदल्यात दिवाळीच्या महिन्यात गव्हाचे वाटप केले असते, तर गरिबांना हक्काची पुरणपोळी मिळाली असती. परंतु, शासनाने दिवाळी सारख्या सणाला ज्वारीचे वाटप केल्याने दिवाळीत भाकरीची पुरणपोळी करावी का, असा प्रश्न देखील विचारला जात आहे.


# राज्यस्तरीय ज्युनिअर टेनिकोईट स्पर्धकरिता अमरावती संघ रवाना

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र टेनिकोईट असोसिएशन व रत्नागिरी टेनिकोईट असोसिएशन द्वारा आयोजीत क्रीडा संकुल डेरवण जिल्हा रत्नागिरी येथे दिनांक २६ ते २८ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या स्पर्धा करिता अमरावती जिल्हा संघ रवाना झाला आहे. जिल्हा संघात मुले वेदांत काळे , आदित्य शेटे, रोहन सुरपाटणे, सैफान खान , अंश बेनी, नमन तेलंग व मुली संघ प्रीतु कुशवाह, दिपाली शिलगरे, वैदेही ठाकूर, श्रावणी भुताड, तनुशी वनवे, ईश्वरी महाजन, प्रशिक्षक मनीष किरसान व व्यवस्थापक नितीन पोटे यांचा समावेश आहे. सर्व मुले श्री साईबाबा क्रीडा मैदानावर नियमित सराव करतात. अमरावती जिल्हा टेनिकोईट संघटनेचे अध्यक्ष तुषार भारतीय , उपाध्यक्ष डॉ राजेश बरडे, सचिव नितीन पोटे सहसचिव मनीष किरसान व वरिष्ट खेळाडू यांनी शुभेच्छा दिल्या.

# सोयाबीन कपाशी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची लूट कधी थांबणार

## सोने सव्वा लाखावर, कापूस मात्र सात हजारांच्या आतच !





**अमरावती/प्रतिनिधीः-** कृषिप्रधान देश असला, तरी शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही ही शेतकऱ्यांची कायमची खंत आहे. सोयाबीन पिकाला २००० या वर्षात ७५० रुपये, तर कापसाला ४ हजार रुपये होता. त्याचवेळी सोन्याचा दर साडेचार ते पाच हजार रूपयांदरम्यान होता. आज २५ वर्षांनंतरही म्हणजे २०२५ मध्ये सोन्याचे भाव प्रति तोळा तब्बल १ लाख ३० हजारांवर पोहोचले असताना, सोयाबीन व कापसाचे भाव नगण्यच राहिले. उत्पादन खर्च वाढला पण भाववाढ झाली नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे. शासनाने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा व्यापारी किमान कमी दर देत असल्याने शासनाच्या आदेशाला व्यापारी हरताळ फासत असल्याचा आरोप बळीराजा करीत आहे. त्यामुळे सोयाबीन कपाशी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची लूट कधी थांबणार, असा सवाल उपस्थित होत आहे. बाजारात सर्व वस्तूंचे भाव वाढत असताना शेतीमालाच्या भावात एवढी तफावत का, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. मागील २५ वर्षांत कोणत्याही सरकारने या विषयावर ठोस निर्णय घेतला नाही. काही शेतकऱ्यांच्या शेतीत पाण्याचा निचरा झाला असल्याने किमान खर्च वसूल व्हावा, या अपेक्षेने शेतकरी पीक काढण्याच्या तयारीत होते; मात्र चार दिवसांपूर्वी पुन्हा झालेल्या पावसामुळे आता कर्जफेड कशी करावी आणि दिवाळी साजरी कशी करावी, याची चिंता त्यांना भेडसावत आहे. शासकीय खरेदी केंद्रांवर होत असलेली गर्दी आणि गैरसोयींमुळे शेतकरी अनेकदा कमी भावात माल विकून टाकतात. त्यामुळे व्यापारी शासनाने ठरविलेल्या दरापेक्षा कमी दरात सोयाबीन खरेदी करून सरकारच्या निर्णयास हरताळ फासत आहे, असे शेतक-यांचे म्हणने आहे.

# कॅन्सरच्या रुग्णाचा जबडा काढून त्वचेची सर्जरी

**अमरावती /प्रतिनिधीः-** संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे मायक्रोव्हस्कुलर (फ्री फ्लॅप) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. यामध्ये कॅन्सरच्या रूग्णाचा पूर्ण जबडा बाहेर काढून त्या जागी पुन्हा त्वचेची सर्जरी करण्यात आली. अशा प्रकारची शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे पहिल्यांदाच झाली आहे, हे विशेष.

### -सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे प्रथमच 'फ्री फ्लॅप' शस्त्रक्रिया

सदर रुग्ण हा ३२ वर्षीय पुरुष असून, तो अमरावती येथील रहिवासी आहे. त्याच्या तोंडाच्या कॅन्सरची शस्त्रक्रिया करण्यात आली; मात्र या शस्त्रक्रियेमुळे ओठ व गालाच्या आतील पूर्ण भाग (जबडा) काढण्यात आला. त्यामुळे चेहऱ्यावर खड्डा पडला आल्याने सदर रुग्ण नैराश्येत जाण्याची भिती होती. अशा परिस्थितीत 'फ्री फ्लॅप' शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यामुळे कॅन्सरची शस्त्रक्रिया करतानाच प्लास्टिक सर्जरी व कॅन्सर सर्जरीच्या चमूने सदर रुग्णाच्या हाताची त्वचा काढून ती रूग्णाच्या चेहऱ्याला लावून शखक्रिया केली. या शस्त्रक्रियेने रुग्णाचा चेहरा आता पूर्वीप्रमाणेच पूर्ववत दिसतो. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विनामूल्य करण्यात आली.

# मोर्शी शहरात दिवाळीच्या पाडव्याला गवळण नृत्याची परंपरा कायम

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी शहरात दिवाळीच्या पावन पर्वावर लक्ष्मीपूजन संपताच रात्रीलाच गवळणीच्या पायाच्या घुंगराची व ढोलकीची थाप ऐकू यायला लागल्याने तरुण युवकांचे मात्र चांगलेच मनोरंजन होते. दिवाळीच्या पाडव्याला काढण्यात आलेल्या गवळण नृत्याची परंपरा मोर्शीकरांनी आजही जपून ठेवली आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा दिवाळीपासून ७ दिवस पारंपारिक पद्धतीने गवळण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

या गवळण सोहळ्याची सुरुवात रामजीबाबा देवस्थान येथून करण्यात येत असते.या गवळणी मध्ये सर्व जाती धर्मातील नागरिक सहभागी होतात. ही गवळण गावातून ढोलकी,तूनतूनि,बासरी, मंजीरा वाजवत दिवाळीचे गाणे एका सुरात गाऊन गवळण त्यावर ताल घरत नाचत असते.यावेळी गवळणीचे सोंग घेतलेले युवक सुद्धा चांगलाच ठुमका घेतात व नागरिकांचे मनोरंजन करतात.ही पारंपारिक गवळण मोर्शी शहरात दरवर्षीच आयोजित केल्या जाते.गवळण पाहण्याकरिता परिसरातील शेकडो नागरिक या ठिकाणी येतात.गवळण काढण्याचा उद्देश म्हणजे दिवाळीच्या पाडव्याला आपली संस्कृती टिकविणे तसेच समाज सुधारकांचे पोवाडे गावुन समाज प्रबोधन करणे असा असून ही गवळण घरोघरी जाऊन नाचत गाजत लोक गीत म्हणत सरते शेवटी लावा घरधन्याला कुंकवाचे बोट असे म्हणत घरधन्याला गवळणीच्या हाताने टीका लावून त्याच्याकडून बक्षीस घेतल्या जाते. गवळणीसोबत एक ढोलक्या,लोकगीत गाणारा गायक व इतर सहकारी असतात. यामध्ये बासरी वाजवणारा युवक सर्वांचे आकर्षण ठरतो.विशेष म्हणजे ही गीते पुस्तकातली नसतात तर ती स्वतः तयार केलेली असतात. मोर्शी येथील शाहीर तसेच बाहेर गावातील काही युवक महिलांचे वस्त्रधारण करून घरोघरी जाऊन नाचत गाजत सर्वांची मने जिंकत जातात.मोबाईलच्या युगात संस्कृती लोप पावत चालली असली तरी या गवळण व लोकनृत्याच्या माध्यमातून ही कला आजही ग्रामीण भागात जिवंत असल्याचे दिसून येते.दिवाळीच्या रात्री काढण्यात आलेल्या गवळणीच्या मागे शेकडो युवक सहभागी होत असल्याने शहरातील रस्त्यावर रात्रभर गर्दी पाहायला मिळते.



# अमरावती ते शेगाव सायकलिंग २० तासांत पूर्ण

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा सायकलिंग असोसिएशनतर्फे 'ऑडेक्स इंडीया रॅडोनिएरींग' च्या अंतर्गत ३०० किमी राईडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध जिल्हयातील २३ रायडर सहभागी झाले होते. विशेष म्हणजे ही ३०० किमी ची स्पर्धा केवळ २० तासांच्या आत पूर्ण करण्यात आली.

अमरावती सायकलिंग असोसिएशन अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुळकर्णी आणि विदर्भ केसरी संजय तिरथकर यांनी राईडला झेंडी दाखविली. यावेळी संघटनेचे सचिव अतुल कळमकर, सदस्य सचिन पारेख, विनोद वानखडे, नितीन अंबारे, गजेंद्र सदार, संजय मेंडसे प्रामुख्याने उपस्थित होते. ही राईड जिल्हा स्टेडियम येथून आरंभ होऊन मूर्तिजापूर, अकोला, बाळापूर, शेगाव येथून यु टर्न घेऊन पुन्हा त्याचमार्गे जिल्हा स्टेडियमवर सांगता करण्यात आली. राईडसाठी प्रमुख राईड रिस्पॉन्सिबल म्हणून अमरावती सायकलिंग असोसिएशनचे सदस्य लक्ष्मीकांत खंडागळे यांनी प्रविण जयस्वाल यांच्या सहकार्याने महत्वाची जबाबदारी पार पाडली. या राईडमध्ये किशोर शिरभाते, विनोदसिंग चौहान, समीर बगाडे, आशिष गावंडे, पवनकुमार रामावत, संजय राठोड, अतुल तायडे, राजेंद्र महाजन, भरत मालानी, सायकलिंग विष्णू गाढे, दीपक कयाल, शिवाजी गोलाईत, ओम जाधव, अनिता राठोड, अजय बोले, विद्या सानप, संतोष सानप, नरेंद्र भटकर, राजू धोटे, महेश गट्टाणी, विनोद बलांसे, सहदेव कोंकटवार, वर्षा सदार यांचा समावेश होता.

**NAME CHANGE**

OLD NAME
SIRAJ AHMAD
NEW NAME
SIRAJ AHEMAD SHAIKH DULU

ADRESS
KASAB PURA CHANDUR BAZAR, PASSPORT NO. N3087128

# मोबाईल विसरून मातीशी खेळ

## -अमरावतीत १४५ विद्यार्थ्यांनी साकारले शिवकालीन किल्ले!

**अमरावती/प्रतिनिधीः-** दिवाळीच्या आनंदसोहळ्यात विसरलेल्या परंपरेला पुन्हा जीवनदान देत अमरावती शहरात चिमुकल्यांनी शिवकालीन किल्ल्यांची अप्रतिम निर्मिती साकारली. आधुनिक युगात मोबाईलमध्ये रमणारी मुलं या उपक्रमात मातीत तुडवत, किल्ले उभारत आणि इतिहासाशी जोडली गेली!

गेल्या ३१ वर्षांपासून सलगपणे आयोजित केल्या जाणाऱ्या 'किल्ले बनवा स्पर्धे'त यंदा शहरातील ३५

### -'मातीशी नातं जोडा, इतिहासाशी मैत्री करा!'

शाळांतील १४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अंबिका नगर येथील महापालिका शाळेच्या मैदानावर ही स्पर्धा उत्साहात पार पडली. अंगाला माती लागू न देणाऱ्या पिढीतले हे चिमुकले माती, चिखल आणि पाण्यात खेळत किल्ले बनवण्यात दंग झाले. कोणीतरी रायगड उभा केला, तर कोणीतरी शिवनेरी, सिंधुदुर्ग, प्रतापगड, लोहगड, तोरणा आणि जंजिरा उभारून इतिहास जिवंत केला. मुलांनी मातीच्या भिंती, बुरुज, दरवाजे, झेंडे, सरदारांचे पुतळे आणि अगदी तोफाही बनवल्या.

दोन गटांत उत्साही स्पर्धा : स्पर्धा शिवाजी गट (१६ वर्षांवरील) आणि संभाजी गट (५ ते १६ वर्षे वयोगट) अशा दोन विभागांत झाली.





प्रत्येक गटाला दोन दिवसांचा वेळ देण्यात आला. मुलांनी अथक परिश्रमाने आणि संघभावनेने किल्ले पूर्ण केले.

'मोबाईल विसरून मातीशी खेळणारी मुलं पाहून पालक भारावून गेले,' असे मत पालकांनी आयोजकांना सांगितलं.

पालकांचा अभिमान, शिक्षकांचा आनंद : अनेक पालकांनी या उपक्रमाचं मनापासून कौतुक केलं. 'घरात बसून मोबाईलमध्ये रमणारी मुलं आज मातीशी खेळताना पाहून डोळ्यांत आनंदाश्रू आले,' असं एका पालकाने सांगितलं. 'आपल्या मुलांना आपली संस्कृती, आपला इतिहास समजावा, म्हणून ही स्पर्धा घेतो,' असं सुनील पांडे सर यांचे मत आहे. त्यांनी आवाहन केलं 'किल्ले फक्त मातीचे नव्हेत, ते आपल्या संस्कारांचे प्रतीक आहेत. प्रत्येक घरात एक किल्ला उभा राहू दे!'

**'प्रदर्शनातून शिकला इतिहास'** - किल्ला बनवण्याच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांची सचित्र माहिती देणारं विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आलं होतं. समुद्रकिनाऱ्यावरचा सिंधुदुर्ग, अभेद्य जंजिरा आणि सह्याद्रीच्या टोकावर असलेला रायगड या किल्ल्यांविषयी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण माहिती घेतली. प्रदर्शन पाहणाऱ्या प्रेक्षकांनीही 'इतिहास इतक्या सुंदर पद्धतीने जिवंत झाला, हे अविश्वसनीय आहे,' असं मत व्यक्त केलं. या परंपरेला जिवंत ठेवण्यासाठी श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, विदर्भ मल्लखांब असोसिएशन, दस्तुरनगर सेवा समिती, महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कल्याण शिक्षक पालक संघ, राजापेठ स्पोर्टिंग क्लब आणि अंबिका नगर श्री गणेश मंदिर संस्था यांचा एकत्रित पुढाकार राहिला आहे. गेल्या २९ वर्षांपर्यंत ही स्पर्धा दस्तुर नगर परिसरात होत होती. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून ती अंबिका नगरमधील मैदानावर भरवली जाते. या सोबतच श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय यांच्या द्वारे मुलांसाठी पुस्तक तुमच्या दारी या कल्पनेतून पुस्तकांची मोठी प्रदर्शनी साकारली. या प्रदर्शनाचा पालकांनी व मुलांनी उत्साहपूर्वक आनंद घेत २१/- रूपात आपली नोंदणी करत २ महिने पुस्तक वाचनाचा संकल्प करत सहभाग

नोंदवला. आपण देखील यात सहभागी होऊ शकता. स्पर्धेत संभाजी गटात प्रथम क्रमांक सोहम चौधरी आणि रुद्र मरकाम यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक कुलदीप चव्हाण, चेतन राणे आणि तन्मय रावळे यांनी मिळवला. तृतीय क्रमांक श्री देहूळकर, अनुप भेंडे, माही केने आणि रिद्धी बावणे यांनी

प्राप्त केला. तसेच प्रोत्साहन पारितोषिक ऋग्वेद ठाकरे, सिद्धार्थ ढेमने, आरव मेहरे आणि कृष्णा अवधाते यांना देण्यात आले. शिवाजी गटात प्रथम क्रमांक ऋषी ओकलकर आणि ओम ओकलकर यांनी मिळवला. द्वितीय क्रमांक प्रज्वल दवळे आणि राम गायकवाड यांच्या नावावर राहिला. तृतीय क्रमांक रश्मी आपटे, मिताली गिजरे, मंजिरी गिजरे आणि यशवंत गिजरे यांनी पटकावला. या समारोपिय कार्यक्रमावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील पांडे सर यांनी केले. प्रा. डॉ. निखिल मोहोड यांनी मुलांना मार्गदर्शन केले. तसेच किल्ल्यांचे परीक्षण नितिन कोळेश्वर व नितिन लवंगे यांनी केले समारोपिय कार्यक्रमाचे संचालन स्वराज ठाकरे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रथमेश सिंग यांनी केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अतिवृष्टी मदत न मिळाल्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांची दिवाळी काळी !

## मदत करायची नव्हती तर घोषणा केली कशाला ; मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांचा संतप्त सवाल !

**मोर्शी/ वार्ताहर**

शासनाने जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदत पॅकेज दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आश्वासन दिले असतानाही, मोर्शी वरूड तालुक्यातील ८५ हजार शेतकऱ्यांना मदतीचा एक रुपयाही न मिळाल्याने येथील शेतकऱ्यांची दिवाळी 'काळी' झाली असल्याचा आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे.

रुपेश वाळके यांनी याबद्दल आमदार, खासदार, पालकमंत्री, मुख्यमंत्री यांना संतप्त सवाल केला आहे: 'आमची दिवाळीच जर काळी करायची होती, तर घोषणा केली कशाला? आमची गोड फसवणूक का केली? आम्हाला का फसवले?' असा सवाल उपस्थित केला आहे.

जुलै ते सप्टेंबर महिन्यात मोर्शी वरूड तालुक्यात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे ५० हजार हेक्टर क्षेत्रावरील संत्रा पिकाचे कधीही भरून न निघणारे कोट्यावधी रुपयांचे संत्रा पिकाचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे ऐन दिवाळीच्या दिवशी मोर्शी तालुक्यातील निंभी येथील एका युवा शेतकऱ्याने आत्महत्या करून आपली जीवन यात्रा



संपविली असून अजून किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर मोर्शी वरूड तालुक्यात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची मदत मंजूर कराल असा संतप्त सवाल मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकरी व्यक्त करतांना दिसत आहे.

सरकारने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मोठे मदत पॅकेज जाहीर केले आणि हे पैसे



दिवाळीपूर्वी खात्यात जमा करण्याचे आश्वासन दिले. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, दिवाळी तोंडावर आली तरी, मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर एकही रुपयाची मदत जमा झाली नाही. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने मदत न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### शासनाने शेतकऱ्यांना सोडले वाऱ्यावर !

अतिवृष्टीने व सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या, संत्रा मातीमोल झाला, कापूस सोयाबीन काहीच राहील नाही. शेतकऱ्यांनी जगायचे कसे? अशी स्थिती आहे. एकीकडे खतांचे भाव वाढलेले आहेत. तर दुसरीकडे शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव नाही, शेतकऱ्यांना कोणी वाली राहिला नाही. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे अद्यापही मोर्शी वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात एकही रुपया टाकलेला नाही. यामुळे आम्ही शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांचा निषेध करत आहोत.



**रुपेश वाळके**
अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस मोर्शी तालुका.

# संत्र्याच्या फळगळतीने बागायतदार हवालदिल !

## संत्राफळ नुकसान भरपाईच नाही

**पथ्रोट/ वार्ताहर**

आंबिया संत्र्याची फळगळ होत असल्याने उत्पादकांची चिंता वाढली आहे. पंचनाम्याबाबत अद्याप शासनादेश नसल्याने कृषी विभागांची क्षेत्रीय यंत्रणा गप्प असल्याचे दिसून येते. सध्या वातावरणातील बदल बुरशीजन्य रोग, पोषक तत्त्वाची कमी, शेतातील पाण्याचा निचरा न होणे यासह अन्य कारणांमुळे संत्र्याच्या आंबिया बहराची गळ होत आहे. त्यामुळे पक्व होण्याच्या प्रक्रियेतील संत्र्याची गळ होऊन झाडाखाली फळांचा खच पडताना दिसतोय.

संत्राफळ काढणीदरम्यान फळगळतीचे संकट असते. असे असतानाही ना पंचनामे केले जात आहेत, ना सर्व्हेक्षण त्यामुळे अमरावतीसह विदर्भातील संत्रा फळबागायतदारांचे कोट्यवधीचे नुकसान होत आहे. बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे संत्रा लागवड भागात ही फळगळती होत असून याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. खरीप-रब्बी हंगामातील पिकांचे नैसर्गिक नुकसान झाले तर त्याचे विम्यापोटी नुकसानभरपाई मिळतेः मात्र संत्रा फळाच्या बाबतीत असे होताना दिसत नाही. फळगळती होत असतानाही पंचनामे किंवा सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे फळबागायतदारांचे कोट्यवधीचे नुकसान होत आहे. बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे संत्रा लागवड भागात ही फळगळ नित्याची झाली आहे.

दरवर्षी आंबिया बहरातील फळांची गळ ही ठरलेलीच आहेच. त्यामुळे ऐन उत्पादन पदरी पडत असतानाच बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. पाऊस आणि वातावरणातील बदलामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने आंबिया बहरातील फळांची गळ झाली. यावर्षीदेखील कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.

सर्वाधिक विम्याचे कवच द्राक्ष फळपिकाला असून आंबिया बहरातील सर्वाधिक विमा संरक्षित रक्कम ही द्राक्षासाठी देण्यात आली आहे. फळगळती होत असून याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व्हेक्षण पंचनाम्याची मागणी केली.

# बेलोरा येथे श्री संत गजानन महाराज मंदिर प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळ्याची मंगल सुरुवात

**बेलोरा/ वार्ताहर**

येथील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे आज दिनांक गुरुवार, २३ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झालेल्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. या सात दिवसीय धार्मिक कार्यक्रमात ह. भ. प. रमेश महाराज अवारे यांच्या उपस्थितीत सार्थ ज्ञानेश्वरी पारायण, तसेच ह. भ. प. दुर्गाश्री ताई ब्रम्हानंद गिरी (गोस्वामी) (आळंदीकर) यांचे श्रीमद् भागवत कथा सार होणार आहे. गायक म्हणून ह. भ. प. पवन महाराज ढोले, ह. भ. प. रामेश्वर महाराज इंगळे, आणि मृदुंगावर ह. भ. प. हरिदास



महाराज भोयर सहभागी होत आहेत.

या पवित्र सोहळ्याचे मुख्य कार्यक्रम २८ व २९ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडणार असून, त्या दिवशी मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कळसरोहण तसेच



होम-हवन विधी संपन्न होणार आहेत. तसेच रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री गजानन विजय ग्रंथाचे महापारायण हेमताई कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना पंचक्रोशी व तालुक्यातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींचे दर्शन घ्यावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा प्रतिमा ठाकरे, उपाध्यक्षा शिल्पा राऊत, सचिव अश्विनी ठाकरे, तसेच विश्वस्त योगितताई गाडबैल, ज्योत्सनाताई खवले आणि जयाताई डवरे यांनी केले आहे.

संस्थेचे मार्गदर्शक विस्मय ठाकरे यांनी सर्व भक्तांना आर्थिक व धान्य स्वरूपात दान देण्याचे आवाहन केले असून, यावर्षी प्रथमच महाप्रसादासाठी पुरणपोळीचा विशेष बेत आखण्यात आला आहे. भाविक भक्तांनी या दिव्य सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन श्री संत गजानन महाराजांच्या कृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चांदूररेल्वे शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

## आजी-माजी आमदारांचे संपूर्ण दुर्लक्ष

**चांदूररेल्वे/ वार्ताहर**

दिवाळीचा उत्साह संपत असतानाही चांदूररेल्वे शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास मात्र अजूनही तसाच आहे. सिनेमा चौक ते रेल्वेस्टेशनपर्यंतचा मुख्य रस्ता गेल्या अनेक महिन्यांपासून खड्डेमय अवस्थेत असून, दिवाळीत एकाही खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. 'सण संपत असताना रस्ता अजूनही तसाच असून आता दुरुस्तीचा मुहूर्त निघणार तरी कधी?' असा उपरोधिक सवाल नागरिक करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागानेही या बाबतीत मौन बाळगले असून, दुरुस्तीकरिता कोणताही ठोस पुढाकार न घेतल्याचे चित्र दिसून येते.

दररोज हजारो नागरिक, शाळकरी मुले, रुग्ण, व्यापारी आणि वाहनचालक या रस्त्याने प्रवास करतात, पण खड्यांमुळे प्रवास त्रासदायक आणि धोकादायक झाला आहे. दिवाळीच्या काळात ग्रामीण भागातून खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनाही या खड्यांमुळे अक्षरशः त्रास सहन करावा लागला. शहरात दिवाळीच्या दिवशी प्रकाशमाळा झळकत होत्या, पण त्या प्रकाशात रस्त्यांवरील खड्डे अधिकच ठळकपणे दिसत होते, अशी टीका नागरिकांकडून होत आहे. निवडणुकीत काही पक्षांनी 'नवा मुख्य रस्ता', 'शहराचा विकास', 'आधुनिक सुविधा' अशी मोठमोठी आश्वासने दिली होतीः मात्र आज प्रत्यक्षात नागरिकांना खड्डयांच्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. 'शहर विकास निधी', 'रस्ता दुरुस्ती निधी' अशा योजना फक्त कागदावरच राहिल्या आहेत. प्रत्यक्षात कामे होत नसल्याने लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेविरोधात लवकरच आंदोलन करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### कामाची गुणवत्ताच संशयास्पद

शिवाजीनगर शहरातील परिसरातील उड्डाणपुलावरदेखील काही महिन्यांतच खड्डे निर्माण झाल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आहे. लाखो रुपयांच्या खर्चाने बांधलेल्या पुलावरील रस्त्यावर इतक्या लवकर खड्डे कसे तयार झाले, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### विरोधकांनाही दिसत नाही का समस्या?


सत्ताधारी लोकप्रतिनिधींनी झोपेचे सोंग घेतले असताना विरोधकांनाही सदर मुख्य रस्त्याची समस्या दिसत नाही का? असा सवाल उपस्थित झाला आहे. विरोधकांकडून मागील काही दिवसांत शासनाविरोधात अनेक आंदोलने करण्यात आलीः मात्र त्यांना शहरातील रस्त्यांची दुरवस्था दिसून आली नाही. त्यामुळे एकंदरीत विद्यमान आमदारांसह माजी आमदारांचेही या रस्त्याकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## धम्मप्रकाशाने उजळणार तपोवन!

# भगवान बुद्धाच्या अस्थींचे आगमन आणि वर्षवास समापन सोहळाचे आयोजन

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती येथील लुंबिनी बुदध विहार,तपोवन परिसर अमरावती च्या वतीने वर्षावास समापन दोन दिवसीय सोहळा दिनांक २४ व २५ ऑक्टोबर २०२५ स्थळ लुंबिनी बुद्ध विहार पंचशील चौक तपोवन परिसर अमरावती इथे आयोजन केले आहे. यावेळी भगवान बुद्धाचे अस्थी चे रॅली द्वारे भव्य दिव्य स्वागत केल्या जाईल अमरावती विद्यापीठ चौक ते लुंबिनी बुद्ध विहार पर्यंत राहील. दुपारी ४ वा.अमरावतीतील उपासक व उपासिका नी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे. तदनंतर सायंकाळी ७ वाजता महापरित्राण पाठ व कठीण चिवरदान कार्यक्रम सुरू होईल.



शनिवार दिनांक २५ ऑक्टोबरला सकाळी ७ वाजाता महापरित्राण पाठाचो समापना होईल. ९ वाजाता धम्मदेशने ला सुरुवात होईल, ११ वाजता पूज्य भिकखु संघाचे भोजनदान, १२ वाजता मान्यवरांचे स्वागत समारंभ होईल, १२ ते २ धम्मदेसना व संघदान व भोजन दान कार्यक्रम आयोजित केलेला आहे. यावेळी वर्षावास समापण सोहळ्याचे मुख्य पूज्य भिक्खु अ. सीलवंसलंकार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष पूज्य भिक्खु निर्मलपुत्त आनंद महाथेरो हे राहतील. कार्यक्रमाचे उद्घाटक पूज्य भिक्खु सच्चक महाथेरो हे असातील व प्रमुख उपस्थिती पूज्य भिक्खु प्रज्ञानंद महाथेरो, पूज्य भिक्खु डॉ. अभयनायक थेरो, पूज्य भिक्खु बुद्ध प्रिय, पूज्य भिक्खु राहुल, पूज्य भिक्खु सुगतानंद, पूज्य भिक्खु विरियो पत्त्रो, पूज्य भन्ते गिरीमानंद व भिक्खु संघ यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी मातोश्री रमाबाई महिला संघ व नवयुवक पंचशील मंड.ळातर्फे सर्व श्रद्धावान उपासक व उपासिका आणि सहकुटुंब मित्र परिवार सहभागी होऊन पुण्य उर्जित करावे असे जाहीर निमंत्रण मंडळाचे वतीने देण्यात येत आह.

# तळेगाव ठाकूर येथे गवळण पंरपरा आजही कायम

**तळेगाव ठाकूर/ वार्ताहर**



अमरावती व नागपूर रोडवर असलेले वंदनीय राष्ट्रसंत तुकोजी महाराज याच्या समाधी पासून ३ कि.मी अंतर असलेले तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दिनांक २२ऑक्टोबर२०२५ रोजी तळेगाव ठाकूर येथे गवळण नृत्य ही ग्रामस्थांची पुरातन परंपरा असुन समस्त गावकरी यांचे एक दिवाळीच्या निमित्ताने गवळणीचे नृत्य मनोरंजन म्हणून शेतकऱ्यांचे आंनदाचे दिवाळी सण उत्सव हि परंपरा साजरी केली जाते. तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक गावांतील नागरीक गवळण नृत्य पाहण्या करीता येतात.दरवर्षी प्रमाणे यावर्षी सूद्धा गायीचे सजावट करुन संपुर्ण गावभर घरोघरी ढोलकी वाजवून गवळणीचे गाणे म्हणुन दिवाळीच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी गायीची सजावट करुण गावातील गायी यांचे गोठात पाचपावली मंदीर येथे ५.००वाजता पुजन करून नैवेद्य दाखवून नेहमीप्रमाणे यावर्षीही गवळण पंरपरा करण्यात आली.

विशेष म्हणजे गावातील शेतकरी दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी गायीची पूजा करून त्यांची गावातील नेहमीच्या ठिकाणीवर नेवुन म्हणजेच पाचपावली मंदीर गोठाण याठिकाणी संपूर्ण गावातील गायी गवळण मोठ्या उत्साहात ढोल ,बॅड गाचे , गाणे म्हणुन हि परंपरा साजरी केली जाते.

# विष्णोरा येथे गोठ्याला आग लागुन १७ जनावरे खाक

## १७ जनावरे गंभीर जखमी, अंदाजे ७ लाखांचे नुकसान

**मोर्शी/ वार्ताहर**

तालुक्यातील विष्णोरा येथील गोठ्याला आग लागून १५ बकऱ्या २ बोकड़ अशी १७ जनावरे पूर्णपणे भाजून मृत्युमुखी पडली, तर ४ बोकड १० बकऱ्या २ बैल १ गाय गंभीररित्या जखमी झाल्याची घटना ऐन दिवाळीच्या पावन पर्वावर २० ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या आगीत जवळपास ७ लाख रुपये नुकसान झाले आहे. मोर्शी तालुक्यातील विष्णोरा येथील गिरीधर दामोदर ठाकरे यांचे शेत स.न.७८/१ मधील व गावाजवळून दीड ते दोन किलोमीटर असलेल्या गोठ्याला २० ऑक्टोबररोजी मध्ये रात्रीचे सुमारास अचानक आग लागून गोठ्यात असलेल्या गजानन केशवराव राऊत यांच्या मालकीच्या १५ बकऱ्या व २ बोकुड अशी एकूण १७ जनावरे पूर्णपणे भाजून मृत्युमुखी पडली व १० बकऱ्याव ४ बोकड अशी एकूण १४ जनावरे जखमी झाली तसेच गिरीधर दामोधर ठाकरे यांचे मालकीचे २ मोठे बैल व १ मोठी गाय गंभीररित्या जखमी झाली असून गोठ्यातील साहित्य स्पिंकलर पाईप ७०, ड्रीपच्या नळ्या ८० बंडल, कृषिखते ८ पोते, युरिया ३ पोते, ह्यूमिक खत २ बॅग, टीनपत्रे ४६, नोझल १२ व फवारणी औषध प्लॅस्टिक टाकी २, फवारणी पंप २, १ फवारणी मशीन ४ स्ट्रोक, कुटार २ ट्रॅक्टर, संत्राझाडे मोठे २०, दरवाजे सागाचे २ नग २ लोखंडी पलंग व इतर शेती साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले आहे. या आगीत गिरीधर दामोदर ठाकरे यांचे ४ लाख ३९ हजार ३०० रुपयांचे, तर गजानन केशवराव राऊत यांचे २ लाख ७२ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे. २१ ऑक्टोबर रोजी महसूल खात्याचे तलाठी प्रदीप अजमिरे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यावेळी पोलिस पाटील प्रवीण पाटील, उपसरपंच संजय ठाकरे, चंद्रशेखर चरपे व गावातील नागरिक उपस्थित होते.

# आयआयएमसी नविन कॅम्पस विकासाचे कार्य वेगाने पूर्ण करा- संजय जाजू

**अमरावती/ का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थानच्या बडनेरा येथील नविन आणि अत्याधुनिक सुविधाने परिपूर्ण कॅम्पसचे बांधकाम लवकर सुरु करून नविन इमारतीत २०२७ चे शैक्षणिक सत्र सुरु करण्याच्या दिशेने विकासाचे कार्य वेगाने करण्याचे निर्देश केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी सीपीडब्लूडी आणि कार्यदायी एजेन्सीला दिले.

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसराच्या नविन कॅम्पस



निर्माणचे कार्य बडनेरा येथे महाराष्ट्र शासनाने दिलेल्या १५ एकर जागेवर सुरु आहे. या विकास कार्याचा आढावा घेणेसाठी दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ रोजी अमरावती महानगर पालिका आयुक्तांच्या निवास स्थानी उच्चस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी संबंधित विभागाना सचिव संजय जाजू यांनी सूचना दिल्या. याप्रसंगी महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, केंद्रीय लोक निर्माण विभाग मुंबईचे मुख्य अभियंता देबज्योती राय चौधरी, आयआयएमसीच्या भारतीय माहिती सेवा विभागाचे संचालक रश्मी रोजा, क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, विशेष कार्य अधिकारी डॉ. मनोज कुमार सोनोने यांच्यासह अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

सचिव संजय जाजू पुढे म्हणाले कि, आयआयएमसीच्या प्रस्तावित इमारतीचे बांधकाम करताना प्रत्येक टप्प्याची आखणी करा. पहिला टप्पा दर्जेदाररित्या पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या टप्प्याची निर्मिती करा. बदलत्या हवामानात बांधकाम बंद असतांना इमारतीच्या आतील भागातील कामे पूर्ण करा. कॅम्पस निर्माणचे कार्य गुणवत्तासह वेळेत पूर्ण होण्याच्या अनुशंगाने कामे करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी संबंधित विभागांना दिले.

आढावा बैठकी नंतर सचिव संजय जाजू यांनी बडनेरा येथील निर्माणाधीन नविन परिसराची पाहणी केली. याठिकाणी तयार होणारी शैक्षणिक व प्रशासकीय इमारत, अत्याधुनिक स्टुडीओ, सभाग्रह, क्रीडा संकुल, विद्यार्थी व कर्मचारी निवासस्थानाची आखणी व त्या संबंधित तांत्रिक बाबींची माहिती त्यांनी घेतली.



या आढावा बैठकीला नागपूर येथील केंद्रीय लोक निर्माण विभागाचे अभियंता, अमरावती येथील वन विभाग, प्रदूषण नियंत्रण बोर्ड, विभागीय नगर रचना कार्यालय, अग्निशमन विभाग, आकाशवाणी, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महानगर पालिकाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आयआयएमसीचे शिक्षक डॉ. विनोद निताळे, प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने, रोहन तायडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी राजेश झोलेकर, भूषण मोहोकार यांचे सहकार्य लाभले.

# ५२ वर्षीय इसमाचा आढळला मृतदेह, हत्या झाल्याचा संशय

## मोर्शी ते चांदूरबाजार मार्गावरील घटना

**मोर्शी/प्रतिनिधीः** -मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या तालुका फळरोप वाटिका येरला विभागाच्या खुल्या जागेवर ५२ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला असून सदर इसमाचा खून करण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसून येत आहे.सदर घटना आज दि.२३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ वाजताचे सुमारास उघडकीस आली.मृतक इसमाचे नाव विनोद भास्करराव राऊत (वय ५२, रा. समर्थ कॉलनी मोर्शी) असे आहे.



पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार विनोद भास्करराव राऊत हे उपविभागीय कृषी कार्यालय येथे लिपिक पदावर कार्यरत असून आज त्यांच्यावर अज्ञात आरोपीने डोक्यावर, पायावर लोखंडी सळाखीने मारहाण करून त्यांचा निर्घृण खून करण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसून आल्याने एकच खळबळ उडाली. लगेच या घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना प्राप्त होताच मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर,पोलीस निरीक्षक राहुल आठवले व त्यांचा पोलीस अधिनस्त स्टॉप यांनी घटनास्थळावर धाव घेऊन मृतक इसमाच्या मृतदेहाचा पंचनामा करून प्रेत उपजिल्हा रुग्णालय येथे रवाना करण्यात आले.सदर इसमाला कोणी व का मारले? याचा सुगावा अद्याप तरी लागला नसून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

# राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनी २८ पासून



### ३० ला समारोप सोहळा

स्पर्धा व प्रदर्शनीचा समारोप सोहळा ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता पार पाडणार आहे. विजेतांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात येणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, बियांनी कॉलेजचे प्राचार्य डॉ.दीपक धोटे, एड. प्रशांत देशपांडे, प्रा राजेश चंदनपाट आदि उपस्थित राहणार आहे.

## चाकोते फोटो स्टुडिओचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-**
चाकोते फोटो स्टुडिओच्या वतीने राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीचे आयोजन मंगळवार २८ ते ३० ऑक्टोबर पर्यंत अंबागेट येथील मृगेंद्र मठ मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. राज्य भरातून या स्पर्धेला प्रतिसाद मिळत आहे. या निमित्य विविध कार्यक्रम घेतले जाणार [illegible] मध्ये आयोजकांनी दिले.

त्यांनी सांगितले की, या प्रदर्शनीचे उद्घाटन २८ ऑक्टोबरच्या सकाळी ११.३० वाजता खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, एड. प्रशांत देशपांडे, संजय तिरथकर, प्रा. संजय शिरभाते, राजू भेले,सुरेश रतावा उपस्थित राहणार आहे. दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत अमरावती चे प्रसिद्ध फोटोग्राफर विपुलतांना यांची मोबाईल रील ☞(पान २ वर)

### गर्दीच्या काळात प्रवाशांना मोठा दिलासा

# मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या

### अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा येथे थांबा

**अमरावती/प्रतिनिधीः-**
सणासुदीच्या काळामुळे रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळली आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने प्रवाशांना दिलासा दिला असून मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. मध्य रेल्वेद्वारे मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाडी सोडण्यात येईल. दिवाळी आणि



छठ पूजा उत्सवानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – नागपूर अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. विशेष गाडी क्र. ०१००५ मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २५ ऑक्टोबरला ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्र. ०१००६ नागपूर येथून २५ ऑक्टोबर रोजी १८.१० वाजता सुटेल आणि☞(पान २ वर)

# इर्विन चौकात कोल्हा दिसल्याने नागरिकांमध्ये दहशत

**अमरावती/प्रतिनिधीः-**
स्थानिक इरविन चौकात बुधवारी सकाळी कोल्हा दिसल्याने नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. निवासी क्षेत्रामध्ये वन्य प्राण्यांचा अधिवास गेल्या काही दिवसा पासून वाढत आहे.अशात कोल्हा समोर आल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



माहितीनुसार रोड रनर ग्रुपचे सदस्य रमेश कारनानी बुधवारी सकाळी पाच वाजता सायकलने जिल्हा स्टेडियम कडे जात होते. त्यावेळी त्यांना इरविन चौकातील मेड प्लस समोर झुडूपामधून एक कोल्हा रस्त्यावर येताना दिसला. त्यांना आधी असे वाटले की तो मोठा श्वान आहे. यामुळे ते थोडावेळ थांबले. तेव्हा त्यांना तो कोल्हा असल्याचे समजले. त्याचवेळी रनर्स ग्रुपचे नितीन☞(पान २ वर)

# वेगवेगळया रस्ता अपघातात ४ तरुणांचा मृत्यू

### जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या २४ तासात झालेल्या ६ वेगवेगळ्या अपघातात ४ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तिवसा, शिरखेड, मोर्शी, शिरजगाव कसबा व वरुड पोलीस ठाण्याच्या हददीत या घटना घडल्या आहे. येवदा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या दर्यापूर अकोट मार्गावर वडनेर गंगाई जवळ पोलीस भरती ची तयारी करणाऱ्या शुभम संजय चव्हाण (वय २२) आपल्या मित्रासह रस्त्याने जात होता, त्यावेळी स्प्लेंडर एमएच ३० बीके २६९४ च्या चालकाने त्याला टक्कर मारली. यामुळे शुभम चव्हाण जमिनीवर पडला. डोक्याला मार लागल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. त्याचे वडील संजय चव्हाण यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.




अन्य एका घटनेत शिरखेड पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या मंगरूळ शिवार परिसरात अमन शहा मेहमूद शाह ट्रॅक्टर चालवत होता. रेहान शाह आरीफ शाह ट्रॅक्टर वर बसला होता. रोटावेटरच्या खाली ☞(पान २ वर)

# दर्यापूरच्या तरुणाची अकोला येथील हॉस्पिटलमध्ये आत्महत्या

**दर्यापूर/प्रतिनिधीः-**
तालुक्यातील बनोसा येथे राहणाऱ्या एका ३२ वर्षीय तरुणाने अकोला येथील खाजगी हॉस्पिटल च्या वार्डमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवार २३ ऑक्टोंबरच्या दुपारी समोर आली आहे. अमोल हरिश्चंद्र कावनपुरे (वय ३२, पहाडीपुरा बनोसा) असे मृत युवकाचे नाव आहे. माहितीनुसार अमोल कावनपुरे याला पायाच्या उपचारासाठी अकोला शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल



करण्यात आले होते. जेथे त्याच्यावर उपचार सुरू होते. उपचार सुरू असताना गुरुवारच्या सकाळी त्याने वार्डमध्ये पंख्याचा फंदा बनवून आत्महत्या केली. रुग्णाच्या रूमचा दरवाजा उघडत☞(पान २ वर)

# चाकू मारून तरुणाला लुटले

### सूतगिरणी परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूसाठी पैसे न दिल्याने एका तरुणावर चाकूने हल्ल्या करून त्याच्या खिशातून चार हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याची घटना सूतगिरणी गोपाल नगर परिसरात बुधवारच्या रात्री समोर आली आहे. वेदांत विनोद बर्गे (वय २०,आदर्श नेहरू नगर ) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी श्याम नागरे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



माहितीनुसार वेदांत विनोद बर्गे बुधवारच्या सायंकाळी मूर्तिजापूर जाण्यासाठी बेनाम चौकात☞(पान २ वर)

# मुर्तीजापुर - दर्यापूर मार्गावर तिहेरी अपघातात १ ठार, ८ गंभीर जखमी

### लहान बालकांचाही समावेश - अपघातस्थळी हाहाकार

**मुर्तीजापुर/प्रतिनिधीः-** मुर्तीजापुर–दर्यापूर मार्गावर पायटांगी फाट्याजवळ गुरुवारी सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास झालेल्या भयानक तिहेरी अपघातात एका इसमाचा जागीच मृत्यू झाला असून आठ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. जखमींमध्ये लहान बालकांचाही समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार, दर्यापूर मार्गावरील पायटांगी फाट्याजवळ एम.एच.३० बी.एल.७६०० क्रमांकाची ग्रँड विटारा व्हॅन, एम.एच.२६ बी.डब्ल्यू.८०७५ क्रमांकाचे मॅक्सीमा ऑटो आणि लाखपूरी येथील मेहरे यांचा महिंद्रा



ट्रॅक्टर यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात एक अनोळखी इसम जागीच ठार झाला, तर आठ जण गंभीर जखमी झाले.

अपघातात जखमी झालेल्यां☞(पान २ वर)

# झेडपी, पं. स. च्या निवडणुका नोव्हेंबर तर न.पा. डिसेंबरमध्ये होणार

**अमरावती /प्रतिनिधीः-**
जिल्हा परिषद, १४ पंचायत समितीमधील आरक्षण ३१ ऑक्टोबरला अंतिम होणार असून त्यापुर्वी २७ ला अंतिम मतदारयादी प्रसिध्द केली जाणार आहे. तसेच १० नगरपरिषदांसह दोन नगरपंचायतींचा देखील २७ ऑक्टोबर रोजी आरक्षण आणि मतदारयादी अंतिम होणार आहे. त्यामुळे नाव्हेंबरमध्ये पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषद, पंचायत समित्या व डिसेंबरमध्ये नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसे आयोगाकडून देखील नियोजन केले जात आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाला ३१ जानेवारी २०२६ च्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ☞(पान २ वर)

# प्रहारची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

### ज्वारी देऊन केला शासनाचा निषेध

**अमरावती/प्रतिनिधी: -**
सणासुदीच्या दिवसांमध्ये शासनाने गरीबाची थट्टा केली आहे. रेशन कार्ड धारकांना गव्हा ऐवजी आता ज्वारीचा पुरवठा करण्यात येत आहे. दिवाळी सण असल्याने गरीब रेशन कार्डधारकांना ज्वारीच्या भाकरी खाव्या लागल्या आहे. ही शोकांतिका असून या विरोधात प्रहार जनशक्ती पक्षाचे चंदू खेळकर यांच्या नेतृत्वात लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी शासनाला वाटप केलेली ज्वारी



देऊन निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच ज्वारी ऐवजी गव्हाचा पुरवठा करून लाभार्थ्यांना वाटप करावा,अशी मागणी रेटून धरली.राज्यात बहुसंख्य हा हिंदू समाज राहतो आणि त्या हिंदू समाजाचा अत्यंत उत्सवाचा व आनंदाचा सण☞(पान २ वर)




# भांबोरा येथे विद्युत तारांच्या स्पर्शाने बकरीचा मृत्यू

### पशुपालकही जखमी

**तिवसा/प्रतिनिधीः-** मौजा भांबोरा येथील शेतशिवारात चराई करीत असलेल्या एका बकरीच्या अंगावर जिवंत विद्युत तार पडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला तर तिला वाचविण्यासाठी गेलेल्या पशुपालकाला ईजा पोहचली.दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी ही घटना घडली असून पशुपालकावर तिवसा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले.

भांबोरा येथील रमेश



गडलिंग हे ☞(पान २ वर)

# वर्धेत गळफास लावून तरुणाची आत्महत्या

**वर्धा /प्रतिनिधीः-;** मनोधैर्य खचलेल्या तरुणाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना पुलफैल परिसरात घडली. विजय ब्रिजलाल यादव (३५) असे मृताचे नाव आहे. यादव हे दुग्ध व्यवसाय करीत होते. शिवाय त्यांना दारूचे व्यसन जडले होते. अशातच दोन वर्षापूर्वी त्यांची पत्नी त्यांना सोडून माहेरी गेली. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते विवंचनेत होते. अशातच गळफास घेत यादव यांनी आत्महत्या केल्याची चर्चा घटनास्थळी होती. या प्रकरणी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**वर्धा /प्रतिनिधीः-** वन्यजीवांपासून पिकांच्या संरक्षणासाठी शेताला लावलेल्या तारेच्या कुंपनात वीज प्रवाह प्रवाहित करण्यात आला. याच प्रवाहित विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना नजीकच्या मलकापूर येथे घडली. नरेश मारोतराव शिंगोडे (६०, रा. मलकापूर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.



मलकापूर येथील नरेश यांनी गावाच्या परिसरात ७ एकर जमीन भाड्याने घेतली. ज्यावर तूर व सोयाबीन या पिकांची त्यांनी लागवड केली. ☞(पान २ वर)